सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, १७ एप्रिल २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १५९ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


**आजचे सामने**

मुंबई इंडियन्स वि. सनरायजर्स हैद्राबाद

वेळ : रात्री ७.३० वाजता

ठिकाण : वानखेडे मैदान, मुंबई

## विचारपुष्प



नि संघ आणि स्वयंसेवक यांच्यात हेच नाते आहे. स्वयंसेवक आपापल्या आवडीनुसार विभिन्न क्षेत्रांत कार्य करतात, परंतु ते सर्व संघाकडून मिळालेल्या मूळ श्रद्धा आणि चारित्र्य संस्कारांवर ठाम राहण्याचा प्रयत्न करतात. त्यानुसार अनेक संघटनांची स्थापना संघ स्वयंसेवकांनी केली आहेत. त्यातील प्रत्येक संघटना स्वायत्त आहे, त्यांची स्वत:ची स्वतंत्र रचना, कार्यशैली आहे. पण, त्या सर्वांना वाटते की ते सर्व एका मोठ्या कुटुंबाचा भाग आहेत, ते सर्व बंधू आहेत आणि त्या सर्वांचे राष्ट्रीय ध्येय आणि आकांक्षा एकच आहेत.

**- हो. वे. शेषाद्री,**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

# 'वक्फ'वरून हिंसाचार अमान्य

## सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केली चिंता, आजही सुनावणी

**नवी दिल्ली, १६ एप्रिल**

वक्फ सुधारित विधेयक कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणीला सुरुवात झाली आहे. वक्फ सुधारित कायद्यावरून देशात सुरू असलेला हिंसाचार अमान्य आहे, असे मत सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी व्यक्त केले आहे. याचिकांवर उद्याही सुनावणी होणार आहे.

सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्या. संजय कुमार आणि न्या. के. व्ही. विश्वनाथन् यांच्या न्यायासनासमोर याचिकांवर सुनावणी सुरू झाली. वक्फ सुधारणा कायद्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात १०० याचिका दाखल झाल्या आहेत. केंद्र सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल ॲड. तुषार मेहता युक्तिवाद करीत आहेत. वरिष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल, राजीव धवन, अभिषेक मनू सिंघवी आणि सी. यू. सिंग हे वक्फ कायद्याच्या विरोधात युक्तिवाद करीत आहेत. आजच्या



सुनावणीदरम्यान अपीलकर्त्यांनी बोर्ड सदस्यांमध्ये बिगर मुस्लिमांचा समावेश, जुन्या वक्फ मालमत्तेची नोंदणी, वक्फ बोर्डाची स्थापना आदी मुद्द्यांवर युक्तिवाद केला.

वक्फ बाय युजर अंतर्गत येणाऱ्या अशा मालमत्ता आहेत ज्या दीर्घकाळापासून धार्मिक अुवा धर्मादाय हेतूंसाठी वापरल्या जातात पण अशा मालमत्तांची अधिकृत कागदपत्रे नसतात. नव्या कायद्यानुसार अशी मालमत्ता वादग्रस्त किंवा सरकारी जमिनीवरील असेल तर ही तरतूद लागू होणार नाही, अशी सूट देण्यात आली. यावरून अशा मालमत्ता वक्फ बाय युजर जाहीर केल्या जाणार नाही, अशा प्रकारचे खटले दाखल होणार नाहीत, असे म्हणू शकत नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे.

### वक्फ बाय युजरवर केंद्राला मागितले उत्तर

कायदेशीरपणे स्थापन झालेल्या वक्फ बाय युजर मालमत्तांना अधिसूचित करणे समस्या निर्माण करणारे ठरेल, असे न्यायालयाने म्हटले आहे. अनेक वर्षे जुन्या मशिदींकडे कागदपत्रे नसतील तर त्यांची नोंदणी कशी केली जाईल, १४ आणि १६ व्या शतकातील बहुतेक मशिदींबाबत विक्री करार असण्याची शक्यता नसल्याने त्यांच्या नोंदी कशा केल्या जातील, हे स्पट करावे, असे न्यायालयाने म्हटले आहे.

धार्मिक ट्रस्टबाबात न्या. कुमार यांनी प्रश्न उपस्थित करताना म्हटले आहे की हिंदू ट्रस्टमध्ये मुस्लिमांना सदस्य होण्याची परवानगी देणार का, हे स्पष्ट करा. तसेच मालमत्ता वक्फ आहे की नाही हे न्यायालयाला का ठरवू देत नाही, असा प्रश्न न्या. कुमार यांनी उपस्थित केला. *(वृत्तसंस्था)*



अमरावती येथील बहुप्रतीक्षित बेलोरा विमानतळावरून अखेर विमानसेवेला सुरुवात झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून विमानतळाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्रिद्वय एकनाथ शिंदे, अजित पवार, नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते

# वैदर्भीय न्या. भूषण गवई होणार नवे सरन्यायाधीश

## १४ मे रोजी शपथ घेणार



**नवी दिल्ली, १६ एप्रिल**

मुळ वैदर्भीय असलेले न्या. भूषण गवई देशाचे नवे सरन्यायाधीश होणार आहेत. गवई १४ मेला सरन्यायाधीशपदाची शपथ घेणार आहेत.

विद्यमान सरन्यायाधीश संजीव खन्ना १३ मेला निवृत्त होत आहेत, त्यामुळे नवीन सरन्यायाधीशांचे नाव सूचवण्याची सूचना विधि आणि न्याय मंत्रालयाने न्या. खन्ना यांना केली होती. त्यानसार सरन्यायाधीशांनी नवीन सरन्यायाधीश पदासाठी न्या. भूषण गवई यांचे नाव सूचवले आहे. न्या. गवई देशातील ५२ वे सरन्यायाधीश होणार आहेत. न्या. गवई यांना सरन्यायाधीश म्हणून अल्प म्हणजे फक्त सहा महिन्यांचा कार्यकाळ मिळणार आहे.

गतवर्षी ११ नोव्हेंबरला सरन्यायाधीश म्हणून न्या. संजीव खन्ना यांनी शपथ घेतली होती. तेव्हाचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड १० नोव्हेंबरला निवृत्त झाल्यामुळे त्यांच्या जागेवर न्या खन्ना यांची नियुक्ती करण्यात आली होती. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू १४ मे न्या. गवई यांना सरन्यायाधीशपदाची शपथ देणार आहेत. न्या. एम. हिदायतुल्लाह आणि न्या. शरद बोबडे यांच्यानंतर न्यायपालिकेतील सर्वोच्च पदावर पोहोचणारे भूषण गवई नागपूर बार कौन्सिलचे तिसरे सदस्य आहेत.

१४ नोव्हेंबर २००३ ला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात भूषण गवई यांची अतिरिक्त न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती झाली. १२ नोव्हेंबर २००५ ला स्थायी न्यायमूर्ती तर २४ मे २०१९ ला सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून त्यांची निवड झाली. *(तभा वृत्तसेवा)*

## सलग दुसऱ्या दिवशी बाजारात तेजी

**मुंबई** : देशांतर्गत बाजारातील तेजी सलग दुसऱ्या दिवशीही कायम राहिली. बुधवारी निर्देशांक २८७ अंकांनी वाढून ७७ हजारांवर पोहोचला. निफ्टीत १०४ अंकांची वाढ झाली अ ाणि तो २३,४३३ वर बंद झाला. दिवसभरातील कारभारात बँक शेअर्समध्ये सर्वाधिक तेजी दिसून आली. त्यापाठोपाठ ऑटो आणि फार्मा क्षेत्रात विक्री झाली. धातू आणि आयटी क्षेत्रातही वाढ दिसली. बुधवारी ३० पैकी १८ शेअर्स हिरव्या रंगात बंद झाले. इंडसइंड बँक, ॲक्सिस बँक, अदानी पोर्टस्, एशियन पेंट्स आणि भारती एअरटेल यांचे शेअर्स सर्वाधिक वधारले होते. मागील तीन सत्रात निर्देशांकात चार टक्क्यांहून अधिक वाढ झाली.

# रुग्णालयातून नवजात बाळ चोरीला गेल्यास परवाना रद्द होणार

- सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय
- बाल तस्करी रोखण्यासाठी निर्णय

**नवी दिल्ली, १६ एप्रिल-**

सर्वोच्च न्यायालयाने बाल तस्करी रोखण्यासाठी आणि बाल तस्करीच्या गुन्ह्यांशी संबंधित प्रकरणे हाताळण्यासाठी व्यापक मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली. एखाद्या रुग्णालयातून नवजात बाळ चोरीला गेले किंवा तस्करी झाल्याचे आढळले. तर संबंधित रुग्णालयाचा परवाना रद्द करणे पहिले पाऊल असावे, असे यावेळी सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. सर्व राज्यांच्या सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या म ार्गदर्शक तत्वांची लवकरात लवकर अंमलबजावणी करावी, असे आदेश न्यायालयाने दिले. न्यायालयांनी बाल तस्करीची प्रकरणे सहा महिन्यांत सोडवावी, असे निर्देशही सर्वोच्च न्यायालयाने दिले.

न्यायमूर्ती जे. बी. पार्डीवाला आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या न्यायासनाने देशभरातील उच्च न्यायालयांना बाल तस्करीच्या प्रकरणांमध्ये प्रलंबित खटल्यांची स्थिती जाणून घेण्याचे निर्देश दिले. बाल तस्करी प्रकरणाचे खटले सहा महिन्यांत पूर्ण करावे आणि दैनंदिन खटला चालवावा, असे निर्देश कनिष्ठ न्यायालयांना उच्च न्यायालयांनी द्यावेत असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे. निर्देशांची अंमलबजावणी करण्यात कोणतीही हलगर्जीपणा केल्यास न्यायालयाचा अवमान मानला जाईल. उत्तरप्रदेशातील बाल तस्करी प्रकरणातील आरोपींनी दाखल केलेल्या अटकपूर्व जामीन अर्जांवर सुनावणी करताना न्यायालयाने हे निर्देश दिले. तसेच या प्रकरणातील तेरा आरोपींचा जामीन फेटाळून लावला. तसेच उत्तर प्रदेश सरकारने हे प्रकरण अतीशय सहजतेने घेतले आणि अलाहाबाद उच्च न्यायालयानेही भावनांची कदर न करता आरोपींना जामीन दिल्याचे मत खंडपीठाने व्यक्त केले.

### बाळाची काळजी घेणे रुग्णालयाची जबाबदारी

जर महिला बाळाला जन्म देण्यासाठी रुग्णालयात आली असता बाळाची सर्वच बाबतीत काळजी घेण्याची जबाबदारी रुग्णालयाची आहे, असे न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती यांच्या खंडपीठाने म्हटले आहे. तसेच आईवडिलांनीही बाळाबाबत सजग राहावे, असा सल्लाही दिला.






डाउन-पेमेंट सुरू ₹5 370/-*

| | 125 NEON | 125 CARBON FIBRE | NS 125 BASE | N160 TWIN DISC | N160 USD |
|---|---|---|---|---|---|
| बचत | ₹1 184/- | ₹2 000/- | | | ₹5 914/- |
| खास किंमत (बचत झाल्यावर) | ₹85 594/- | ₹92 282/- | ₹99 994/- | ₹1 22 722 /- | ₹1 36 992/- |

*एक्स-शोरूम क्रीमत

pulsar DEFINITELY DARING

72198 21111 | BAJAJ SECURE | BAJAJ CREDIT

*नियम आणि अटी लागू. *दाखवलेली एक्स-शोरूम किंमत पल्सर वेरिएंट्ससाठी आहे. किंमतीतील रिविजन विरुध्द पल्सर वेरिएंट्सची एक्स-शोरूम किंमत 31 मार्च 2025 नुसार. *पल्सर 125 निऑनसाठी डाउन-पेमेंट म्हणजे मार्जिन मनी. मार्जिन मनीमध्ये DCC शुल्क, प्रक्रिया शुल्क, इतर शुल्क वगळले आहेत आणि ते क्रेडिट पॅरामीटर्सच्या पूर्ततेवर आधारित आहे. बजाज ऑटोने पूर्वसूचना न देता कोणतीही किंवा सर्व ऑफर्स काढून घेण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. साहसी दृश्ये तज्ञांकडून, व्यावसायिक निरिक्षणा अंतर्गत, नियंत्रित आणि राखीव वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यापासून दूर जागेवर केली आहेत. ह्या साहसी दृश्यांचं अनुकरण करू नका आणि नेहमी वाहतुकीचे व सुरक्षिततेचे नियम पाळा. एएमसी विशिष्ट मॉडेल्स आणि विशिष्ट राज्यात उपलब्ध. अधिक माहितीसाठी बजाज डीलरकडे चौकशी करा. रस्त्यावरील मदत तृतीय पक्षांकडून केली जाते आणि ती त्यांच्या नियम व अटींच्या अधीन आहे.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Solapur • Station Road** AHERKAR BAJAJ 9689899840 • **Hotgi Road** AHERKAR BAJAJ 8956 069 355 • **Akkalkot Road** AHERKAR BAJAJ 8956 320 060 • **Pandharpur** PANDURANG BAJAJ 8600024805 • **Jeur** SHIVRATNA BAJAJ 9922044676 • **Barshi** AHERKAR BAJAJ 8308004007. **Authorised Service Centre: Mangalwedha** 9890214155, **Marwade** 9028703555, **Akkalkot** 9011556800, **Karkamb** 7057447777, **Vairag** 8308006007, **Sangola** 8888109109, **Karmala** 8888984084, **Kandar** 9673005524, **Rashin** 9975704778, **Mirajgaon** 7774826060, **Akluj** 7756999799, **Natepute** 9850738876, **Mohol** 8830070701.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...

### शास्त्री हौसींग सोसायटीमध्ये ६ हजार ५०० रुपयांचे चांदीचे क्वाईन चोरीस

**सोलापूर** - यलगुलवार शाळेजवळील सिव्हील लाईन परिसरातील शास्त्री हौसींग सोसायटीमधील घरातून चोरट्याने ६ हजार ५०० रुपये किंमतीचे तीन चांदीचे क्वाईन चोरून नेले.याबाबत निनाद बाळकृष्ण बुलबुले (वय ३१) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १३ एप्रिल रोजी रात्रीच्यावेळी चोरट्याने निनाद बुलबुले यांच्या राहत्या घरात प्रवेश करून किचनमधील कपाट उचकटून ड्रॉवरमधील चांदीचे तीन क्वाईन चोरून नेले. म्हूणन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार पापडे पुढील तपास करीत आहेत.

### दुचाकीसाठी पत्नीचा छळ करणाऱ्या पतीसह तिघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर** - दुचाकीसाठी पत्नीचा छळ करणाऱ्या पतीसह तिघांवर सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रूक्मिणी सिद्राम म्हेत्रे (वय २८, रा. मधुकर उपलप वस्ती, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती सिद्राम, सासू लक्ष्म ीबाई, पतीची आत्या शामाबाई (सर्व रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मे २०१८ ते ११ मार्च २०२५ या कालावधीत रूक्मिणी या पती सिद्राम याच्या घरी म्हणजेच सासरी नांदण्यास होत्या. या कालावधीत पती सिद्राम व त्याच्या घरातील लोकांनी रक्मिणी यांना त्रास देऊन मारहाण करून शिवीगाळ करून वारंवार माहेरी हाकलून दिले. तसेच तुझ्या आई-वडीलांकडून दुचाकी आणण्याकरीता ५० हजार रुपये घेऊन ये असे म्हणून रूक्मिणीला मानसिक व शारीरीक त्रास देऊन छळ केला. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार माडे पुढील तपास करीत आहेत.

### तलवारीने ठार मारण्याची धमकी देणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर** - दुसऱ्या व्यक्तीसोबत बोलल्याचा राग मनात धरून महिलेला तलवारीने ठार मारण्याची धमकी देणाऱ्याविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत म निषा शिवानंद तळ्ळे (वय ३०, रा. गणेश सोसायटी, बालाजी मंगल कार्यालय, जुळे सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन अजित (रा. कल्याण नगर, जुळे सोलापुर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मनिषा तळ्ळे या फ्लोरा अपार्टमेंट येथे कामाला असलेल्या वॉचमनसोबत बोलल्या होत्या. त्याचा राग मनात धरून १४ एप्रिल रोजी दुपारपासून अजित हा मनिषा यांना तु माझ्याशिवाय कोणासोबत बोलत जाऊ नको असे म्हणून हाताने मारहाण करीत होता. त्यावेळी मनिषा यांची आई अजित यास समजावून सांगत असताना तिला धक्काबुक्की करून अजितने हातात तलवार घेऊन शिवीगाळ करून तुम्हा सर्वांना खल्लास करतो अशी धमकी दिली. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार भिसे पुढील तपास करीत आहेत.

### डीआरएम कार्यालयासमोर दोघांना लाकडाने मारहाण

**सोलापूर** - रेल्वे स्टेशनजवळील डीआरएम कार्यालयासमोरील रस्त्यावर मंगळवारी रात्री ११.१५ वाजता दोघांना अज्ञात व्यक्तींनी



लाकडाने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. नवनीत संजय ढाले (वय २७, रा. जांबवीर हौसिंग सोसायटी, सोलापूर) व ओंकार अनिल बैरुनगी (वय २१, रा. जांबवीर हौसिंग सोसायटी) अशी मारहाण झालेल्या दोघांची नावे आहेत. मंगळवारी रात्री नवनीत आणि ओंकार असे दोघे सात रस्ता ते रेल्वे स्टेशन दरम्यानच्या डीआरएम कार्यालयासमोरील रस्त्यावर थांबले होते. त्यावेळी तेथे आलेल्या अनोळखी दोघांनी त्यांनां अज्ञात कारणातून लाकडाने आणि लाथाबुक्यांनी मारहाण केली. लाकडाने केलेल्या मारहाणीत नवनीतच्या उजव्या हाताला, दोन्ही पायाला व डोक्याला मार लागला आहे. तसेच ओंकार डाव्या हाताच्या कोप-याला मार लागल्याने बुधवारी रात्री एकच्या सुमारास ते शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### सायकलीवरून पडल्याने विद्यार्थिनी जखमी

**सोलापूर** - शाळा सुटल्यानंतर घराकडे जाताना शाळेपासून ५० मीटर अंतरावर सायकलवरून पडल्याने विद्यार्थिनी जखमी झाली. हा प्रकार मंगळवारी दुपारी २ वाजता दक्षिण सोलापूर तालुक्यातील सावतखेड गावात घडला. सुमय्या महेबूब शेख (वय १३) असे जखमी मुलीचे नाव आहे. मंगळवारी दुपारी दोन वाजता शाळा सुटल्यानंतर सुमय्या ही सायकलवरून घराकडे जात होती. शाळेपासून अगदी ५० मीटर अंतर गेल्यानंतर सुमय्या सायकलवरून खाली पडल्याने तिच्या पोटाला मुकामार लागला. खासगी रुग्णालयात उपचार करून मामा दादेबाशा सय्यद यांनी उपचारास बुधवारी दुपारी १२.२० वाजता शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



## महापालिका मंडई विभागाच्या वतीने विश्वरत्न डॉ. आंबेडकर यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

महापालिका मंडई विभागाच्या वतीने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या१३४ व्या जयंतीनिमित्त मंडई विभागाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी सहायक अधिकारी खैरादी , वरिष्ठ श्रेणी पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन दावीद शिरशेट्टी, आरोग्य निरीक्षक कट्टीमनी , अनिल खरटमल , उमेश गायकवाड, शिवाजी हलकवडे, शंकर कोमोल्लु, नितीश लोंढे, रितेश शिवशरण, रोहन कट्टिमनी आदी उपस्थित होते.

# लखपती दिदीमुळे महिलांचे उजळले भाग्य

### उमेदने दिलेल्या प्रोत्साहनामुळे सुरू केला स्वत:चा व्यवसाय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लखेपती दीदी योजनेची घोषणा केली. या योजनेनुसार महिलांना स्वयंरोजगारासाठी आर्थिक मदत म्हणून बिनव्याजी एक ने पाच लाख रुपयांचे कर्ज दिले जाते. आर्थिकदृष्ट्या वांचित असलेल्या महिलांना स्वत:च्या पायावर उभे करण्यासाठी आणि त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी केंद्र सरकारनं ही योजना सुरू केली आहे.

सोलापूरच्या वंचित यस्ताच्या पायावर उभे करण्यासाठी आणि त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी केंद्र सरकारने लखपती दीदी योजना सुरू केली. या योजनेच्या माध्यमातून जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या उमेदनी मागील काही वर्षात १ लाख २१ हजार ३७३ लखपती दीर्दींना स्वतच्या पायावर उभं राहण्यासाठी प्रोत्साहन दिलं अन् त्यांना यशस्वी करून उद्योजिका बनविले. दरम्यान, लखपती दीदी योजनेच्या माध्यमातून महिलांना वेगवेगळ्या प्रकारचे कौशल्य शिकविण्यात आले. या ट्रोलिंगच्या म ाध्यमातून महिलांना स्वत:चा व्यवसाय सुरू करण्यासाठी काही टिप्स देण्यात आल्या . त्यामुळे महिलांनी स्वताचा व्यवसाय उभा करून आत्मनिर्भर बनल्या. ग्रामीण महिलांनी शेती आधारित व बिगर कृषी आधारित व्यवसाय सुरू करण्यावर जास्तीचा भर दिला आहे.

**तालुकानिहाय लखपती दिदी**

| | | |
|---|---|---|
| अक्कलकोट | - | ९४७४ |
| बार्शी | - | १०५४६ |
| करमाळा | - | ८७२४ |
| माढा | - | १०३४१ |
| माळशिरस | - | १९६१७ |
| मंगळवेढा | - | ६८८० |
| मोहोळ | - | १४५०० |
| पंढरपूर | - | १४६०६ |
| सांगोला | - | १३२२१ |
| उत्तर सोलापूर | - | ३४८८ |
| दक्षिण सोलापूर | - | ९९४६ |




**महिलांच्या पंखांना बळ देण्याचं काम**

उमेद अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना रोजगार आणि उपजीविका मिळण्यासाठी प्रयत्न केले. केंद्राच्या लखपती दीदी योजनेमुळे शेकडो महिला स्वतःचा व्यवसाय उभा करून आत्मनिर्भर बनल्या आहेत. उमेदच्या माध्यमातून ग्रामीण महिलांच्या पंखांना बळ देण्याचं आम्ही काम केलं आहे.

**-सचिन चवरे, जिल्हा अभियान व्यवस्थापक, उमेद**

**एक लाखाच्या कर्जातून स्वत:चा व्यवसाय**

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व उमेदच्या माध्यमातून व्यवसाय सुरू करण्यासाठी एक लाखाचे कर्ज घेतले. दूध व्यवसायासाठी घेतलेल्या कर्जातून दोन गाई खरेदी करून दुग्धव्यवसाय सुरू केला आहे. यामुळे दररोज पाचशे ते सहाशे रूपये दूधविक्री सुरू आहे. लखपती दीदीमुळे स्वताचे व्यवसाय सुरू केले आहे.

**- सुजाता घाटे, लाभार्थी महिला , मंद्रुप**

**महिलांकडून व्यवसाय उभारणी**

मिलेटची उत्पादने, मातीची भांडी, शेंगाचटणी, मका चिवडा निर्मिती, ब्युटी पार्लर, शिलाई मशीन उद्योग, हस्तकला निर्मिती, शोभेच्या वस्तू, सेंद्रीय निविष्ठा अन् तेलनिर्मिती केंद्र, मसाले, पापड, लोणचे, चटणी निर्मिती

## विविध गुन्ह्यांमधील आठ जणांवर हद्दपारीची कारवाई

**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

करमाळा पोलिस ठाण्याच्या हद्दीत महिलाविषयी, मालाविषयी, शरीराविषयी, वाळू चोरी, प्राण्यांची वाहतूक करून कत्तल करणाऱ्या आठ गुन्हेगारांवर पोलिसांनी हद्दपारी कारवाईचे आदेश उपविभागीय दंडाधिकारी माढा विभागाने काढले आहेत.

उमेश राजेंद्र गलांडे (रा. चिखलठाण नं. १), शाहरूख आयुब कुरेशी (रा. मौलाली माळ, करमाळा), समाधान उर्फ दत्तात्रय कल्याण लोहार (रा. निमगाव), संपत विठ्ठल मारकड (रा. शेलगाव वांगी), संतोष बिभिषण फरतडे (रा. सातोली), करण अंबादास खरात (रा. सिध्दार्थ नगर, करमाळा), अशपाक बाबासाहेब मुलाणी (रा. कंदर), ओंकार दादासाहेब पुजारी (रा. देवीचा माळ, करमाळा) अशी हद्दीपारांची नावे आहेत. या सर्वांना सोलापूर, पुणे, धाराशिव या जिल्ह्यातून ६ महिने ते २ वर्षांकरीता हद्दपार करण्यात आले आहे. या सर्वांविरुध्द दाखल असलेल्या गुन्ह्यांचा तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्यात आलेले आहेत. त्यांच्या हातून भविष्यात गुन्हे घडून सार्वजनिक शांतात भंग होऊ नये म्हणून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. तरीसुध्दा त्यांच्या गुन्हेगारी वर्तणात सुधारणा झाली नाही. त्यामुळे त्यांच्याविरुध्द हद्दीपारीची कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई अधिक्षक अतुल कुलकर्णी, अ.अधिक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलिस अधिकारी अजित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विनोद घुगे, पोलिस ठाण्याकडील अधिकारी व अमंलदार यांनी केली.

## एसटी स्टॅन्डवर २४ हजारांचा मोबाईल लंपास

**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

शहरातील एस टी स्टॅन्डवर एस टी बसमध्ये चढणाऱ्या तरूणाच्या खिशातील २४ हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरट्याने चोरून नेला. याबाबत अक्षय सुरेश गवळी (वय ३०, रा. कामती, ता. मोहोळ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १२ एप्रिल रोजी दुपारी अक्षय गवळी हा सोलापूर ते मंगळवेढा या एस टी बसमधून गावाकडे जाण्यासाठी एस टी स्टॅन्ड येथे एस टी बसम ध्ये चढत होता. त्यावेळी गर्दीचा फायदा घेत चोरट्याने अक्षय गवळी याच्याकडील २४ हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरून नेला. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार गौडनवरू पुढील तपास करीत आहेत.

## बठाण, उचेठाण वाळू ठेके चालू तर तारापूरचा ठेका लवकरच चालू होणार!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

राष्ट्रीय हरीत लवादाकडून पर्यावरणासाठी कडक निकष असल्याने सोलापूर जिल्ह्यातील वाळू लिलाव गतवर्षांपासून रखडले होते. जाहीर निविदा देवूनही ठेकेदारांचा प्रतिसादही मिळत नव्हता. यंदाही हरित लवादाची नियमावली तीच असली तरी काही जणांना वाळू लिलावासाठी आपले अर्ज दाखल केले आहेत. यातील बठाण, उचेठाण येथे गाळमिश्रीत वाळू उचलण्याचे ठेके देण्यात आले आहेत तर तारापूर येथेही एक ठेका दिला असला तरी त्या ठिकाणचा रस्ता, त्या ठिकाणी लागणारे काटे बसविण्याचे काम चालू असून, हाही ठेका काही दिवसात चालू होणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाच्या संबंधित विभागाकडून मिळाली.



सध्या शहर आणि जिल्ह्यातील नागरिकांना महागडीही वाळू वेळेत मिळत नसल्याने क्रशसॅन्ड वापरूनच बांधकामे चालू आहेत. याबाबत जिल्हा प्रशासनाकडे अनेक नागरिकांनी तक्रारीही केल्या आहेत. हरित लवादाचे निकष कठीण असल्याने स्थानिक वाळू उपसा करण्यासाठी गतवर्षी लिलाव झाले नाहीत. तरीही यावर्षी आता १३ वाळू ठेकेदारांनी रेग्युलर वाळू घाटावरून वाळू घेण्यासाठी अर्ज दिले होते. त्यातील ९ जणांना पर्यावरण विभागाची मंजुरी मिळाली आहे. ऑक्टोंबर ते डिसेंबर अखेरपर्यंत या ठेकेदारांना वाळू घाट देण्यात येणार आहेत. यानंतर सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील नागरिकांना वाळू मोठ्या प्रमाणात मिळणार आहे. तोपर्यंत इतर राज्यातून महागडी वाळू आणून किंवा खडी क्रशरवरील क्रशसॅन्ड वापरून बांधकामे करण्यात येत असल्याचे चित्र दिसून येत आहे. सध्या सोलापूर शहर आणि जिल्ह्याच्या काही भागात एजंटांकडून वाळू चढ्या दराने मिळत आहे, तर काही ठिकाणी अवैध वाळू उपसा सुरू आहे. सरकारने वाळू दर नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला, पण तो अपयशी ठरल्याचेच दिसून येत आहे. यामुळे नागरिकांतून नाराजीही व्यक्त होत दरम्यान, अवैध वाळू उत्खनन आणि तस्करी रोखण्यासाठी पोलिस यंत्रणा आणि महसूल अधिकारीही प्रयत्न करीत आहेत.

### ॲड. राजेश कांबळे खून खटला

## साक्षीदार प्रवीण वाडेची महत्त्वपूर्ण साक्ष नोंदविली

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल -**

ॲड. राजेश कांबळे खून खटल्याच्या सुनावणीस जिल्हा व सत्र न्यायाधीश जे जे मोहिते यांच्यासमोर सुनावणी सुरु झाली असून साक्षीदार प्रविण वाडे याची महत्वपूर्ण साक्ष नोंदविण्यात आली. याची पुढील सुनावणी १९ मे रोजी होणार आहे.

ॲड. राजेश कांबळे यांचा खून केल्याप्रकरणी आरोपी संजय उर्फ बंटी महादेव खरटमल, ॲड सुरेश तारू चव्हाण व श्रीनिवास महांकाळी येलदी यांच्यावर भरलेल्या खटल्याच्या सुनावणी जिल्हा व सत्र न्यायाधीश जे. जे. मोहिते यांच्यासमोर सुरू आहे.या खटल्याच्या सुनावणीच्या वेळी साक्षीदार प्रवीण वाडे याने त्याच्या साक्षीत दिनांक ७ जून २०१९ रोजी त्यांच्या गल्लीतील कोकणे यांच्या घरी जागरण गोंधळाचा कार्यक्रम होता. त्यावेळी आरोपी बंटी हा देखील तिथे होता. त्यावेळेस आरोपी बंटी यांनी साक्षीदार प्रवीण वाडे यास मी व माझा मित्र दोन दिवसात मोठी गेम करणार आहे असे सांगितले होते. त्यावर साक्षीदार प्रवीण याने कसली गेम करणार आहे, असे विचारले असता आरोपी बंटी ने हसत हसत प्रवीण यास तुझी चेष्टा केली असे म्हणाला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी ८ जून २०१९ रोजी सकाळी साडेआकरा वाजता मयत ॲड. राजेश कांबळे, ॲड. सुरेश चव्हाण व संजय उर्फ बंटी खरटमल हे तिघे बंटी याच्या घरासमोर गप्पा मारीत उभे असल्याचे दिसले. म्हणून आरोपी बंटी यास, आज दोन दोन वकील हिकडे आले आहेत, काही पार्टी वगैरे ठेवली आहे का, असे विचारल्यावर दोन्ही वकील हसले व बंटीने वकील साहेबांसाठी जेवण केले आहे असे सांगून ते तिघेही आरोपी बंटी याच्या घरात गेले. अशी महत्त्वपूर्ण साक्ष प्रवीण वाडे यांनी नोंदवली.यावेळी आरोपींच्या वकिलांनी घेतलेल्या उलट तपासात साक्षीदाराने नकारात्मक उत्तरे दिली. या खटल्यात विशेष सरकारी वकील ॲड. उज्वल निकम, मूळ फिर्यादीतर्फे ॲड.मिलिंद थोबडे, ॲड. विनोद सूर्यवंशी तर आरोपींकडून ॲड राजेंद्र फताटे, ॲड नागराज शिंदे, ॲड. जयदीप माने हे काम पाहत आहेत.

## सासूला मारहाण करून बोट फ्रॅक्चर करणाऱ्या सुनेवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल -**

टोपली घेण्यासाठी बोलाविलेल्या गिऱ्हाईकावरून सासूला मारहाण करून हाताच्या करंगळीचे बोट फ्रॅक्चर करणाऱ्या सूनेविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याबाबत काशिबाई शामराव वडतिले (वय ७५, रा. जुना बोरामणी नाका, रविवार पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन भारती सुरेश वडतिले (रा. जुना बोरामणी नाका, रविवार पेठ, सोलापूर) हिच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काशिबाई यांच्या भारती या लहान सून आहेत. १५ एप्रिल रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास जुना बोरामणी नाका येथे काशिबाई या घरी असताना त्यांची मोठी सून विद्या वडतिले ही दुकानासमोर सूप व टोपली तसेच झाडूची विक्रि करीत थांबली होती. त्यावेळी एक गिऱ्हाईक खरेदीसाठी काशिबाई यांच्या मोठ्या सुनेजवळ आले असता काशिबाई यांची लहान सुन भारती ही बाहेर आली व विद्या हीस तु माझ्याकडील गिऱ्हाईक तुझ्याकडे का बोलाविले असे म्हणून तिच्याशी वाद करू लागली. त्यावेळी काशिबाई या भांडण सोडविण्यासाठी गेल्या असता भारती हिने त्यांना शिवीगाळ करून लाकडी बांबूच्या तुकड्याने उजव्या हाताच्या बोटावर, पायाच्या पंजावर व पायावर मारून जखमी केले. यामध्ये काशिबाई यांच्या पायास दुखापत झाली असून उजव्या हाताच्या करंगळीचे बोट फ्रॅक्चर झाले आहे. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार साळुंखे पुढील तपास करीत आहेत.

# अग्निशामक दलाने वर्षभरात विझविल्या ४२९ आगी

### शहरासह बाहेर १५ कोटींची वाचवली मालमत्ता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल -**

महापालिका अग्निशामक दलाने दि. १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ अखेर वर्षभरात शहर हद्दीत एकूण ४२९ आगी विझविल्या आहेत. तर शहराबाहेरच्या हद्दीत वर्षभरात एकूण ३१ आगी विझविल्या आहेत.

शहरासह बाहेर असे एकूण १५ कोटींची मालमत्ता वाचवली आहे. महापालिकेच्या अग्निशमन दलाकडे सर्व मिळून १० गाड्या असून त्यापैकी एक मिनी फायर फायटर वाहन याचा उपयोग अरुंद रस्ते व लहान गल्लीबोळ मधील आग विझविण्याकामी येतो. एक रेस्क्यू व्हॅन आहे. दोन फोम टेंडर फायर फायटर गाड्या याचा उपयोग विमानतळ बंदोबस्त अथवा केमि कलच्या आगी विझवण्या करीता केला जातो.पाच वॉटर टेंडर या गाड्यांचा उपयोग सर्वसाधारण आगी विझवण्याकरीता केला जातो.आपत्ती व मदत पुनर्वसन

**अग्निशमन दलामार्फत २४ तास विनामुल्य सेवा उपलब्ध**



महापालिका हद्दीमध्ये कोणतेही आग व अपघात झाल्यास मदत कार्यास फी द्यावी लागत नाही. सोलापूर शहरातील जनतेसाठी आग व अपघात, आणीबाणी प्रसंगी अग्निशमन दलामार्फत २४ तास विनामुल्य सेवा उपलब्ध आहे, आवाहन महापालिका अग्निशामक दलाचे मुख्य अधिकारी राकेश साळुंके यांनी केले आहे.



मंत्रालय महाराष्ट्र शासन यांच्या कडून महापालिकेला मिनी रेस्क्यू टेंडर विनामुल्य प्राप्त झाले आहे,असे महापालिका अग्निशामक दलाचे मुख्य अधिकारी राकेश साळुंके यांनी सांगितले.

**महापालिका हद्दीतील कामगिरी**

- एकूण वर्षभरात आगी विझविल्या - ४२९,
- एकूण वर्षभरात अपघात ठिकाणी मदत कार्य केले - २२,
- एकूण वर्षभरात आगीमुळे आर्थिक नुकसान झाले - ५४ कोटी ७७ लाख ९२ हजार,
- एकूण वर्षभरात जखमी संख्या - २ ,
- एकूण वर्षभरात मृत्युंची संख्या (आग व अपघातामध्ये) - १५,
- एकूण वर्षभरात आगी पासून मालमत्ता वाचवले अंदाजे - १० कोटी रुपये ,
- स्पेशल कॉल (पक्षी जनावरे ) जीव वाचवले - ७२,
- व्ही.आय.पी. व इतर बंदोबस्त - अंदाजे ५० ते ५५.

**शहरात एकूण ५ ठिकाणी अग्निशामक केंद्रे**

सोलापूर शहरात एकूण ५ ठिकाणी अग्निशामक केंद्रे आहेत. यामध्ये रविवार पेठ, मुख्य अग्निशामक केंद्र फोन नं. १०१, ०२१७२७४०३६४ . भवानी पेठ, अग्निशामक केंद्र फोन नं. ०२१७२७४०३६७. सावरकर मैदान, अग्निशामक केंद्र फोन नं. ०२१७२७४०३६८. होटगी रोड, अग्निशामक केंद्र फोन नं. ८२१७२७४०३८९. अक्कलकोट रोड, MIDC अग्निशामक केंद्र. ०२१७२७४०३६६ व मुख्य अग्निशमन अधिकारी मोबाईल नं. ९४२२४५७९३६.

**वर्षभरात केलेली महापालिका हद्दीबाहेरील कामगिरी**

- एकूण वर्षभरात आगी विझविल्या - ३१,
- एकूण वर्षभरात अपघात ठिकाणी मदत कार्य केले - ७,
- एकूण वर्षभरात आगीमुळे आर्थिक नुकसान झाले - २ कोटी ४९ लाख ६० हजार रुपये,
- एकूण वर्षभरात जखमी संख्या - ००,
- एकूण वर्षभरात मृत्युंची संख्या (आग व अपघातामध्ये)- ७,
- एकूण वर्षभरात आगी पासून मालमत्ता वाचवले - अंदाजे ५ कोटी रुपये,
- व्ही.आय.पी. व इतर बंदोबस्त - ३

दरम्यान, सोलापूर महानगरपालिका अग्निशामक दलाने दि. १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ अखेर वर्षभरात शहरासह शहराच्या हद्दी बाहेरही आपली कामगिरी केली आहे.एकूण वर्षभरात २२ अपघात ठिकाणी मदत कार्य केले. हद्दी बाहेर ७ अपघात ठिकाणी मदत कार्य केले.

## मंगळवेढयातून विवाहिता बेपत्ता

**मंगळवेढा दि.१६ एप्रिल-**

मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागातून एक ४५ वर्षीय विवाहिता बेपत्ता झाली असून तिच्या पतीच्या तक्रारीवरुन पोलीसात या घटनेची नोंद झाल्याने पोलीस त्या बेपत्ता महिलेचा कसून शोध घेत आहेत.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील बेपत्ता विवाहित महिला ४५ वर्षाची असून दि.३ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता तिचे पती शेतात कामाला गेल्यावर त्यांची बेपत्ता पत्नी घरात एकटीच होती. सायंकाळी ६ वाजता पती घरी आल्यावर पत्नी घरी दिसून आली नाही. तिच्या जवळ असलेल्या मोबाईलवर संपर्क केला असता फोन बंद लागला. पतीने आपल्या पत्नीचा गावातील परिसरात व नातेवाईकाकडे शोध घेतला मात्र ती मिळून आली नाही. पतीची खात्री पटली पत्नी ही कोठेतरी निघून गेली असल्याचे दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. तिचे वर्णन पुढील प्रमाणे- रंग गोरा, उंची १५५ सें.मी.,अंगात नेसणेस निळ्या रंगाची साडी,शरीर बांधा मध्यम,बोली भाषा मराठी अशा वर्णनाची स्त्री कोणाच्या निदर्शनास आल्यास त्याने तात्काळ मंगळवेढा पोलीसांशी संपर्क साधावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/




# ईडीच्या कार्यालयासमोर काँग्रेसची जोरदार निदर्शने

**पोलिसांच्या झटापटीत वर्षा गायकवाड जखमी**

**मुंबई, दि. १६ एप्रिल-**
नॅशनल हेराल्ड प्रकरणी सोनिया गांधी व राहुल गांधी यांच्यावर सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) केलेल्या कारवाईच्या निषेधार्थ बुधवारी मुंबई काँग्रेसच्या वतीने बॅलार्ड पियर्ड येथील ईडीच्या कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली.

यावेळी पोलिसांशी झालेल्या झटापटीत मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खा .वर्षा गायकवाड किरकोळ जखमी झाल्या त्यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांची ताब्यात घेत पोलिसांनी आंदोलन मोडीत काढले. ईडीकडून सुडबुद्धीने कारवाई करण्यात आल्याचा आरोप करीत निषेध करण्यासाठी मुंबई काँग्रेस ईडी कार्यालयावर मोर्चा घेऊन जात होते . यावेळी पोलिसांनी खा. वर्षा गायकवाड व सहकाऱ्यांना धक्काबुक्की केली, यात त्यांच्या डोक्याला जखमी झाल्या तर इतरांची धरपकड करण्यात आली. महायुती सरकारने पोलीस बळाचा वापर करून आवाज दडपण्याचा प्रयत्न केला. पण काँग्रेस अशा कारवायांना घाबरत नाही व घाबरणार नाही. या प्रकरणी राज्याचे गृहमंत्रीआणि मुंबई पोलीस आयुक्तांनी माफी मागावी व सरकारने या प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर करवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

### नॅशनल हेराल्डची मालमत्ता हडपणा-या

# काँग्रेसच्या आंदोलनावर भाजपाचे टीकास्त्र

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई, दि.१६ एप्रिल-**
नॅशनल हेराल्डची मालमत्ता हडपणा-या काँग्रेसच्या आंदोलनाला भाजपाचा कडवा विरोध असून काँग्रेसचे हे आंदोलन बेगडी असल्याची टीका भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी बुधवारी भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत केली .

ते म्हणाले,काँग्रेसला आंदोलनाचा अधिकार आहे मात्र कोणाचीही जमीन आणि निधी लुटण्याचा अधिकार नाही. १९३७ साली उदात्त हेतूने ५ हजार स्वातंत्र्यसैनिकांनी सुरू केलेले हे वर्तमानपत्र आणि संबंधित कंपनी कधीही नेहरू, गांधी कुटुंबाची जहागीर नव्हती. नॅशनल हेराल्ड वर्तमानपत्रावर किंवा त्यांच्या मालमत्तेवर गांधी कुटुंबाची मालकी होती,अशा प्रकारची नोंद कुठेच नाही. त्यांना कायदेशीर अधिकार नाही. नॅशनल हेराल्डची मोठी मालमत्ता गिळंकृत करण्याचा कट काँग्रेसने रचून 'यंग इंडिया' नावाची कंपनी स्थापन केली आणि मालमत्तेचा दुरोपयोग करण्यात आला असा आरोप दानवे यांनी केला. कालांतराने २००८ साली आर्थिकदृष्ट्या डबघाईला आल्यामुळे या वर्तमानपत्राचे प्रकाशन थांबले. तेव्हा काँग्रेस पक्षाने 'असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड' या कंपनीला ९० कोटींचा निधी दिला. खरेतर कोणत्याही खासगी संस्थेला पक्षाचा निधी देणे हे बेकायदेशीर असूनही काँग्रेसने हा निधी दिला असे सांगून दानवे पाटील म्हणाले, भाजपा नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी २०१२ साली काँग्रेस नेत्यांवर 'आर्थिक फसवणुकीचा' आरोप करत एक याचिका दाखल केली होती. त्या याचिकेमध्ये 'यंग इंडिया प्रायव्हेट लिमीटेड'ने कवडीमोल रकमेत ९०.२५ कोटी रुपये वसूल करण्याचा उपाय काढला, जो 'नियमांच्या विरोधात' जाणारा आहे असे म्हटले होते. आता या प्रकरणी कोर्टाच्या आदेशानुसार सरकारी यंत्रणेने चौकशी केली असून पुढची कारवाई सुरू आहे असेही त्यांनी सांगितले.

# बीड जिल्ह्यामध्ये १९१ कोटींची 'सीआयआयआयटी' स्थापनेचा निर्णय

**'टाटा टेक्नॉलॉजी'कडून उपमुख्यमंत्री अजित पवारांना पत्र**

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.१६ एप्रिल -**
बीड जिल्ह्यातील विद्यार्थी, युवकांना औद्योगिक प्रशिक्षण, तांत्रिक कौशल्यविकासाच्या माध्यमातून उद्योगक्षम बनविण्यासह रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन अँन्ड ट्रेनींग' अर्थात (सीआयआयआयटी) स्थापन करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी केल्यानंतर अवघ्या दोन आठवड्यांत 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने बीड जिल्ह्यासाठी १९१ कोटी रुपये खर्चून नवीन 'सीआयआयटी' स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. तशा आशयाचे पत्र कंपनीने अजित पवार यांना पाठविले आहे. नव्या सेंटरमधून दरवर्षी ७ हजार युवकांना प्रशिक्षित केले जाईल, त्यातून बीड जिल्ह्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

अजित पवार यांनी २ एप्रिलला बीड जिल्ह्याचा दौऱ्यात बीड जिल्ह्यातील युवकांसाठी उद्योग क्षेत्राच्या मदतीने 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन अँन्ड ट्रेनींग' (सीआयआयआयटी) स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्याअनुषंगाने त्यांनी 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीला पत्र लिहून सहकार्य करण्याचे आवाहन केले होते. त्याला कंपनीने सकारात्मक प्रतिसाद दिला असून बीड जिल्ह्यासाठी १९१ कोटी रुपये खर्चून नवीन 'सीआयआयटी' स्थापन करण्याची तयारी दर्शविली आहे. १९१ कोटींपैकी १५ टक्के म्हणजे ३३ कोटी रुपयांचा खर्च बीड जिल्हा प्रशासन करणार असून उर्वरीत खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' आणि त्यांच्या भागीदार कंपन्या, संस्था उचलणार आहेत. 'सीआयआयआयटी' च्या स्थापनेनंतर पहिल्या तीन वर्षांसाठी प्रशिक्षणाचा खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' उचलणार आहे. त्यानंतर प्रशिक्षणाचा खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' आणि जिल्हा प्रशासन दरवर्षी प्रत्येकी पन्नास टक्क्यांप्रमाणे विभागून उचलणार आहेत. यामुळे बीड जिल्ह्यातील हजारो युवकांना उद्योगक्षेत्राच्या गरजेप्रमाणे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण मिळेल. त्यांची कौशल्यवृद्धी होईल. उद्योगांना त्यांच्या गरजेप्रमाणे प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल. यातून जिल्ह्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# कुणाल कामराला उच्च न्यायालयाचा अटकेपसून दिलासा

## ●तामिळनाडूत जाऊन जबाब नोंदवू शकता : गुन्हा रद्द करण्याचा निर्णय राखीव

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई,दि.१६ एप्रिल**
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील व्यंगात्मक कवितेमुळे चर्चेत आलेल्या कॉमेडियन कुणाल कामराला उच्च न्यायालयाने बुधवारी दिलासा दिला. त्याला अटकेपासून दिलासा देत त्याचा जबाब नोंदवण्यासाठी तुम्ही तामिळनाडूमध्ये जाऊ शकता असे मुंबई पोलिसांना सुचविले तसेच कुणाल कामराज गुन्हा रद्द करण्याची याचिकेवरचा निकाल राखून ठेवत पुढील आदेशापर्यंत त्याला अटक न करण्याचे सूचना दिल्या.



कॉमेडी कुणाल काम राणी गेल्या महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर व्यंगात्मक कविता म्हटली होती त्यानंतर शिंदे समर्थकांनी ज्या ठिकाणी या शोचे शूटिंग झाले होते तेथे जाऊन स्टेडियओची मोडतोड केली होती तसेच त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तामिळनाडू न्यायालयाने या गुन्ह्याबाबत कामराला अटकपूर्व अंतरिम जामीन दिला. मुंबई उच्च न्यायालयात याबाबत वकील आणि लाल मागितल्यानंतर १६ एप्रिल पर्यंत त्याला स्थगिती दिली होती त्याचप्रमाणे गुन्हा रद्द करण्यासाठी दाखल केलेल्या याचिकेवर आज उच्च न्यायालयात सुनावणी झाली यावेळी मुंबई पोलिसांना फटकारताना, ठी त्याच्या अटकेची गरज नाही. तुम्ही त्याचा जबाब तामिळनाडूमध्येही जाऊन नोंदवू शकता, अशा शब्दात मुंबई पोलिसांना फटकारले आहे.

अँड नवरोज सीरवी यांनी कुणाल कामराची बाजू मांडली. तर सरकारी वकील ॲड. हितेन वेणूगावकर यांनी पोलिसांच्या वतीने युक्तीवाद केला. या युक्तीवादरम्यान सरकारी वकील हितेन वेणूगावकर यांनी कुणाल कामरा यांच्या याचिकेत तथ्य नसल्याचे सांगत ती याचिका रद्द करण्याची मागणी केली. पण यावेळी कोर्टाने काही सवाल उपस्थित केले. तुमचे काही लोकं तिथं जाऊनही जबाब नोंदवू शकता. आम्ही जर तुम्हाला तिथे जाऊन जबाब नोंदवण्याची परवागी देत आहोत मग काय हरकत आहे? असेही कोर्टाने म्हटले. यानंतर कोर्टाने कुणाल कामरा हे मुंबईत कधी येतात, असे विचारले. आम्ही तिथल्या स्थानिक पोलिसांच्या मदतीने जबाब नोंदवण्याबाबत सहकार्य करण्याबाबत सूचना करू शकतो. आपण जबाब नोंदवा, पण अटक करण्याची गरज नाही, हे तर पोलिसांनीही आपल्या समन्समध्ये म्हटलं आहे, असे कोर्टाने म्हटले.

कुणाल कामराला दिलेल्या पहिल्या नोटीसनुसार तुम्हाला त्याचा जबाब नोंदवण्यासाठी अटकेची गरज नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने नोंदवले. दरम्यान कुणाल कामरा प्रकरणी मुंबई हायकोर्टात दोन्हीही पक्षांची सुनावणी पूर्ण झाली. त्याला अटक करण्यात येणार नाही, असे कोर्टाने सांगितले. कुणाल कामराच्या प्रकरणात मुंबई हायकोर्टात दोन्ही पक्षांची सुनावणी पूर्ण झाली आहे. पोलिसांना यात फक्त चौकशी करायची आहे. अटक करण्याची गरज नाही असं पोलिसांनी आपल्या पहिल्या नोटीसमध्ये उल्लेख केला आहे. ३५ ( ३) प्रमाणे अटक करण्याची गरज नाही. कुणाल कामराला अटक करण्यात येणार नाही. कोर्टाने आपला निर्णय राखून ठेवला आहे.

**आपण त्यांच्या सुरक्षेची काळजी घेणार का?**
कुणाल कामराने उपमुख्यमंत्र्यांच्या वैयक्तिक जीवनावर टिप्पणी केलेली नाही. त्याने त्यांच्या सरकारी धोरणांवर किंवा निर्णयांवर कोणतीही टीका केलेली नाही. कुणाल कामराचे स्टेटमेंट घेण्याची गरज आहे का? कामरा यांच्या जिवाला धोका असताना आपण चौकशीला त्यांना स्वत: उपस्थित राहण्याबाबत का सांगत आहात ? त्यांच्या जिवाला धोका आहे तर मग आपण त्यांच्या सुरक्षेची काळजी घेणार का? असा सवाल कोर्टाने केला.

# तमाशा व कलाकेंद्र कलावंतांच्या तक्रारी निवारणासाठी समिती गठीत

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. १६ एप्रिल**
तमाशा आणि कलाकेंद्र कलावंतांच्या विविध तक्रारींचे निवारण करण्यासाठी दोन स्वतंत्र समित्यांच्या गठनाचा निर्णय सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी घेतला आहे.

या समित्या तमाशा आणि कलाकेंद्र क्षेत्रातील फडमालक, कलाकार, वादक यांच्यासमोरील समस्या समजून घेऊन, पारंपरिक लोककला टिकवून ठेवण्यासाठी उपाययोजना सुचवतील, अशी माहिती मंत्री ड.शेलार यांनी दिली. तमाशा तक्रार निवारण समितीमध्ये सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक हे अध्यक्ष असणार असून, तमाशा फड मालक रघुवीर खेडकर, तमाशा फड मालक गोपाळ नाना शेषेराव, फड मालक संभाजी जाधव, कलाकार मंगलाताई बनसोडे, कलाकार अतांबर तात्या शिरढोणकर, अभ्यासक गणेश चंदनशिवे, अभ्यासक खंडुराज गायकवाड व सहसंचालक सदस्य म्हणून काम पाहतील. कलाकेंद्र तक्रार निवारण समितीमध्ये संचालक सांस्कृतिक कार्य हे अध्यक्ष असणार असून, कलाकेंद्र मालक बाळासाहेब काळे, कलाकेंद्र मालक अभिजित काळे, कलाकार रेश्मा परितेकर, कलाकार सुरेखा पुणेकर, कलाकार प्रमिला लोदगेकर, कलाकार संघटनेचे धोंडीराम जावळे, अभ्यासक प्रकाश खांडगे व सहसंचालक हे सदस्य म्हणून असतील. या समित्यांचा कार्यकाळ ३० दिवसांचा असून, आवश्यकतेनुसार या क्षेत्रातील इतर अभ्यासक, कलाकार आणि कलाकेंद्र चालक यांनाही पाचारण करण्यात येणार आहे. यांच्या शिफारसीनुसार शासनाकडून निर्णय घेतला जाणार आहे.





# राज्यस्तरीय मराठा वधू-वर मेळाव्यामध्ये २२६० जणांचा सहभाग; ६ हजारांवर नोंदणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**
सामाजिक भावनेतून मराठा समाजातील वधू- वरांसाठी मोफत राज्यस्तरीय सूचक मेळाव्यात २ हजार २६० इच्छुक वधू आणि वरांनी मेळाव्यात सहभाग नोंदवला. तर या मेळाव्याच्या माध्यमातून सुमारे ६ हजारांवर नोंदणी झाली आहे.

या आयोजनाबद्दल आमदार राणा जगजितसिंह पाटील व आमदार कैलास पाटील यांनी संयोजकांचे आभार मानले. धाराशिव शहरातील जिजाऊ चौक येथील स्वयंवर मंगल कार्यालयात झालेल्या मेळाव्यास राज्यातून मराठा समाजाचे वधु-वर व पालक सहभागी झाले होते. पहिल्या सत्राचे उद्‌घाटन आमदार कैलास घाडगे पाटील यांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन व दिपप्रज्वलन करुन करण्यात आले. तसेच प्रातिनिधिक स्वरूपात वधू-वर परिचय पत्र स्वीकारून मेळाव्याचा शुभारंभ करण्यात आला. तर दुपारच्या सत्राचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने उद्घाटन करण्यात आले. या मेळाव्यात पहिल्या सत्रात वधू-वर नोंदणी व दुसऱ्या सत्रात वधू-वरांनी आपला परिचय करून दिला. मेळाव्याच्या माध्यमातून वधु वर मंडळींनी एकमेकांशी संवाद साधला. यावेळी अनेकांचे विवाह जुळून आले. प्रास्ताविक संयोजक अशोक गायकवाड यांनी केले. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, सुधीर पाटील, विक्रम पाटील, उमेश राजेनिंबाळकर, पत्रकार चंद्रसेन देशमुख, प्रीतम बागल, तानाजी जाधव (येडशी), बिभीषण मोरे, ॲड. दर्शन कोळगे, अशोक ठोंबळ, प्रा.अभिमान हंगरकर, विजयकुमार पवार, ॲड. रमेश भोसले, महादेव भोसले, दत्तात्रय भोसले, अर्जुन जाधव, उमाजी गायकवाड, कमलाकर मुंडे, लखन मुंडे, राम मुंडे, विजय देशमुख, अमोल निंबाळकर यांची उपस्थिती होती.



# शेकापचे माजी आमदार सुभाष पाटील यांचा भाजपामध्ये प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.१६ एप्रिल-**
आगामी काळात रायगड जिल्ह्यात भाजपा शतप्रतिशत होणार, असा विश्वास भाजपाचे कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी बुधवारी व्यक्त केला. शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांचे बंधू माजी आमदार पंडितशेठ उर्फ सुभाष पाटील यांनी बुधवारी जि.प. माजी अध्यक्ष आस्वाद पाटील, माजी सभापती चित्रा पाटील, सवाई पाटील यांच्या समवेत भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला.

प्रदेश कार्यालयात झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमावेळी चव्हाण बोलत होते. यावेळी खा. धैर्यशील पाटील, आ. महेश बालदी, आ. प्रशांत ठाकूर, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, अविनाश कोळी, कमलाकर दळवी, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते. पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली देश आणि राज्याचा सर्वांगीण विकास होणार याची हमी असल्याने आपण भाजपामध्ये प्रवेश केल्याचे पाटील यांनी सांगितले. रायगड जिल्ह्याच्या विकासासाठी भाजपाच्या साथीने आगामी काळात जोमाने कार्य करून जिल्ह्यात भाजपाला क्रमांक एकचा पक्ष बनवू असा शब्दही पाटील यांनी दिला. माजी आमदार दिवंगत मीनाक्षी पाटील यांचे पुत्र आस्वाद पाटील यांच्यासह जिल्हा परिषदेचे ६ माजी सभापती, ७ जिल्हा परिषद सदस्य आणि जिल्हा बँकेचे दोन संचालक, आजी माजी ६० सरपंचसह जनार्दन पाटील, सुगंधा पाटील, संजय पाटील, प्रियदर्शनी पाटील, भावना पाटील, संदीप घरत, एकनाथ गायकवाड, वैभव चांदे, वसंत यादव, राजा सानप, स्मिता पाटील, महादेव दिवेकर आदींनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे.

# छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्याचा आदर्श तरुणांनी घ्यावा : कुलगुरू प्रा. महानवर

**सोलापूर विद्यापीठात पोट्रेट चित्रण व वक्तृत्व स्पर्धा!**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६-**
स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्याचा आदर्श घेऊन समाज व देशहितासाठी तरुणांनी काम करावे, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्र. डॉ. प्रकाश महानवर यांनी केले.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राच्यावतीने पोट्रेट चित्रण व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी कुलगुरू प्रा. महानवर हे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. व्ही. बी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यासन केंद्राचे अध्यक्ष व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. सचिन गायकवाड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

कुलगुरू प्रा. महानवर म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात स्थापन होत असलेल्या स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राकडून संपूर्ण देशभरात विविध उपक्रम व कार्यक्रम राबवून एक नावलौकिक प्राप्त करावे.

या माध्यमातून छत्रपती संभाजी महाराजांचा शौर्य गाथा संपूर्ण देशभरातील नव्या पिढीसमोर पोहोचेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. पोट्रेट चित्रण स्पर्धेत ७२ तर वक्तृत्व स्पर्धेत ४२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रमास राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. देवानंद चिलवंत, अध्यासन केंद्राचे डॉ. विकास शिंदे, डॉ. अरुण सोनकांबळे, डॉ. सज्जन पवार, डॉ. बी. जे. लोखंडे, डॉ. अभिजित जगताप, प्रा. धनंजय टाकळीकर आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहायक कुलसचिव तथा अध्यासन केंद्राचे सचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी केले.

# बुरुड समाजाने शासकीय सवलतींचा फायदा घ्यावा : आ. जोरगेवार

**तभा वृत्तसेवा,**
**नागपूर, दि. १६ एप्रिल-**
बुरुड समाजाने आरक्षणाचा, शासकीय सवलतींचा पुरेपूर फायदा घेवून विकास करावा, असे प्रतिपादन आ. जोरगेवार यांनी केले.

नागपूर येथे बुरुड समाजाची राष्ट्रीय परिषद यशस्वी विदर्भ नागपूर नगर बुरुड समाज आणि अखिल भारतीय बांबू कम्युनिटी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नागपुरात राष्ट्रीय परिषद यशस्वीरीत्या संपन्न झाली, त्यावेळी आ. जोरगेवार बोलत होते नागपूर येथे १२ एप्रिल आयोजित करण्यात आलेली राष्ट्रीय परिषद अत्यंत शिस्तबद्ध आणि यशस्वीरीत्या पार पडली. या परिषदेत देशभरातून आलेल्या विविध क्षेत्रांतील बुरुड समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. प्रास्ताविक कार्यक्रम आयोजन समितीचे अध्यक्ष बंडुजी गयनेवार यांनी केले.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी के वेंकट रामडू हे होते. यावेळी संघटनेचे राष्ट्रीय संघटक दशरथ वडतीले, सचिव कुमार मंड्या व खजिनदार रंगय्या यांची विशेष उपस्थिती होती तर प्रमुख पाहुणे एच डी बसवराज माजी आमदार कर्नाटक, प्रमुख पाहुणे म्हणून बुरुड समाजाचे भूषण चंद्रपूर विधानसभा क्षेत्राचे आमदार किशोर जोरगेवार यांनी आपल्या प्रेरणादायी मार्गदर्शनाने उपस्थितांना दिशा दिली. आ. जोरगेवार यांनी आपल्या भाषणात बुरुड समाजाच्या प्रगतीसाठी युवकांनी संघटित होणे, शिक्षण व उद्यमशीलतेकडे वळणे याचे महत्व अधोरेखित केले. त्यांनी स्पष्ट केले की, आपला समाज आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या सक्षम झाला पाहिजे, यासाठी आपण सर्वांनी मिळून कृतीशील भूमिका घ्यावी.

या परिषदेत प्रा. प्रदीप हिरापुरे यांनी बुरुड समाजाचा इतिहास व वर्तमान स्थिती सांगत असताना बुरुड समाज हा आदिवासी पूर्वी अनुसूचित जमाती म्हणून शासकीय दस्तावेजात कुठे कुठे नोंदी आहेत व वर्तमान स्थितीत बुरुड समाजाच्या प्रगती साठी काय काय शासन स्तरावर योजना उपलब्ध आहेत याची माहिती देतांना. बुरुड समाजाने संघटितपणे प्रगती साधण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर सर्व बांबू कारागिरांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे नमूद केले सदर परिषदेत संजय हळदे यांनी तळागाळातील बुरुड समाजासाठी आपण एकत्र येऊन त्यांच्या समस्या सोडवण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. प्रा. डॉ.संतोष साळुंखे यांनी बुरुड समाजाची प्रगतीसाठी काय उपयोजना करायला हव्यात याबदल प्रकाश टाकला . कर्नाटक बुरुड समाजाचे माजी अध्यक्ष श्री हलपेठी यांनी बुरुड , मेदा , मेदारी यांना कर्नाटक राज्यात अनुसूचित जमाती मध्ये समाविष्ट करण्याकरिता शासन स्तरावर कसे प्रयत्न करून आपला हक्क मिळवला यावर प्रकाश टाकले , सदर परिषदेत मेनकाताई कोरडे यांनी सुद्धा बुरुड समाजातील महिलांनी सर्वस्तरावर पुढे येण्याची गरज आहे असे नमूद केले. सदर परिषदेत विविध राज्यातून आलेल्या बांबु कुमुनिटीच्या मान्यवरांनी विविध मुद्द्यावर आपले मत व्यक्त केले यात बुरुड समाजाला अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करण्याच्या मागणीसाठी संघटित प्रयत्न करणे. समाजाच्या राष्ट्रीय प्रतिनिधित्वासाठी 'नेशनल फेडरेशन' स्थापन करण्याचा निर्णय झाला. युवक, महिला, उद्योजक, शेतकरी, नोकरी वर्ग यांच्यासाठी स्वतंत्र मंच स्थापन करून योजनाबद्ध कार्यवाही करण्याचे ठरले. सामाजिक,सांस्कृतिक आणि आर्थिक विकासासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत सखोल चर्चा झाली विजयजी पटकोटवार अध्यक्ष विदर्भ नागपुर नगर बुरुड समाज यांनी संयोजनाचे काम सांभाळले. कार्यक्रमाचे आयोजन समितीचे अध्यक्ष बंडू गयनेवार यांच्या मार्गदर्शनात कार्य केले. सूत्रसंचालन राजेश सुलभेवार व मयूर उरेवार यांनी केले तर आभार प्रदर्शन विजय पटकोटवार यांनी केले.

सोलापूर तरुण भारत

https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# काँग्रेस नेत्यांची न्यायासाठी याचना

"बुडत्याचे पाय खोलात'' अशी आपल्याकडे म्हण आहे. अगदी तसाच प्रकार काँग्रेसच्या बाबतीत घडताना दिसत आहे. हा पक्ष दिवसेंदिवस भ्रष्टाचाराच्या डोहात बुडत चालला आहे. ज्या काँग्रेस अध्यक्षांच्या एका आवाजात देश थांबविण्याची ताकद होती, ज्याच्या एका आवाजाने देश जागा होत असे, स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात आहुती देण्यासाठी पुढे येत असे, त्या पक्षाचे धुरीण आज न्यायासाठी याचना करताना दिसत आहेत. आपले निर्दोषत्व सिद्ध करण्यासाठी वकिलांच्या घराच्या चपला झिजवण्याची पाळी त्यांच्यावर आलेली दिसत आहे. देशात गाजलेल्या नॅशनल हेरॉल्ड आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी (मनी लॉण्ड्रिंग) अंमलबजावणी संचालनालयाने काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी तसेच ओव्हरसिज काँग्रेसचे अध्यक्ष सॅम पित्रोदा आणि सुमन दुबे यांच्यासह काही जणांविरुद्ध दिल्लीच्या साऊथ एव्हेन्यू न्यायालयात आरोपपत्र दाखल केल्याने काँग्रेसमध्ये संतापाची लाट उसळली आहे. बेकायदेशीर पीएमएल कायद्याच्या कलम ४४ आणि ४५ नुसार या सर्वांवर आरोपपत्र दाखल झाले असून, पुढील सुनावणीपूर्वी सर्व कागदपत्रे न्यायालयात सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. काँग्रेस पक्षाने याविरुद्ध आवाज उठवला असून, देशात ठिकाठिकाणी अंमलबाजवणी संचालनालयाच्या कारवाईच्या निषेधार्थ निदर्शने केली जात आहेत. पण या आंदोलनामुळे काँग्रेस नेत्यांवर होत असलेल्या आरोपातून त्यांची सुटका थोडीच होऊ शकते? त्यांना चौकशीला सामोरे जावेच लागणार असून, हा ससेमिरा त्यांच्यामागे निर्दोषत्व सिद्ध होईपर्यंत लागलेलाच राहणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची कारकीर्द सुरू केल्यानंतर देशाला संबोधित करताना सांगितले होते की, या नव्या टर्ममध्ये मी अधिक कठोर वागणार आहे. भ्रष्टाचाऱ्यांना तुरुंगाची हवा खायला लावणार आहे. खरे तर देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्या लोकांनी, संघटनांनी, राजकीय पक्षांनी पुढाकार घेतला, आंदोलने केली, अंगावर लाठ्या झेलल्या, प्रसंगी तुरुंगवास भोगला, त्यात अग्रक्रमाने काँग्रेस पक्षाचे नाव घेतले जाते. स्वातंत्र्याप्राप्तीनंतर याच काँग्रेसने ५५ वर्षे गांधी घराण्यातील नेत्यांच्या पुढाकारात या देशाचे राज्यशकट हाकले. त्या काँग्रेसची आजची झालेली अधोगती देशाचे राजकारण कुठल्या दिशेने गेले हे दर्शवीत आहे. काँग्रेसच्या कार्यकाळात देशात अनेक मोठे घोटाळे झाले. तथापि यातील एकाही घोटाळ्यात गांधी कुटुंबातील व्यक्तीचे नाव आजवर आलेले नव्हते. नॅशनल हेरॉल्ड हे पहिलेच प्रकरण असे आहे, ज्यात गांधी कुटुंबातील सदस्यांची चौकशी झाली, त्यांच्या मालमत्तांवर टांच आली आणि आज त्यांच्याविरुद्ध आरोपपत्रही दाखल झाले. त्यामुळेच हे प्रकरण देशात अधिक चवीने चघळले जात आहे.

आज जी परिस्थिती काँग्रेसच्या पुढाऱ्यांवर आली आहे, त्यासाठी कारणीभूत ठरली सुब्रमण्यम् स्वामी यांची एक याचिका. काँग्रेसने नॅशनल हेरॉल्डच्या माध्यमातून मोठा घोटाळा केल्याची तक्रार त्यांनी २०१२ मध्ये न्यायालयात एका याचिकेद्वारे केली होती. काही काँग्रेस नेत्यांनी चुकीच्या पद्धतीने यंग इंडियन लिमिटेडच्या माध्यमातून असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडची संपत्ती अधिग्रहित केल्याचा आरोप डॉ. स्वामी यांनी याचिकेत केला होता. दिल्लीतील बहादूरशहा जफर मार्गावरील असोसिएटेड जर्नल्सच्या अखत्यारीतील नॅशनल हेरॉल्डची २००० कोटी रुपयांची संपत्ती काँग्रेस नेत्यांनी पाच लाख रुपयांत हडपली होती. २०२१ मध्ये ईडीने या प्रकरणी चौकशी सुरू केली. ज्या वृत्तपत्राच्या आधारे देशात जनजागर करून भ्रष्टाचाऱ्यांची गाळण उडवायची, गरिबांना, शोषितांना आणि मागासांना न्याय मिळवून द्यायचा, त्याच वर्तमानपत्राद्वारे कोट्यवधींचा घोटाळा करून गांधी कुटुंबातील सदस्य मजा मारायला निघाल्याने त्यांच्या प्रामाणिकतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता हे जाणून घ्यायला हवे की, नॅशनल हेरॉल्ड हे प्रकरण आहे करी काय? भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या नेत्यांनी, जवाहरलाल नेहरूंनी आणि इतर समकालीन नेत्यांनी १९३८ मध्ये पक्षाच्या ध्येय-धोरणांच्या प्रचार-प्रसारासाठी नॅशनल हेरॉल्ड हे वृत्तपत्र सुरू केले. या प्रकाशन संस्थेने यासोबतच कौमी आवाज हे ऊर्दू आणि जवजीन हे हिंदी भाषेतील वर्तमानपत्रही सुरू केले. स्वातंत्र्यसंग्रामात या वृत्तपत्राचे कार्य मोलाचे होते. या वृत्तपत्रातून स्वातंत्र्य सैनिकांचा आवाज नागरिकांपर्यंत पोहोचत असे. काँग्रेसची उदारमतवादी ध्येयधोरणे लोकांपर्यंत पोहोचत असत. प्रारंभी पं. जवाहरलाल नेहरू या वृत्तपत्रात संपादकीय लिहायचे आणि ब्रिटिशांवर जोरदार टीका करीत होते. इंग्रजांना हे वृत्तपत्र खटकत होते. १९४२ मध्ये या वृत्तपत्रावर बंदी आणली गेली. १९४५ साली हे वृत्तपत्र पुन्हा सुरू करण्यात आले. १९४७ला देश स्वतंत्र झाल्यानंतर नेहरू देशाचे पंतप्रधान झाले. पंतप्रधानपद स्वीकारल्यानंतर त्यांनी वृत्तपत्राच्या संस्थेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. मात्र, त्यानंतरही वृत्तपत्राचे प्रकाशन सुरूच राहिले. काँग्रेसचे मुखपत्र असेही या वृत्तपत्राला संबोधले जाऊ लागले.

हे वृत्तपत्र सुरू करण्यासाठी प्रकाशक संस्था असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडने भागभांडवल उभारले आणि पक्षाच्या ५००० स्वातंत्र्य सैनिकांनी याचे समभाग घेतले. प्रारंभीच्या काळात हे वर्तमानपत्र संपादकांच्या परखड भूमिकांमुळे गाजले आणि चाललेही. डाव्या विचारांच्या पुरोगामी विचारसरणीच्या नेत्यांचा यावरील प्रभाव लपून राहिला नाही. पण काही काळातच वर्तमानपत्र चालविण्यासाठी लागणारे कसब नसल्याने हा पांढरा हत्ती चालवणे किती कठीण आहे, याची कल्पना काँग्रेसच्या नेत्यांना आली. संपादकीय दुर्लक्षामुळे पुढे या वर्तमानपत्राचा समाज आणि पक्ष कार्यकर्त्यांवरील प्रभावही निमाला. एक काळ तर असा आला की या वृत्तपत्राकडे साऱ्या देशाचेच दुर्लक्ष झाले. मात्र सुब्रमण्यम स्वामींनी याची पोल खोलल्यामुळे आर्थिक घोटाळ्याचे हे प्रकरण जगजाहीर झाले आणि जनसमान्यांमध्ये त्याची जाहीर चर्चा सुरू झाली. स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या गांधी घराण्याची प्रतिमा यामुळे मलिन झाली नसती तरच नवल.

संपादकांना आणि व्यवस्थापनाला वृत्तपत्र छापण्यासाठी उभा करावयाच्या पैशांचे समीकरण न जमल्याने अखेर नॅशनल हेरॉल्ड बंद करावा लागला. पण तत्पूर्वी या वर्तमानपत्राचे व्यवस्थापन ९० कोटींच्या कर्जाच्या ओझ्याखाली दबून गेले होते. त्यावेळी प्रकाशक कंपनी असोसिएटेड जर्नल्सकडे असलेल्या २००० कोटींच्या जमिनीपैकी काही जमीन विकून कर्जाची परतफेड सहज शक्य होती. पण तसे न करता काँग्रेस पक्षाने ९० कोटींचे बिनव्याजी कर्ज या कंपनीला दिले. एखादा राजकीय पक्ष एखाद्या कंपनीला कर्ज देऊ शकतो का? हा प्रश्नही त्यावेळी कोणी नॅशनल हेरॉल्डच्या संचालकांना विचारण्याचे धाडस दाखविले नाही. खरे तर हे वर्तमानपत्र गांधी घराण्याचे एकट्याचे नव्हते. त्यामुळे बिनव्याजी कर्ज देण्याचा निर्णय घेताना संचालक मंडळाची अनुमती घ्यायला हवी होती. पण तशी घेतली गेल्याची नोंद नाही. त्याचवेळी ज्या ५ हजार स्वातंत्र्य सैनिकांकडून भागभांडवल उभारले गेले, त्यांनाही या बिनव्याजी कर्जाबाबत काही कळविले गेले नाही. एकंदरीत कर्ज देणारे सोनिया गांधी, राहुल गांधी यांचा काँग्रेस पक्ष, कर्जाची परतफेड कशी करावी, हे सुचविणारा पक्षही काँग्रेसच आणि यंग इंडियन ही कंपनीही गांधी घराण्याचे वर्चस्व असलेली पूर्वीची ५ लाखांच्या भांडवलाने प्रारंभ झालेली गांधी घराण्याची कंपनी. त्यामुळे आपल्यासाठी, आपल्यामार्फत, आपल्या लोकांनी केलेला घोटाळा असे याचे वर्णन केले तर अतिशयोक्ती होणार नाही. या नियतकालिकाच्या निमित्ताने गांधी कुटुंबाने केलेली लूट निदर्शनास आल्यामुळेच त्यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल झाले आहे. गांधी कुटुंबाने यातून पत्रकारितेची मूल्येच पायदळी तुडविली आहेत. या पृष्ठभूमीवर देशातील जनतेने आता कुठे गेले संविधान आणि त्याच्या नावे देशातील जनतेची सेवा करण्याची घेतलेली प्रतिज्ञा, असा प्रश्न उपस्थित केला तर वावगे वाटून घेऊ नये.

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# उद्याचे स्मार्ट वाहन

वाहन म्हणजे दळणवळणासाठी एक अत्यावश्यक बाब. मानवाने वाहनांचा उपयोग केल्याची नोंद हजारो वर्षांपासून आहे. पहिल्या जलयानाचा शोध सुमारे सात ते नऊ हजार वर्षांपूर्वी लागला असावा असे काही पुराव्यांवरून दिसून आले आहे. सुमारे सात हजार वर्षांपूर्वी समुद्रावर चालू शकेल अशी नौका कुवेतमधील उत्खननात दिसून आली. प्राण्यांचा वापर करून प्रवास ही पद्धत अनेक शतकांपासून लोकप्रिय आहे आणि अजूनही अनेक दुर्गम भागात प्रचलित आहे. उद्याच्या तंत्रमय भविष्यात अनेक पैलू क्रांतिकारी पद्धतीने बदलणार आहेत. अनेक उपकरणे, प्रथा, प्रक्रिया कालबाह्य होतील. मग या सर्व उत्क्रांतीला वाहन कसे अपवाद ठरेल? विसाव्या शतकात संगणक जन्माला आले. पूर्वी खूप मोठ्या आकाराचे हे उपकरण स्वस्त, छोटे आणि शक्तिशाली होत गेले. हे तिन्ही प्रवाह एकाच वेळी कार्यरत होते. पण भौतिक जग आणि संगणकीय बिट, बाईटचे व्हर्च्युअल जग पूर्णपणे वेगळे होते. त्यांची एकमेकात ढवळाढवळ नव्हती. उदा. वाहनाचे फ्युएल गेज फक्त इंधनाची पातळी सांगायचे आणि संपत आले की लाल दिवा लागायचा. पण हे चित्र २०१० नंतर बदलू लागले. २०२६ नंतर तर त्यात आमूलाग्र बदल घडतील. सेलफोन, जीपीएस, इंटरनेट आणि नॅनो ऊर्फ सूक्ष्म तंत्रज्ञान यांच्या संगमातून एक अत्यंत वेगळ्याच प्रकारचे स्मार्ट जग लवकरच आपल्या आसपास दिसू लागणार आहे. संगणकीय सूक्ष्मतंत्राचा प्रवेश प्रत्येक पैलूमध्ये झालेला आढळेल. किंबहुना, तो तसा असणे हेच आपण गृहीत धरू इतक्या सहजपणे हा बदल होणार आहे. याला 'स्मार्ट कॉम्प्युटिंग' म्हटले जाते.

नजीकच्या भविष्यकाळात 'तुमचा हरवलेला चष्मा मोठ्या बेडरूममधल्या पलंगावरील उशीखाली आहे' हे सांगण्याचे काम हे तंत्रज्ञान करेल किंवा एक-दोन किलोमीटरवर वाहतूक-कोंडीची लक्षणे दिसू लागताच गाडीतील जीपीएस यंत्रणा पर्यायी मार्ग शोधेल. तंत्रज्ञानाची प्रगती होत आहे, तसतशी आपली वाहनेही अधिकाधिक स्मार्ट होत चालली आहेत. उद्याचे वाहन केवळ चालवण्यापुरते मर्यादित न राहता, आपले साथीदार, मदतनीस आणि सुरक्षिततेचे संरक्षक ठरणार आहे. उद्याचे स्मार्ट वाहन हे पूर्णपणे इंटरनेटशी जोडलेले असेल. त्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज आणि सेन्सर टेक्नॉलॉजी यांचा वापर असेल. याव्यतिरिक्त, स्मार्ट वाहने प्रदूषणविरहित असतील. ती सौर किंवा विद्युत ऊर्जेवर चालतील. त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण होईल आणि हवामान बदलावरही सकारात्मक परिणाम होईल. उद्याचे स्मार्ट वाहन हे अधिक आरामदायक, कार्यक्षम आणि



सुरक्षित असेल. ते अधिक वैयक्तिकृत आणि कनेक्टेड असेल आणि अधिक लवचीक आणि अत्याधुनिक प्रवास पर्याय प्रदान करेल. उद्याचे वाहन रचनेच्या बाबतीतही बदलत आहे. त्यात सुटे हलते भाग कमी होऊन सिलिकॉन चिप्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज, लिथियम बॅटरी असे अवयव असतील. चालकासमोरचा डॅशबोर्ड अधिकाधिक स्मार्ट होऊन चालकाला बॅटरी किती चार्ज आहे, जवळ चार्जिंग स्टेशन कुठे आहे, ट्रॅफिक जाम व वाहतुकीच्या मार्गाचा स्मार्ट सल्ला इत्यादीची इत्थंभूत माहिती देईल.

उद्याचे स्मार्ट वाहन अधिक आरामदायक आणि कार्यक्षम असेल. ती अधिक प्रगत सस्पेन्शन आणि सीटिंग सिस्टिमसह येतील, जी अधिक आरामदायक प्रवास अनुभव प्रदान करतील. त्यात अधिक कार्यक्षम इंजिन असेल आणि ऊर्जा-सक्षम घटकांसह जास्त मायलेज आणि कमी उत्सर्जन देईल. इथे इलेक्ट्रिक, हायब्रीड असे अनेक घटक समाविष्ट असतील. स्मार्ट वाहने इंटरनेट आणि इतर उपकरणांशी सतत जोडलेली राहतील. यामुळे त्यांना रिअल टाईम वाहतूक माहिती, हवामानाचा अंदाज आणि इतर उपयुक्त माहिती मिळत राहील. उद्याचे स्मार्ट वाहन अधिक सुरक्षित असेल. स्वयंचलित ब्रेकिंग, लेन-बदल करण्यात मदत आणि अंधारात दृष्टी या बाबतीत ते चुणूकदार ठरेल. चालक गाडी ठीक चालवत नसेल तर ते अनेक प्रकारे त्याला सूचना देईल. गजर, झटका, समोरील वाहन वेगात उलट येत असेल तर आपोआप स्टिअरिंग वळवणे, अनेक निकटवर्तीयांना आपत्कालीन संदेश पाठवणे आदी गोष्टी करेल. उद्याचे स्मार्ट वाहन अधिक वैयक्तिकृत असतील. ते अधिक वैयक्तिकृत इंटीरियर आणि एक्सटीरियर डिझाईनसह उपलब्ध होईल, जे चालक आणि प्रवाशांच्या आवडीनिवडी पूर्ण करेल. प्रत्येक व्यक्ती वेगळी असल्यामुळे तिच्या वाहनाबद्दलच्या गरजा वेगळ्या असतात. उद्याचे स्मार्ट डिस्प्ले तंत्रज्ञान तुम्हाला स्मार्टफोन स्क्रीन समोर दाखवेल आणि ध्वनी सहायक तुम्हाला वाहन चालवत असताना संदेश ऐकवेल. त्यातील एआय टूल आपोआप काही निर्णय घेईल. वाहनातील मनोरंजन प्रणाली अधिक प्रगत असेल आणि प्रवाशांना चित्रपट पाहणे, संगीत ऐकणे किंवा ऑनलाईन काम करणे शक्य होईल.

अलिकडच्या काही वर्षांमध्ये वाहतुकीच्या मोठ्या प्रमाणावर विद्युतीकरणाला राष्ट्रीय प्राधान्य मिळाले आहे. नॅशनल इलेक्ट्रिक मोबिलिटी मिशन प्लॅन २०२० आणि केंद्रीय मंत्रिमंडळाने बॅटरीवर चालणाऱ्या दुचाकी, रुग्णवाहिका, ट्रक आणि तीनचाकी वाहनांसाठी दोन वर्षांच्या कालावधीत १०,९०० कोटी रुपयांच्या ई-ड्राईव्ह योजनेला मंजुरी दिली आहे. त्याअंतर्गत ८८,५०० साईट्सवर चार्जिंगची सुविधा उपलब्ध होईल. गेल्या दशकापासून मात्र हायड्रोजनवर चालणाऱ्या वाहनांवरील संशोधनाला गती मिळाली आहे. या वाहनांचा बोलबाला इलेक्ट्रिक कार्सइतका नसला तरी बीएमडब्ल्यू आणि स्टोलांटिस या मोठ्या कंपन्यांनी याबाबतच्या संशोधन आणि विकास कार्यक्रमांमध्ये मोठी गुंतवणूक केल्याने या क्षेत्राकडे अनेकांच्या नजरा वळल्या आहेत. अनेक देशांनी आपापल्या वाहन उत्पादकांवर कमीत कमी धूर सोडून पर्यावरणाची हानी शक्य तितकी टाळणारी इंजिने (व इंधनेही) शोधण्याचे, बनवण्याचे आणि वापरण्याचे बंधन आता घातले आहे. त्यामुळे वाहन उद्योगाच्या पारंपरिक चित्रात आणि एकंदर रचनेमध्ये मोठे बदल होऊ घातले आहेत. हायड्रोजन कार्स हे त्यातलेच एक महत्त्वाचे पाऊल आहे. ही हायड्रोजन कार चालते कशी हे आपण थोडक्यात वाचू. इथे हायड्रोजन पेट्रोलप्रमाणे, थेट जाळला जात नाही तर त्यातील रासायनिक ऊर्जेचे रूपांतर विजेमध्ये केले जाते. या विजेवर गाडीची चाके फिरवली जातात. मुख्य म्हणजे या वाहनाच्या एक्झॉस्ट पाईपमधून धूर नाही तर चक्क पाणी बाहेर येते; परिणामी प्रदूषण शून्य!

हायड्रोजन तीन प्रकारे मिळतो. पेट्रोलियमच्या उत्पादन प्रक्रियेतून, कोळशापासून आणि पाणी व सेंद्रिय कचऱ्यातून. 'ग्रीन' म्हणजेच पर्यावरणस्नेही असल्याने या तिसऱ्या प्रकारच्या हायड्रोजनचा वापर या वाहनांसाठी केला जातो. या सर्व नवसंशोधनांकडे पाहताना कोणतेही एक विशिष्ट तंत्रज्ञानच श्रेष्ठ मानून त्याचाच वापर करण्याचा आग्रह धरण्यापेक्षा, सर्वोत्तम विविध तंत्रांचे एकत्रीकरण करून पर्यावरण रक्षणाचा अंतिम हेतू साध्य करणे महत्त्वाचे आहे, असे म्हणता येईल.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)


## वेध

**नीलेश जोशी**

# जीवघेणे ध्वनिप्रदूषण थांबविण्याची गरज

नाशिक येथे डिजेच्या कर्णकर्कश आवाजामुळे एका तरुणाचा बळी गेल्याची बातमी आली आणि ध्वनिप्रदूषणाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला. खरं म्हणजे नाशिकच्या युवकाच्या शवविच्छेदनातून मृत्यूचे कारण वेगळे असल्याचे जरी समोर आले असले तरी ध्वनिप्रदूषणामुळे होणारे दुष्परिणाम जीवघेणेच ठरत आहेत. ध्वनिप्रदूषणाच्या समस्येने आता राक्षसी रूप धारण केले आहे. हृदय कंपित करणाऱ्या आवाजाचा मानव आणि प्राणी जीवनावर नकारात्मक होणारा परिणाम समजूनही माणूस उमजून का घेत नाही, हा खरा प्रश्न आहे. विशेष म्हणजे शासनाने याबाबत अनेक उपाययोजना कायदे केले आहेत पण दुर्दैवाने त्याची अंमलबजावणी मात्र दिसून येत नाही. त्यामुळे ध्वनिप्रदूषण करणाऱ्यांना या कायद्याची भीती वाटेनाशी झाली आहे. असेच होत राहिले तर मग या ध्वनिप्रदूषणाच्या समस्येला आळा घालावा तरी कोणी याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे.

फार पूर्वी नव्हे तर गत ४० वर्षांपूर्वी आपल्या सर्वांची पहाट ही चिमण्यांच्या सुंदर, सुसह्य व मंजुळ अशा चिवचिवाटाने होत असे. पक्ष्यांच्या या आवाजाने तेव्हा फारच सुखद वाटत होते. पण आता हे चित्र पार बदलले आहे. प्रदूषणामुळे चिमण्यांचा जीवच धोक्यात आला आहे. भौतिक, औद्योगिक प्रगतीचे नवनवीन उच्चांक आम्ही गाठले आहेत. मात्र ही प्रगती साधत असतानाच जीवनाच्या शाश्वत आनंदाला आम्ही मुकतो आहोत का? केवळ आनंद नव्हे तर जीवावर बेतणारे ध्वनिप्रदूषण आम्ही केव्हा थांबविणार आहोत हा खरा प्रश्न आहे. ध्वनिप्रदूषणामुळे हृदयविकार, उच्च रक्तदाब आणि कोरोनरी धमनी रोगाचा धोका वाढतो.



शिवाय मानसिक ताणतणाव, झोपेतील अडथळे, ऐकण्याची क्षमता कमी होणे आणि संज्ञानात्मक क्षमतेत घट होणे यासारखे त्रास होतात. कर्कश आवाजातील डिजेसारख्या यंत्रांनी श्रवणशक्ती कमी होणे, टिनिटस (कानात आवाज येणे) आणि बहिरेपणा होण्याचा धोका वाढला आहे. शिवाय यातून मानसिक ताणतणाव, चिंता, चिडचिड, निराशा पदरी पडत असून शांत राहण्याची गरज असताना स्वभावात विनाकारण आक्रमकता निर्माण होत आहे. त्याशिवाय चांगली झोप न लागणे, झोपेत अडथळे आणि झोपेचे घड्याळ बिघडणे अशा समस्या उभ्या ठाकल्या आहेत.

पुरेशी झोप झाली नाही तर अनेक शारीरिक, मानसिक समस्या उद्भवतात यासह ध्वनिप्रदूषण गर्भवती महिलांसाठी तर अत्यंत धोकादायक आहे. याचा तिच्या गर्भावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो व परिणामी तिच्या होणाऱ्या बाळाला अपंगत्वही येऊ शकते. त्याशिवाय सततच्या भयंकर व कानठळ्या बसविणाऱ्या आवाजामुळे मानवी मज्जासंस्थेवर प्रतिकूल परिणाम होऊन थकवा आणि तणाव वाढतो. ही समस्या येथेच संपत नाही तर याचा वन्यजीवावर प्रतिकूल परिणाम होतो. मानवापेक्षा देवाने प्राणी आणि पशू-पक्षी यांना दूरवरील आवाज ओळखण्याचे वरदान दिले आहे. त्यांना जमिनीच्या हालचालीवरून निसर्गात काय बदल होतात हे कळते आणि अशा कर्कश ध्वनिप्रदूषणाने त्यांच्याही जिवाला धोका असल्याचे त्यांना जाणवते आणि ते मनुष्याविरुद्ध आक्रमक होऊ शकतात. त्यांच्या प्रजननावरही याचा परिणाम होतो, असा इशारा तज्ज्ञांनी वेळोवेळी देत काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. पण त्याला योग्य प्रतिसाद मिळत नाही. हे वास्तव आहे.

ध्वनिप्रदूषण कमी करण्यासाठी कडक नियमावली, जनजागृती, आणि योग्य नियोजन आवश्यक आहे. वाहतूक आणि औद्योगिक क्षेत्रातील आवाजाचे नियंत्रणासह विविध सामाजिक, धार्मिक, कौटुंबिक कार्यक्रमातून होणारा डिजेचा ठणठणाट वेळीच थांबविण्याची गरज आहे. खरं म्हणजे सुमधुर संगीताद्वारे आनंद पेरणे ही आमची परंपरा पुन्हा सुरू करण्याची नितांत आवश्यकता आहे. पण सोबतच सद्य:स्थितीत असलेल्या ध्वनिप्रदूषण या गंभीर आणि जीवघेण्या प्रश्नाचे उत्तर शोधून याबाबतच्या उपाययोजना प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे, हे निश्चित.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# भाजपा-अण्णाद्रमुक मैत्रीचा नवा अध्याय

तामिळनाडूत भाजपा आणि अण्णाद्रमुक यांच्यात पुन्हा एकदा युती झाली आहे. पुन्हा एकदा यासाठी म्हटले की, याआधी राज्यात या दोन पक्षांची युती होती; ज्याचा फायदा दोन्ही पक्षांना मिळत होता. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी भाजपा आणि अण्णाद्रमुक युतीची घोषणा केली. राष्ट्रीय पातळीवर नरेंद्र मोदी तर राज्यात अण्णाद्रमुकचे पलानीसामी यांच्या नेतृत्वात ही युती काम करेल, असे शाह यांनी जाहीर केले.

अण्णाद्रमुकशी युती झाल्यामुळे भाजपाला दक्षिण भारतात तेलगू देसमनंतर आणखी एक मित्रपक्ष मिळाला आहे. याचा फायदा अण्णाद्रमुकला जसा मिळणार तसाच भाजपालाही होणार आहे. त्यामुळे या युतीने राज्याच्या राजकारणात नवा अध्याय सुरू झाला आहे. अण्णाद्रमुकच्या सर्वेसर्वा जयललिता यांच्या काळात भाजपा आणि अण्णाद्रमुक यांची युती होती. शिवसेना आणि अकाली दल बादल यांच्यासारखाच अण्णाद्रमुक हाही भाजपाचा अतिशय जुना मित्रपक्ष होता. या युतीने द्रमुकला अनेक वेळा सत्तेबाहेरही केले होते. पण जयललिता यांच्या मृत्यूनंतर अण्णाद्रमुकमध्ये फूट पडली. परिणामी दोन पक्षांतील संबंधात तणाव निर्माण झाला. त्यामुळे २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या आधीच या दोन पक्षांची युती तुटली. २०२४ ची लोकसभा निवडणूक राज्यात भाजपा आणि अण्णाद्रमुक यांनी वेगवेगळी लढवली आणि त्याचा फटका दोन्ही पक्षांना बसला. द्रमुक आणि काँग्रेस आघाडीला मात्र त्याचा फायदा मिळाला.

राज्यातील लोकसभेच्या ३९ पैकी २२ जागा द्रमुकने जिंकल्या. काँग्रेसला ९ जागा मिळाल्या. अण्णाद्रमुकला एक जागा जिंकता आली. मात्र, भाजपाला एकही जागा मिळाली नाही. एकही जागा जिंकू न शकणाऱ्या भाजपाला राज्यात ९ जागा जिंकणाऱ्या काँग्रेसपेक्षा जास्त मते मिळाली होती. भाजपाच्या मतांची टक्केवारी ११.२४ होती, तर काँग्रेसची १०.६७. सर्वाधिक २२ जागा जिंकणाऱ्या द्रमुकला २६.९३ टक्के मते मिळाली. फक्त एक जागा जिंकणाऱ्या अण्णाद्रमुकला २०.४६ टक्के मते मिळाली होती. भाजपा-अण्णाद्रमुक युतीमुळे या दोन पक्षांच्या मतांची टक्केवारी ३२ होत आहे; ज्याचा फायदा राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीत या युतीला नक्कीच मिळू शकतो.

अण्णाद्रमुक-भाजपा युतीची सुरुवात १९९८ मध्ये पहिल्यांदा झाली. यावर्षीची लोकसभा निवडणूक या दोन्ही पक्षांनी लढवली. अटलबिहारी वाजपेयींच्या नेतृत्वातील भाजपाच्या सरकारला अण्णाद्रमुकने पाठिंबा दिला. मात्र, या दोन पक्षांची युती वर्षभरच टिकली. जून १९९८ मध्ये विशेष न्यायालयाने भ्रष्टाचाराचा आरोप असलेल्या जयललिता आणि त्यांच्या सहकाऱ्यांची जवळपास १२ कोटींची संपत्ती जप्त करण्याचा आदेश दिला. जयललिता यांना जामीन मिळावा म्हणून अण्णाद्रमुकच्या खासदारांनी राज्यातील द्रमुकचे सरकार बरखास्त करण्याची मागणी तेव्हा पंतप्रधान असलेल्या अटलबिहारी वाजपेयींकडे केली. मात्र ही मागणी न्याय्य नसल्यामुळे वाजपेयींनी ती फेटाळली. परिणामी अण्णाद्रमुकने वाजपेयी सरकारचा पाठिंबा काढला. भाजपावर नाराज झालेल्या जयललितांनी १९९९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसशी आघाडी केली. त्यामुळे भाजपाला द्रमुकशी युती करावी लागली.

पाच वर्षांनंतर म्हणजे २००४ मध्ये तामिळनाडूच्या राजकारणात मोठे फेरबदल झाले. द्रमुक रालोआतून बाहेर पडला तर अण्णाद्रमुक पुन्हा भाजपासोबत आला. २००४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपा आणि अण्णाद्रमुक सोबत होते, पण या निवडणुकीत भाजपाचा पराभव झाला; भाजपाला सत्तेबाहेर जावे लागले. अण्णाद्रमुकला लोकसभेची एकही जागा जिंकता आली नाही. त्यामुळे अण्णाद्रमुकने पुन्हा एकदा भाजपासोबतची युती तोडली. २०१६ मध्ये जयललिता यांचा मृत्यू झाला. अण्णाद्रमुकमध्ये नेतृत्वावरून वाद निर्माण झाला. परिणामी त्या पक्षात दोन गट पडले. त्यामुळे अण्णाद्रमुकने पुन्हा एकदा भाजपासमोर मैत्रीचा हात केला. २०१९ ची लोकसभा निवडणूक भाजपा आणि अण्णाद्रमुक यांनी एकत्रित लढवली. राष्ट्रीय पातळीवर भाजपाला लक्षणीय यश मिळाले. मात्र, तामिळनाडूत भाजपाला एकही जागा जिंकता आली नाही, अण्णाद्रमुकला एक जागा मिळाली. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीतही भाजपासोबतची युती कायम ठेवण्याची घोषणा अण्णाद्रमुकचे पलानीसामी आणि पनीरसेल्वम यांनी केली. झालेल्या राज्यातील विधानसभा निवडणुकीत या युतीला जनतेने पुन्हा एकदा नाकारले.

विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर दोन पक्षांतील संबंधात पुन्हा तणाव निर्माण झाला. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपर्यंत हे संबंध पूर्णपणे विकोपाला गेले. तामिळनाडू प्रदेश भाजपा अध्यक्ष के. अण्णामलाई यांना यासाठी जबाबदार धरले गेले. अण्णामलाई यांनी राज्यात स्वबळावर लोकसभा निवडणूक लढवण्याची तयारी केली. मात्र त्यांचा प्रयत्न फसला. लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर अण्णामलाई यांनीही पदावरून पायउतार होण्याची घोषणा केली. भाजपाने प्रदेश भाजपाचे अध्यक्ष म्हणून नैनार नागेंद्रन यांच्या नावाची घोषणा केली. विशेष म्हणजे भाजपात येण्याच्या आधी नागेंद्रन अण्णाद्रमुकमध्ये होते. २०१७ मध्ये ते भाजपात आले. भाजपात आल्यानंतरही अण्णाद्रमुकमधील नेत्यांशी नागेंद्रन यांचे मैत्रीपूर्ण संबंध कायम आहे. भाजपाने अण्णाद्रमुकशी मैत्रीपूर्ण संबंध असणाऱ्या नेत्याच्या हातात तामिळनाडू भाजपाची सूत्रे सोपविली आहे. जयललिता यांच्या मंत्रिमंडळात २००१ ते २००६ या काळात नागेंद्रन मंत्री होते. २००६ आणि २०१६ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. २०११ मध्ये नागेंद्रन विजयी झाले, पण त्यांचा जयललिता यांच्या मंत्रिमंडळात समावेश झाला नाही. जयललिता यांच्या निधनानंतर नागेंद्रन यांनी भाजपात प्रवेश केला. भाजपातर्फे २०१९ आणि २०२४ ची लोकसभा निवडणूक त्यांनी लढवलीही, पण त्यातही त्यांचा पराभव झाला. भाजपा अण्णाद्रमुकशी मैत्री करणार असल्याचे संकेत भाजपाने नागेंद्रन यांच्या नियुक्तीतून दिले होते. भाजपाच्या राष्ट्रीय नेतृत्वाने यावेळी व्यावहारिक निर्णय घेत अण्णाद्रमुकशी युती करण्याची घोषणा केली. याची घोषणा गृहमंत्री अमित शाह यांनी केल्यामुळे हा निर्णय भाजपाच्या नेतृत्वाचा असल्याचे दिसून येते.

दक्षिण भारतात भाजपाला आपला विस्तार करायचा आहे, पण दक्षिण भारतातील केरळ, कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडू या पाचपैकी एकाही राज्यात सध्या भाजपाची सत्ता नाही. कर्नाटकमध्ये काही वर्षांपूर्वी भाजपाने विजय मिळविला होता, पण कर्नाटक वगळता दक्षिण भारतातील एकाही राज्यात भाजपाची डाळ कधी शिजली नाही. त्यामुळे आता भाजपाने दक्षिण भारतात मित्रपक्षांना सोबत घेण्याचा निर्णय घेतला आहे; त्या मालिकेत आंध्रप्रदेशात भाजपाने तेलगू देसमचे चंद्राबाबू नायडू यांना सोबत घेतले. आता तामिळनाडूत अण्णाद्रमुकसमोर पुन्हा मैत्रीचा हात केला आहे. काही मुद्यावर तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी घेतलेल्या निर्णयामुळे राज्यातील जनतेत नाराजी आहे. त्याचा फायदा आगामी विधानसभा निवडणुकीत भाजपा आणि अण्णाद्रमुक आघाडीला मिळू शकतो. त्यामुळे भाजपाच्या राष्ट्रीय नेतृत्वाला या युतीकडून मोठ्या अपेक्षा आहेत.

९८८१७१७८१७

### पर्यावरणपूरक पत्रावळ, द्रोण लुप्त होण्याच्या मार्गावर!

राज्यासह देशात लग्नसराई व धार्मिक कार्यक्रमांमध्ये प्लॅस्टिक, कागदी व थर्माकोलच्या पत्रावळीचा वापर मोठ्या प्रमाणात होताना दिसून येतो आणि या पत्रावळी मानवाच्या व पशूंच्या आरोग्यासाठी दिवसेंदिवस विष बनताना दिसत आहे. अनेक वर्षांपासून झाडांच्या पानांच्या पत्रावळीवर जेवणाची परंपरा चालत होती. यातूनच ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात रोजगारसुद्धा मिळत असे. परंतु आता अत्याधुनिक युगात यंत्राच्या साहाय्याने प्लॅस्टिक, कागदी व थर्माकोल यावर आवरण असलेल्या पत्रावळी व द्रोण विक्रीला आल्याने आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत घातक सिद्ध होत आहे. तरीही आपण त्याचा वापर सर्रास करीत आहोत, ही अत्यंत गंभीर बाब आहे. राज्यासह देशात आपण निसर्गावर अहोरात्र बेछूट अत्याचार, अन्याय आणि हत्या करीत असल्याने अनेक महत्त्वपूर्ण वृक्ष नामशेष होत आहे. याचे जिवंत उदाहरण म्हणजे आपण पूर्वी ज्या पर्यावरणपूरक पत्रावळीत आनंदाने जेवणाचा आस्वाद घेत होतो, तो आज पूर्णपणे संपुष्टात आला आहे. आज कागदी पत्रावळी, द्रोण, प्लॅस्टिक पत्रावळी, द्रोण, थर्माकोलच्या पत्रावळी-द्रोण या वस्तूंनी संपूर्णपणे जेवणाच्या पर्यावरणपूरक पत्रावळी -द्रोणावर हल्ला करून नामशेष केला आहे. आज वृक्षतोडीमुळे आपल्यावर अशी दुर्गती आली आहे. पानांच्या पत्रावळीत केलेले जेवण पचनास हलके, रुचकर आणि आनंददायी वाटायचे. त्यामुळे पत्रावळीतील जेवणाचा स्वाद निराळाच होता. ज्या वनस्पतींपासून किंवा वृक्षांपासून ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मिती होऊ शकते अशा वृक्षांना पुनरुज्जीवित करून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला पाहिजे. यामुळे पर्यावरणपूरक पत्रावळी-द्रोण तर मिळतीलच सोबतच वाढत्या हवामानातील बदलांवर मात करण्यास थोडी का होईना मदत अवश्य होईल.

**रमेश लांजेवार**/९९२१६९०७७९

### दीनदयाल नगरात भुरट्या चोरांचा सुळसळाट

उन्हाळा सुरू झाला की भुरटे चोर बिळातून बाहेर निघतात व छोट्या मोठ्या चोरी करून पसार होतात. सध्या

## वाचक पत्रे

दीनदयालनगर वस्तीमध्ये हे प्रकार वाढले आहेत. दोन-तीन दिवसांपूर्वी आमच्या घरी काही कारणास्तव खाली पार्किंगमध्ये ठेवलेली ॲल्युमिनियमची शिडी गायब झाली, त्याच दरम्यान वस्तीत राहणारे उबगडे यांच्याकडील अंगणात ठेवलेल्या बादल्या चोरीस गेल्या. ऊन वाढल्यामुळे कूलर सुरू झाले आहेत, ग्रीन नेटमुळे घराचा बराचसा भाग झाकलेला असतो व दुपारी सामसूम झाली की या चोरांच्या कारवाया सुरू होतात. तेव्हा दीनदयाल वस्तीतील नागरिकांनी जागरूक राहावे, सतर्क राहावे. अशा छोट्या मोठ्या चोरींची पोलिस तक्रार पण निरर्थक असते. कारण ते एकच सल्ला देणार की सीसीटीव्ही लावा. शेवटी असे छोटे छोटे नुकसान निमूटपणे सहन करून समाधानी राहावे व गेलेली वस्तू आपल्यासाठी नव्हतीच हा साधा सरळ उच्च विचार मनाशी बाळगून जीवनरथ चालता ठेवावा अन्यथा सीसीटीव्ही लावून आपले समाधान करावे.

**राजीव दारव्हेकर**/९०९६३२२२००

### लोक विरोधक किंवा शत्रू का होतात?

समाजात काही व्यक्ती सामाजिक बांधिलकी जपून स्वतःला समाजाच्या भल्यासाठी, समाजाच्या हितासाठी, दीन, दुबळे, गोरगरीब, दिव्यांग यांच्या भल्यासाठी स्वतःला झोकून देऊन सतत कार्यरत असतात. अशा व्यक्तींचा स्वतःचा कोणताही फायदा वा लाभ नसतो. मात्र त्यांचा पिंड सामाजिक काम करण्याचा असतो. 'कोणी वंदो अथवा कोणी निंदो' ते सतत छोटे-मोठे समाजकार्य करीत असतात. यामुळे समाजातील प्रत्येक घटकाच्या ओठावर त्या व्यक्तीचे नाव असते. ही समाजकार्य करणारी व्यक्ती आपल्या सामाजिक कामात सदैव मग्न असते, ती व्यक्ती सामाजिक दायित्व जपत असते. शासनाच्या जनकल्याणकारी योजनांचा लाभ या दीन, दुबळ्यांना मिळवून देते, पर्यावरण बाबत सतत जागरूकता करीत असते, स्वच्छता असेल, माझी वसुंधरा असेल किंवा 'माझं गाव- माझा विकास' या योजना तळागालातल्या घटकांपर्यंत पोहचवून त्यांच्या कृतीत उतरवत असते. अशा व्यक्तीचे सर्वच स्तरावर कौतुक होत असते.

शासन व काही सामाजिक दूरदृष्टीअसलेले मंडळ, संस्था स्वतःहून दखल घेऊन अशा सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या कार्यकर्त्यांच्या कामाचा विविध पुरस्कार देऊन गौरव करीत असते. हे समाजातील बहुतांश लोकांना सहन होत नाही. समाजकार्य करणाऱ्या व्यक्तीचा दोष नसला तरी किंवा काही चुकत नसले तरी काही लोक अशा व्यक्तीकडे बोट उचलतात.

या सामाजिक कार्य करणाऱ्याची प्रतिष्ठा त्याच्या समाजसेवेमुळे सतत वाढत असते. या सामाजिक बांधिलकी जपून कार्य करणाऱ्या व्यक्तीला सतत प्रसिद्धी मिळत असते, त्यामुळे अशा व्यक्तीचे विरोधक, शत्रू मोठ्या संख्येने वाढत असतात. मात्र कितीही विरोधक वाढोत, कितीही शत्रू वाढोत सामाजिक बंधिलकी जपणाऱ्या समाजसेवकाने आपला समाजसेवेचा पिंड कदापिही त्यागू नये.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com

तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

# सोलापूर शहर प्रारूप विकास आराखडा : दुसऱ्या दिवशी ३५० हरकतींवर झाली सुनावणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

सोलापूर शहर प्रारूप विकास आराखड्यावर महापालिकेकडे प्राप्त झालेल्या तक्रारी, सूचना, हरकतीवर चार सदस्यांच्या समितीकडून सुनावणी सुरू झाली. दुसऱ्या दिवशी बुधवार दि. १६ एप्रिल रोजी देगाव, केगाव, बाळे, शिवाजीनगर, बसवेश्वर नगर या भागातील एकूण ३७८ पैकी ३५० हरकतीवर सुनावणी घेण्यात आली.

सोलापूर शहराची प्रारूप विकास योजना मुक्त अधिनियमाचे एमआर अँड टीपी ॲक्ट १९६६ चे कलम २६ (१) अन्वय प्रसिद्ध झाल्यानंतर विहित कालावधीत जनतेकडून प्राप्त सूचना व हरकतींवर सुनावणी घेण्यासाठी मुक्त अधिनियमाचे कलम २८ (२) अन्वय सोलापूर महापालिकेने शासनाने नेमणूक केलेल्या सदस्यांच्या नियोजन समितीचे दि. ११ एप्रिल २०२५ पासून गठन केले आहे.

**यांचा आहे या समितीमध्ये सहभाग**

नगररचना विभागाचे सेवानिवृत्त उपसंचालक संजय सावजी, सेवानिवृत्त उपसंचालक दत्तात्रय पवार, सेवानिवृत्त सहाय्यक संचालक अनिलकुमार पाटील आणि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. श्रीकांत जहागीरदार चौघांचा समितीमध्ये सहभाग आहे.

सोलापूर शहर विकास आराखड्यात शहरातील विविध भागातील ९२१ जागांवर आरक्षण टाकण्यात आले आहे. पुढील २० वर्षासाठीच्या शहर प्रारूप विकास आराखड्यावर महापालिकेकडे प्राप्त झालेल्या ३३७५ तक्रारी, सूचना, हरकती यावर चार सदस्यांच्या समितीकडून दि. १५ एप्रिल पासून ते दि. २३ मे २०२५ पर्यंत करण्यात येणार आहे. अंतिम निर्णय मे अखेर होऊन जूनमध्ये शासनाच्या मंजुरीनंतर शहर विकास आराखडा जाहीर करण्यात येणार आहे.

दरम्यान, बुधवार दि. १६ एप्रिल रोजी देगाव, केगाव, बाळे, शिवाजीनगर, बसवेश्वर नगर या भागातील हरकती व सूचनांवर सुनावणी झाली. एकूण ३७८ पैकी ३५० हरकतीवर सुनावणी घेण्यात आली. या समितीमधील नगररचना विभागाचे सेवानिवृत्त उपसंचालक संजय सावजी, सेवानिवृत्त उपसंचालक दत्तात्रय पवार, सेवानिवृत्त सहाय्यक संचालक अनिलकुमार पाटील आणि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. श्रीकांत जहागीरदार या चार अधिकाऱ्यांनी सुनावणी घेतली. संबंधिताचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. नगररचना विभागाचे उपसंचालक म नीष भिष्णुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली नेटके नियोजन करण्यात आले होते.

दरम्यान, दि. १७ एप्रिल रोजी सोरेगाव, प्रताप नगर, नेहरूनगर, कुमठे, सलगरवाडी, रामवाडी, दि. २८ एप्रिल रोजी न्यू पाच्छापेठ, तेलंगी पाच्छापेठ, साखरपेठ, जोडभावी पेठ, गुरुवार पेठ, बेगम पेठ, मुस्लिम पाच्छापेठ, गणेश पेठ, मंगळवार पेठ, दि. २९ एप्रिल रोजी रेल्वे लाईन्स, उत्तर सदर बाजार, दक्षिण सदर बाजार, सिव्हिल लाईन्स, मोदी, दि. ३० एप्रिल रोजी टीपी- ४, लक्ष्मी पेठ, मुरारजी पेठ, सिद्धेश्वर पेठ, टीपी- २, दि. २० मे रोजी शनिवार पेठ, दक्षिण कसबा, बुधवार पेठ, गोल्डफिंच पेठ, गावठाण, शुक्रवार पेठ, भवानी पेठ, विजापूर रोड, दि. २१ मे रोजी मजरेवाडी, दि. २२ मे रोजी कसबे सोलापूर आणि दि. २३ मे रोजी राहिलेले इतर सर्व पेठ आणि भागांच्या सुनावण्या घेण्यात येणार आहे. या नियोजनाप्रमाणे त्या त्या विभाग आणि पेठ निहाय परिसरातील तक्रारदार हरकतदार आणि दावेदार यांना सुनावणीसाठी हजर राहण्याच्या नोटिसा देण्यात आल्या आहेत. सुनावणी संबंधित नागरिकांनी त्यांच्या सूचना व हरकती बाबत आवश्यक त्या कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हरकती आणि दाव्यांवरील सुनावणी घेऊन निर्णय देण्यासाठीच्या प्रक्रियेला तब्बल दोन महिन्याचा कालावधी लागणार आहे.



## मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात डॉ. आंबेडकर यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

नवी पेठ येथील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस महापालिकेचे सहाय्यक आयुक्त तथा प्रशासन अधिकारी गिरीष पंडित यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख, लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक संतोष बुलबुले, भगवान मुंढे सुरेश कासार, रजनी राऊळ, निलोपर सय्यद, महेश वालावलकर, अविनाश शिंदे, अमोल गायकवाड, सचिन जाधवर, नागेश जगदाळे,रूपाली कंची, सतीश सरवदे, आनंद हिरेमठ,भालचंद्र साखरे, सायली ढोले, नासिर खान, सचिन साखरे आदी उपस्थित होते.

**CHANGE IN NAME**

I hereby declare that my old name **AAISHWARYA SATISH BIDRI** in changed to my new name **AISHWARYA SATISH BIDRI**
Affidavit No. 6317
Date - 04/04/2025
M. No. 9595954010

## धूम स्टाईलने दीड तोळ्याचे मंगळसूत्र लंपास

**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

देवदर्शन करून घराकडे पाणी जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दीड तोळ्याचे मंगळसूत्र दोघां चोरट्यांनी धूम स्टाईलने जबरदस्तीने चोरून नेले. ही घटना मंगळवारी सायंकाळी भवानी पेठेतील दिप हॉस्पीटलसमोर घडली. याबाबत रेखा सिध्देश्वर बिजली (वय ३३, रा. मंत्री चंडक नगर, भवानी पेठ, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रेखा बिजली व त्यांच्या घराशेजारी राहणारे मंगल गोपाळ वागेलू तसेच सोनम गायकवाड हे सर्वजण मंगळवारी सायंकाळी रूपाभवानी देवी मंदीर येथे दर्शनासाठी गेले होते. दर्शन करून ते सर्वजण पायी परत घराकडे येत होते. त्यावेळी भवानी पेठेतील दिप हॉस्पीटलसमोरील रस्त्यावरून जात असताना तिथे थांबलेल्या एका चोरट्याने रेखा बिजली यांच्या गळ्यातील ७० हजार रुपये किंमतीचे दीड तोळ्याचे सोन्याचे गंठण जबरदस्तीने हिसका मारून चोरून घेऊन त्याच्या साथीदाराने आणलेल्या दुचाकीवर बसून पळून गेला. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक महाडीक पुढील तपास करीत आहेत.

**मोहोळ नगरपरिषद कार्यालय,**
**फेर ई-निविदा सूचना प्रसिद्धीकरण**

जा.क्र.मोनप/बांध/२०२५/१७३ दिनांक-१६/०४/२०२५

मुख्याधिकारी, मोहोळ नगरपरिषद यांचेकडून शासनाच्या विविध योजनेअंतर्गत हाती घेतलेल्या विकास कामाची ई-निविदा शासनाकडील नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार/अर्हताप्राप्त निविदा धारकाकडून तांत्रिक ब-१ नमुन्यात स्पर्धात्मक निविदा ई-निविदेद्वारे मागविण्यात येत आहे. सदरच्या ई-निविदेमध्ये एकूण २ कामे आहेत. निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध दि.१७/०४/२०२५ ते दि.२५/०४/२०२५ पर्यंत सायं.०५.०० वाजेपर्यंत असून कामाच्या किंमतीबाबत तसेच निविदा किंमत, निविदा स्वीकृती. अटी व शर्थी इत्यादींची माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरती उपलब्ध आहे.

**सही/-**
**(डॉ. योगेश डोके)**
प्रशासक तथा मुख्याधिकारी
मोहोळ नगरपरिषद, मोहोळ

**जाहीरप्रसिध्दीकरण**

**ॲड. विजय अ. हर्डीकर**
अक्कलकोट

**सिव्हील एम. ए. नं. ०५/२०२५**

**अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ञ ज्यु.डी. यांचे कोर्टात**

**१) श्री. राजेंद्र प्रभु इंगळे**
**२) श्री गजेंद्र प्रभु इंगळे** **--अर्जदार**
दोघे रा. देशमुख गल्ली, स्वामी समर्थ मंदिराजवळ, अक्कलकोट, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**विरुध्द**
कोणीही नाही -- **सामनेवाले**

ज्या अर्थी वरील अर्जदारानी या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज नं. ०५/२०२५ हा दि. बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र प्रमाणे दाखल केला असून यातील अर्जदार नं. १ व २ यांचे बंधू कै. हरिश्चंद्र प्रभु इंगळे हे दि. १९/११/२०१३ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार हेच मयत हरिश्चंद्र प्रभु इंगळे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारसा प्रमाणपत्र मिळावे म्हणून यातील अर्जदारांनी मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा यातील अर्जदार हे मयत हरिश्चंद्र प्रभु इंगळे यांचे वारस असलेबाबत कोणाचे काही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी हा जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दिनांक १३/०६/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल.

हे जाहीर प्रसिध्दीकरण केले. ता. १५/०४/२०२५

आज रोजी मे. कोर्टाच्या हुकुमाप्रमाणे माझ्या सहीने प्रसिध्द केले.
शिक्का
**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी फौजदारी न्यायालय**
**अक्कलकोट**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डिाा व सब डिाा सोलापूर, तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे कर्देहळ्ळी येथील ग्रामपंचायत मिळकत नंबर १५८ यांसी क्षेत्र पुर्वपश्चिम ११ फुट व दक्षिणोत्तर २१ फुट असे एकुण २३१ चौ. फुट अथवा २१.४६ चौ.मी. यांसी चतुः सिमा पुर्वेस : ग्रामपंचायत मिळकत नं. १५९, दक्षिणेस : रस्ता, पश्चिमेस : ग्रामपंचायत मिळकत नं. १५७, उत्तरेस : रस्ता. येणेप्रमाणे वर नमुद केलेली मिळकत व त्यातील तदंगभुत वस्तसुह. या मिळकतीबाबत झालेले रजि. खरेदीखत दस्त नंबर ११५६/१९९५ तारीख १५/०६/१९९५ चे पावतीसह इंडेक्स-२ हे सर्व कागदपत्रे दिनांक ०२/०४/२०२५ रोजी कर्देहळ्ळी शिवारात सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास कोठेतरी पडून आमचे अशिल लक्ष्मण अंबादास जाधव यांच्याकडून गहाळ झालेले आहेत. त्याबाबत आमचे अशिलांनी रितसर वळसंग, पोलीस स्टेशनला तक्रार दिलेली आहे. त्याचा गहाळ रजिस्टर नंबर ००६६/२०२५ दिनांक ११/०४/२०२५ असा आहे.

वर नमुद केलेले दस्त कोणास सापडल्यास अथवा मिळून आल्यास त्यांनी खालील नमुद पत्यावर संपर्क साधुन सदर दस्त ७ दिवसांच्या आत देण्याचे करावे म्हणुन ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे.

ही जाहीर नोटीस दिली तारीख : १७/०४/२०२५.

**सही/-**
अशिला तर्फे ॲडव्होकेट
**ॲड. अविराज वि.पाटील**
रा.४९/अ-१, सिंहगड, भैरव कॉलनी,
दमाणी नगर, सोलापूर
मोबा. नं.८००७३१०३२६

**महाळुंग श्रीपूर नगरपंचायत, महाळुंग श्रीपूर**
**जाहीर प्रसिध्दीकरण**

जा. क्र १२/२०२५ दिनांक १६/०४/२०२५

या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे सर्व पुरवठादार यांना कळविण्यात येते की, महाळुंग श्रीपूर नगरपंचायत पाणी पुरवठा विभागाकरीता खालील तक्त्यातील साहित्या प्रमाणे दरपत्रक मागविणेत येत आहेत. पुढीलप्रमाणे सविस्तर बाबनिहाय माहिती व निविदा नगरपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत दिनांक १७/०४/२०२५ से २२/०४/२०२५ रोजी पर्यंत उपलब्ध राहील तपशील प्रमाणे रक्कम भरलेल्या दरपत्रके बंद लिफाफा पध्दतीत नगरपंचायत कार्यालयात दिनांक १७/०४/२०२५ ते दि.२२/०४/२०२५ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत स्वीकारल्या जातील मुदती नंतर आलेले दरपत्रके विचारात घेतल्या जाणार नाहीत. एक व कोणतीही दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार नगरपंचायतकडून राखुन ठेवण्यात आलेला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | बयाणा रक्कम | निविदा फी |
|---|---|---|---|
| १. | महाळुंग श्रीपूर नगरपंचायत पाणी पुरवठा विभागाकरीता<br>१. १२.५ HP पाणबुडी मोटार मंच, १० HP पाणबुडी मोटार संच<br>४ इंची HDP पाईप ३५ मीटर<br>३ इंची HDP पाईप ४५ मीटर, व यासाठी लागणारे इतर फिटींग साहित्य,<br>२. बावरीपुल पाणी पुरवठयाकरता २ इंची HDP ६०० फुट पाईपलाईन साहित्यासह खोदाईसह करणेबाबत.<br>महाळुंग श्रीपुर नगरपंचायत जम दाडे प्लॉटमध्ये नविन ३ इंची ९०० फुट पाईपलाईन साहित्यासह खोदाईसह करणेबाबत. | १०००/- | ५००/- |

टिप :- अ) लिफाफा क्र.१ मध्ये पुढील कागदपत्रे जोडावीत. १. बयाना रक्कम भरलेली पावाती. लिफाफा क्र. २ मध्ये अक्षरी व अंकात नमुद केलेले दर व योग्य पध्दतीने निविदाधारकांचे नमुद केलेप्रमाणे सांक्षाकित केलेल्या मुळ प्रतीतील निविदा दर पत्रक द्यावे.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
महाळुंग श्रीपूर नगरपंचायत

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः मौजे बार्शी शहर व आसपासचे लोकांना खाली सही करणार आमचे आशिल यांचे तर्फे त्यांनी माहिती दिलेवरून व सांगितलेवरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे बार्शी शहर हद्दीतील गट नं.८५२/२/क (जुना गट नं.८४६/२/३) पैकी प्लॉट नं. ८ याचे क्षेत्र ०० हे.०२.७५ आर यासी चतुःसिमा पुर्वेस प्लॉट नं. ९, दक्षिणेस प्लॉट नं.७, पश्चिमेस -रस्ता, उत्तरेस- जुना गट नं. ८४६/२/२ ची जमीन, येणेप्रमाणे वर्णनाचा खुला प्लॉट आतील दगड माती, जल तरु, काष्ट, पाषाण, झाडे, झुडूपे, यासह आतील मालकीचे व वागणुकीचे व वहिवाटीचे अधिकारासह जाणेयेणेचे हक्कासह.

वर वर्णन केलेली मिळकत उत्कर्ष अविनाश सावळे व गीतांजली अविनाश सावळे यांचे मालकीची व वहिवाटीची आहे व त्याप्रमाणे त्यांची हक्कपत्रकी नोंद आहे. त्यांनी सदर मिळकत त्यांचे कायदेशीर गरजेपोटी आमचे आशिलास खरेदी देणेचे ठरविलेले आहे. तसेच उपरोक्त वर्णन केलेली मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व विश्वास आमचे आशिलास दिलेला आहे. आमचे अशिल हे ठरलेल्या कराराप्रमाणे मुदतीत खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचेही हक्कात पूर्व खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, लिज, बक्षिस, कर्ज, बोजा, कब्जा, अग्रहक्क इत्यादी कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर संपर्क करुन आमचेकडे लेखी हरकत द्यावी कोणाचीही हरकत तक्रार सदर मुदतीत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध निजोखमी आहे असे समजून आमचे आशिल हे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर मात्र कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत, तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे ही जाहीर नोटीस दिली. ता. १५/०४/२०२५.

**अशिल**

**सही/-**
**ॲड. संदिप महादेव भोसले**
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी
मो.नं. ८०८७११९१००
अशिलातर्फे ॲडव्होकेट

**अधिसूचना**
**जिल्हाधिकारी, यांचेकडून**
**(महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६)**

क्रमांक : २०२५/भूसंपादन/कार्या-१/एस.आर.२८/२०१९/आर. आर. १०८५ दि. ५/०४/२०२५

ज्याअर्थी, सोलापूर महानगरपालिकेची विकास योजना (दु.सु.) (यापुढे उक्त विकास योजना/सुधारित विकास योजना म्हणून संबोधिलेली) शासनाने नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस/१७०१/२७३५/प्र.क्र.४१०३/यूडी-१३, दि.२८/१०/२००४, अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ पोटकलम (१), अन्वये (यापूढे उक्त महाराष्ट्र अधिनियम म्हणून संबोधिलेला) मंजूर केली असून, ती दि. १५/१२/२००४ पासून अंमलात आले आहे;

ज्याअर्थी, सोलापूर महानगरपालिका अंतर्गत, जुना बोरामणी नाका ते मोरारका बंगला फ्लाय ओव्हर सेक्शन-२ पर्यंतचा प्रकल्प संपूर्णपणे सोलापूर महानगरपालिका शहर हद्दीतून जात आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या सेक्शन २ प्रकल्प, शहरातील २१.०० मी. रुंदीच्या विकास योजना रस्त्यावरुन प्रस्तावित असून या फ्लाय ओव्हरमधील जंक्शनचे ठिकाणी आवश्यक रस्तारुंदी ४१.०० मी. इतकी नियोजित असल्याने, अस्तित्वातील २१.०० मी. विकास योजना रस्ताच्या रुंदीमध्ये वाढ प्रस्तावित केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना निर्णय क्र.टिपीएस-१७१८/९४०/प्र.क्र.२८१/१८/नवि-१३, दि.१७/१०/२०१८, अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (२), अन्ववे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सोलापूर अंतर्गत, सोलापूर शहरातील फ्लाय ओव्हर सेक्शन २ साठीच्या प्रस्तावित रस्ता रुंदीच्या आखणीप्रमाणे अस्तित्वातील रस्त्याच्या रुंदीत वाढ करण्यास मान्यता दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, सोबतच्या अनुसूचीत नमूद केलेली जमिन (यापुढे उक्त जमिन म्हणून संबोधिलेली) उक्त सुधारित सोलापूर विकास योजनेत सेक्शन २, जुना बोरामणी नाका ते मोरारका बंगला, पर्यंत फ्लायओव्हर या प्रस्तावाने बाधित होत आहे. (यापुढे उक्त सार्वजनिक प्रस्ताव म्हणून संबोधिलेली)

आणि ज्याअर्थी सोलापूर महानगरपालिकेने (यापुढे उक्त महानगरपालिका म्हणून संबोधिलेली) उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ पोटकलम (१) अन्वये उक्त जमिन उक्त सार्वजनिक प्रस्तावासाठी संपादन करणेबाबत शासनाकडे अर्ज केला आहे.

आणि ज्याअर्थी या कार्यालयाने संयुक्त मोजणी प्रस्तावात कळविलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने नगर भूमापन अधिकारी सोलापूर यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र दि. २२/०९/२०२२, १९/०१/२०२४, २१/०३/२०२४ आणि २७/०३/२०२५ वेळोवेळी संयुक्त मोजणी व क्षेत्र विवरणपत्र दुरूस्ती करून सुधारीत संयुक्त मोजणी नकाशे व विवरणपत्र सादर केली आहे.

आणि ज्याअर्थी नगर भूमापन अधिकारी सोलापूर यांनी कळविलेल्या अहवालानुसार एकूण १५ मिळकती बाबत नव्याने अधिसूचना निर्गमित करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी, उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १५१ पोटकलम (१) खाली काढलेल्या अधिसूचना क्र. टीपीएस/२१७५/५१०६/युडी-७, दि.०३/०३/१९७९ अन्वये मंजूर विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी निर्दिष्टित करण्यात आलेल्या जमिनी बाबतच्या उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ पोटकलम (१) (२) व (४) खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिन उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२५ मधील तरतुदीनुसार उक्त सार्वजनिक प्रस्तावासाठी आवश्यक असल्याबाबतची जिल्हाधिकारी, सोलापूर, यांची खात्री झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या संपादनापोटी द्यावयाच्या नुकसान भरपाईची रक्कम संपूर्णपणे उक्त महानगरपालिकेने अदा करावयाची आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६ पोट कलम (२) मध्ये निर्दिष्टित केलेली कालमर्यादा उलटून गेलेली आहे,

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना (तिसरी सुधारणा) अधिनियम २०१५ च्या नियम ५ (दोन) नुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ अंतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनीचे संपादन करताना भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यापूढे उक्त संपादन अधिनियम म्हणून संबोधिलेला) मधील कलम ४ ते १५ (दोन्ही सह) ला सूट दिली आहे. सदरचा अधिनियम महाराष्ट्र शासन राजपत्रात असाधारण क्र.७१, दि.३१/१२/२०१५, रोजी प्रसिध्द झालेला आहे, आणि म्हणून उक्त संपादन अधिनियमाच्या कलम १९ च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, आहे असे सरळ याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने दि.२७/०८/२०१४ च्या अधिसूचनेव्दारे केलेले भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) अधिनियम, २०१३ च्या, नियम १७ अनुसार या संपादन प्रकल्पातील बाधित कुटुंबे ही उक्त संपादन अधिनियमाच्या दुसऱ्या व तिसऱ्या अनुसूचिनुसार पुनर्वसन व पुनर्वसाहतीचे घटक म्हणून विचार केला जाण्यासाठी पात्र नाहीत.

त्याअर्थी, शासनाने प्रवत्त केलेल्या शक्तीनुसार आणि उक्त महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमाच्या कलम १२६ पोटकलम (४) सह उक्त भूमि संपादन अधिनियम २०१३ च्या कलम १९ अन्वये जिल्हाधिकारी, सोलापूर असे घोषित करतात की, उक्त जमिन उक्त सार्वजनिक प्रस्तावाच्या प्रयोजनासाठी आवश्यक आहे;

उक्त जमिनीच्या संबंधात यापुढे करावयाच्या सर्व संपादनाच्या कार्यवाहीबाबत, जिल्हाधिकाऱ्यांचे काम पार पाडण्याकरिता उक्त संपादन अधिनियमाच्या कलम ३ खंड (ग) अन्वये याव्दारे भूमि संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक, सोलापूर यांची नेमणूक करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे उक्त जमिनीच्या संपादनाची कार्यवाही उक्त सार्वजनिक प्रस्तावाच्या प्रयोजनासाठी आवश्यक ती कार्यवाही सुरु करावी असे निदेश देण्यात येत आहेत.

उक्त जमिनीचे सर्व्हे क्रमांक, संपादनाचे क्षेत्र, जमिनीचे नकाशे, इत्यादी कागदपत्रे भूमि संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक, सोलापूर, डॉ. कोटणीस हॉल, पहिला मजला, शुभराय आर्ट गॅलरीजवळ, पार्क चौक, सोलापूर - ४१३००१ यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळात पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**अनुसूची**
**सोलापूर महानगरपालिका**
**गावाचे नाव - सोलापूर महानगरपालिका, जिल्हा सोलापूर**

| अ.क्र. | न.भू.क्र./अ.भू.क्र. | संपादित क्षेत्र चौ.मी. | संपादनाचे प्रयोजन |
|---|---|---|---|
| १ | फा.प्लॉ.नं.७ बी/२अ टि.पी.-१ | १३९.६० | जुना बोरामणी नाका ते मोरारका बंगला (फ्लाय ओव्हर सेक्शन-२) |
| २ | फा.प्लॉ.नं.७ बी/२ब टि.पी.-१ | ८५.८७ | |
| ३ | फा.प्लॉ.नं.९/१२९ टि.पी.-१ | १.८० | |
| ४ | फा.प्लॉ.नं.२८/अ/६ टि.पी.-१ | ९१.२० | |
| ५ | फा.प्लॉ.नं.३७/३०९ ते ३१२/४ अ टि.पी.-१ | ४.०० | |
| ६ | फा.प्लॉ.नं.३७/३०९ ते ३१२/४ ब टि.पी.-१ | २.०० | |
| ७ | फा.प्लॉ.नं. ३७/३०७ टि.पो.-१ | ७.५ | |
| ८ | फा.प्लॉ.नं. ३५/९७/१ टि.पो.-१ | ७.०० | |
| ९ | फा.प्लॉ.नं. ३५/९८अ टि.पी.-१ | ७.०० | |
| १० | फा.प्लॉ.नं.५१/३/९ टि.पी.-३ | ४५६.५० | |
| ११ | फा.प्लॉ.नं.१०८ टि.पी.-३ | ६६५.२३ | |
| १२ | फा.प्लॉ.नं.१०९ टि.पी.-३ | ७४४.३१ | |
| १३ | फा.प्लॉ.नं.२१७/३ टि.पो.-३ | ८९.१७ | |
| १४ | फा.प्लॉ.नं.२१७/२ टि.पी.-३ | २३.८७ | |
| १५ | फा.प्लॉ.नं.११९/१९ टि.पी.-३ | ३३.२५ | |

**संपादनाचे प्रयोजन- जुना बोरामणी नाका ते मोरारका बंगला फ्लाय ओव्हर सेक्शन-२**

**ठिकाणः सोलापूर**
**दिनांक : ०५/०४/२०२५.**

सही/-
(**कुमार आशिर्वाद** भा.प्र.से)

जिमाका/सो/जाहि/१५/२०२५-२६



## महत्त्वाचे

### भारतीय महिला संघासाठी फिजिओ, प्रशिक्षकाचा शोध

**नवी दिल्ली** : भारतीय महिला संघ नवीन फिजिओथेरपिस्ट व स्ट्रेंथ अँण्ड कंडिशनिंग प्रशिक्षकाची नियुक्ती करणार आहे, हे दोघेही पुढील दोन वर्षांसाठी बंगळुरू येथील सेंटर ऑफ एक्सलन्स येथे कार्यरत असतील. बीसीसीआयने क्रीडा विज्ञान आणि औषध विभागाच्या कक्षेत येणाऱ्या दोन्ही पदांसाठी अर्ज मागवले आहेत. नितीन पटेल यांच्या जाण्याने त्यांना नवीन प्रमुख मिळण्याची अपेक्षा आहे. फिजिओ आणि प्रशिक्षक (एस अँण्ड सी प्रशिक्षक) सेंटर ऑफ एक्सलन्स येथे काम करतील तसेच भारतीय महिला संघासोबत देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय कामांवर प्रवास करतील. फिजिओचे पद आकांक्षा सत्यवंशी यांनी रिक्त केले आहे आणि महिलांसाठी एस अँण्ड सी प्रशिक्षक आनंद दाते यांनी हे पद भूषवले आहे. दोघेही आपापल्या पदांवरून पुढे जात आहेत. दोन्ही पदांसाठी एक प्रमुख आवश्यकता म्हणजे अँडव्हान्स लाईफ सपोर्ट (फिजिओसाठी), बेसिक लाईफ सपोर्ट (ट्रेनर्ससाठी) मध्ये सर्टिफिकेशन कोर्स आणि ट्रॉमा मॅनेजमेंटमध्ये पदवी असणे. इच्छुक उमेदवारांसाठी सर्टिफिकेशन कोर्स गेल्या दोन वर्षांत पूर्ण केलेला असणे आवश्यक आहे. १० वर्षांचा अनुभव असलेल्या फिजिओला प्राधान्य दिले जाईल. यशस्वी उमेदवार बहुआयामी वातावरणात काम करतील आणि भारतातील महिला क्रिकेटच्या सर्वांगीण विकासात योगदान देतील, असे बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी म्हटले आहे.

# मुंबई, हैदराबाद झेप मारण्यास उत्सुक

**मुंबई, १६ एप्रिल**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट हंगामात गुरुवारी यजमान मुंबई इंडियन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे. सनरायझर्स हैदराबादच्या स्फोटक फलंदाजांना रोखण्यासाठी मुंबई इंडियन्सला काही योजना आखणे आवश्यक आहे. वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आपल्या सर्वोत्तम कामगिरीत परतेल अशी मुंबईला आशा आहे. दुखापतीमुळे तीन महिने क्रिकेटपपासून दूर राहिल्यानंतर बुमराहला अद्याप लय सापडलेली नाही व त्यामुळे त्याला सामोरे जाणे कठीण झाले आहे.




हार्दिक पांड्या  पॅट कमिन्स

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) विरुद्धच्या चांगल्या खेळीनंतर बुमराहला त्याचे यॉर्कर टाकण्यात संघर्ष करावा लागला व देल्ली कॅपिटल्सच्या करुण नायरने या सामन्यात ४४ धावा काढल्यामुळे त्याला धक्का बसला. ३१ वर्षीय बुमराहला सनरायझर्स हैदराबादच्या ट्रॅव्हिस हेड, अभिषेक शर्मा, ईशान किशन व हेनरिक क्लासेनच्या मजबूतक संघाविरुद्ध कठोर परीक्षांना सामोरे जावे लागेल.

पण पाच वेळा विजेत्या मुंबई इंडियन्स संघाला माजी कर्णधार रोहित शर्माने लवकरात लवकर धावा काढण्यासाठी फॉर्ममध्ये परतावे, अशीही इच्छा असेल, कारण सध्या त्याची धावसंख्या पाच सामन्यांत ११.२० च्या सरासरीने ५६ धावा आहेत.

केवळ दोन विजयांसह गुणतालिकेत मुंबईला सातवे स्थान मिळवून देण्यात त्याने मोठी भूमिका बजावली आहे. हे निकाल सूर्यकुमार यादव व तिलक वर्माच्या योगदानावर अवलंबून आहेत.

सूर्यकुमार अजूनही आपल्या सर्वोत्तम स्थितीत नसला तरी, लखनौ सुपर जायण्ट्सविरुद्ध निवृत्त होणे तिलकसाठी एक धोक्याची घंटा ठरली. लखनौमधील त्या कठीण सामन्यानंतर, तिलकने ५६ व ५९ अशा धावा करून फॉर्ममध्ये परतल्याचे संकेत दिले आहेत.

नमन धीर हा मुंबई इंडियन्ससाठी एक महत्त्वाचा खेळाडू असून त्याला डेथ ओव्हर्समध्ये आक्रमक फलंदाजाची भूमिका देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, मुंबई इंडियन्स व सनरायझर्स हैदराबादने ज्यापद्धतीने गत सामन्यात विजय मिळविला, तीच विजयाची लय ते कायम ठेवू शकतील काय, हे बघणे शिल्लक आहे. हीच लय या स्पर्धेत त्यांचे भविष्य निश्चित करेल.

**हैदराबादचा संघर्ष**

विजयाच्या अर्ध्या मार्गावर पोहोचल्यानंतर सनरायझर्स हैदराबादला संघर्ष करावा लागत आहे. सहा सामन्यांत चार पराभव व दोन विजयांनंतर दोन्ही संघांचे प्रत्येकी ४ गुण आहेत. केवळ नेट रन रेट फरक असल्यामुळे मुंबई गुणतालिकेत सातव्या स्थानावर, तर हैदराबाद नवव्या स्थानावर आहेत. मुंबई इंडियन्सचा नेट रन रेट +०.१० आहे, तर सनरायझर्स हैदरहाबादचा नेट रन रेट -१.२४ आहे.

परंतु मुंबई इंडियन्सला हैदराबादच्या फलंदाजांपासून सावध राहावे लागेल. हेड, अभिषेक, क्लासेन व किशन या अव्वल चार खेळाडूंपैकी प्रत्येकाने पंजाब किंग्जला धक्का देऊन हैदराबादला हंगामातील दुसरा विजय मिळवून दिला. (वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**मुंबई इंडियन्स वि. सनरायझर्स हैदराबाद**
**स्थळ** : वानखेडे स्टेडियम, मुंबई
**वेळ : संध्याकाळी ७:३० वाजतापासून**
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

## आशियाई १८ वर्षांखालील ॲथ्लेटिक्स स्पर्धेत नितीन गुप्ताला ५ हजार मीटर रेस वॉकमध्ये रौप्य

**नवी दिल्ली, १६ एप्रिल**



सौदी अरबयातील दम्मम येथे बुधवारी झालेल्या सहाव्या आशियाई १८ वर्षांखालील ॲथ्लेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत ५००० मीटर रेस वॉक स्पर्धेत भारताच्या नितीन गुप्ताने रौप्यपदक जिंकले.

गुप्ताने २०:२१.५१ सेकंद वेळ नोंदवून दुसरे स्थान पटकावले. चीनच्या झू निंघाओने २०:२१.५० सेकंद वेळ नोंदवून सुवर्णपदक जिंकले. चीन तैपेईच्या शेंग किन लोने २१:३७.८८ सेकंद वेळ नोंदवून कांस्यपदक मिळवले. १७ वर्षीय नितीन गुप्ताने गत महिन्यात पाटणा येथे झालेल्या राष्ट्रीय युवा ॲथ्लेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत १९:२४.४८ सेकंद वेळ नोंदवून स्वतःचा राष्ट्रीय विक्रम मोडला होता. दिवसाच्या उत्तरार्धात, भारतीय खेळाडू मुले आणि मुली दोघांसाठी थाळीफेक, लांब उडी, १०० मीटर आणि ४०० मीटर शर्यत अशा इतर स्पर्धांमध्येही सहभागी होतील. (वृत्तसंस्था)

## नवीन दुसऱ्या चेंडूचा नियम फायदेशीर : मोहित

**नवी दिल्ली, १६ एप्रिल**

दुसऱ्या डावात चेंडू बदलण्याचा नियम गोलंदाजांसाठी निश्चितच फायदेशीर आहे, असे दिल्ली कॅपिटल्सचा वेगवान गोलंदाज मोहित शर्मा म्हणाला.

रविवारी अरुण जेटली स्टेडियमवर मुंबई इंडियन्सकडून दिल्ली कॅपिटल्सला १२ धावांनी पराभव पत्करावा लागला. याबरोबरच दिल्लीची विजयी मालिका खंडित झाली. विशेषतः १३ व्या षटकात पाहुण्या मुंबई संघाने चेंडू बदलण्याचा निर्णय घेतल्याने दिल्लीची मधली फळी कोसळली.

हा नियम शंभर टक्के मदत करते. याचा आम्हाला गत सामन्यातही अनुभव आला. सुरुवातीला, १२ षटकांचा चेंडू थोडा ओला होता, कारण शेवटच्या सामन्यात दव पडला होता. जेव्हा त्यांचा डाव संपत होता, तेव्हा दव येऊ लागला आणि दुसऱ्या डावात ते चांगले झाले. जेव्हा कर्णने १३ व्या षटकानंतर चेंडू बदलला तेव्हा चेंडू फिरू लागला. त्यामुळे कठीण चेंडू थोडा फरक निर्माण करतो, असे मोहित म्हणाला. कालांतराने, जेव्हा तो १५ व्या किंवा १६ व्या षटकांत पोहोचतो तेव्हा चेंडूची स्थिती सारखीच होती. पण हो, मी म्हणू शकतो की गोलंदाज म्हणून त्याचा परिणाम होतो. जर मी १४ व्या किंवा १५ व्या षटकांत चेंडू टाकला, जिथे चेंडू बदलला आहे, तर मी नेहमीच यॉर्कर मारणे पसंत करेन. (वृत्तसंस्था)




## द वॉरियर्स तायक्कांदो अकॅडमीच्या कलर बेल्ट परीक्षेत २५ खेळाडू सहभागी

**सोलापूर** : भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त तायक्कांदो कलर बेल्ट परीक्षा संपन्न द वॉरियर्स तायक्कांदो अकॅडमी च्या वतीने विविध कलर बेल्ट परीक्षा घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये २५खेळाडूंचा सहभाग होता. मुख्य प्रशिक्षक जालिंदर साळवे, सोमनाथ बनसोडे यांच्या उपस्थित ही परीक्षा झाली. सर्व खेळाडूंचे द वॉरियर्स तायक्कांदो अकॅडमीचे पदाधिकारी व श्रीकांत पाटोळे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



## कॅस्पर रुड, कार्लोस अल्काराझ बार्सिलोनाच्या अंतिम १६ मध्ये

**बार्सिलोना** : गत आठवड्यात मॉण्टे कार्लो मास्टर्सचे विजेतेपद पटकावणाऱ्या स्पेनच्या कार्लोस अल्काराझ व कॅस्पर रुडने बार्सिलोना ओपन टेनिस स्पर्धेच्या आंतिम सोळामध्ये स्थान मिळविले आहे. जागतिक



क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या अल्काराझने पहिल्या सेटमध्ये जोरदार खेळ केला, पण १२६ व्या क्रमांकावर असलेल्या इथन क्विनने दुसऱ्या सेटमध्ये शौर्याने झुंज दिली, तर तिसऱ्या सेटमध्ये स्पेनच्या खेळाडूने ६-२, ७-६ (८/६) असा विजय मिळवला. अल्काराझती वर्षाची सुरुवात डळमळीत झाली. मार्चमध्ये पहिल्या अडथळावर मियामी ओपनमधून तो बाहेर पडला. आता तो आपल्या फ्रेंच ओपन जेतेपदाच्या बचावाची तयारी करत आहे. २१ वर्षीय खेळाडू २०२२ आणि २०२३ मध्ये ट्रॉफी जिंकल्यानंतर बार्सिलोनाच्या क्लेवर तिसऱ्या विजयाचे लक्ष्य ठेवत आहे. त्याआधी, गतविजेत्या नॉर्वेच्या कॅस्पर रुडने डॅनियल इलाही गॅलनवर ६-४, ६-३ असा विजय मिळवत अंतिम १६ मध्ये प्रवेश केला. जागतिक क्रमवारीत १० व्या स्थानावर असलेल्या या खेळाडूने हंगामातील आपल्या पहिल्या ट्रॉफीचे लक्ष्य ठेवून २५ विनर मारले आणि ब्रेक पॉइंटचा सामना न करता कोलंबियन प्रतिस्पर्ध्याला हरवले.

# महापालिका सुरक्षा रक्षक संघास विजेतेपद

**महापालिका डॉ. आंबेडकर जयंती उत्सव समिती क्रिकेट**

**झोन क्र. ६ उपविजेता**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

महानगरपालिका कर्मचारी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती, सर्वंट सोशल फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य आरोग्यनिरीक्षक संघटनेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंतीनिमित्त झालेल्या क्रिकेट स्पर्धेत सोलापूर महानगरपालिका सुरक्षा रक्षक संघाने विजेतेपद पटकाविले. सोलापूर महानगरपालिका झोन क्रमांक सहा संघास उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

आदर्श माता-पिता पुरस्कार वितरण आणि सोलापूर महानगरपालिका अधिकारी कर्मचारी यांच्याकरिता भरवण्यात आलेल्या क्रिकेट स्पर्धे चे बक्षीस वितरण समारंभ इंद्रभवन प्रशासकीय इमारतीसमोर पार पडला. पिंपरी चिंचवड म हापालिका स्वच्छता विभागाचे ब्रँड ॲम्बेसिडर नारायण कनेरे, मुख्य सफाई अधीक्षक एन. सी. बिराजदार, ज्येष्ठ कामगार नेते अशोक जानराव , मुख्य आरोग्य निरीक्षक सुधाकर नागटिळक, पर्यावरण अधिकारी स्वप्निल सोलनकर, समता सैनिक दलाचे सचिव अनिल जागझाप, डि. के.मगासवर्गीय सामाजिक संस्थेचे कार्याध्यक्ष गौतम कसबे, संस्थेचे उत्सव अध्यक्ष प्रज्वल माने , सफाई मजदूर संघटनेचे अध्यक्ष बाली मंडेपू , क्रांती युनियनचे अध्यक्ष लिंबराज जेठीथोर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शेषराव शिरसाट, उत्सव अध्यक्ष अंजली काकडे, ऑडिटर वनिता साठे , प्रमुख मार्गदर्शक हमीद हिरोली, बाळासाहेब गोतसुर्वे, खजिनदार सतीश नागटिळक , सचिन आवारे, सुनील भालेराव, शुभम रणखांबे, अमोल सावंत, सागर शिरसे, किशोर कांबळे, बुद्धप्रकाश बनसोडे, रोहित गवळी, विठोबा शिंदेबंदे, सुनील राठोड, रवी बनसोडे आदी उपस्थित होते.

**वैयक्तिक पारितोषिके** : सामनावीर : मनपा शिक्षण मंडळ नदाफ. गोलंदाज अजय कांबळे. फलंदाज : आकाश कांबळे.

# साऊथ सोलापूर ओल्ड व ख्वाजा बंदेनवाज क्रिकेट क्लबचे शानदार विजय




**रेल्वेची ७८ वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिटट्युटच्या ७८व्या स्कॉट मेमोरियल क्रिकेट स्पर्धेत साऊथ सोलापूर ओल्ड संघाने कुर्डुवाडीच्या जयहिंद क्लबला ७१ धावांनी हरिवले. मोहित राय सामन्याचा मानकरी ठरला. येथील रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात बुधवारी झालेल्या दुसऱ्या सामन्यात ख्वाजा बंदेनवाज क्रिकेट क्लबने पंढरपूरच्या वीर सावरकर पंढरपूरवर ७ गडी राखून विजय मिळविला. जावेद अहमद साम नावीर ठरला. सामनावीर पुरस्कार रेल्वे इन्स्टिट्युटचे खजिनदार विक्रांत पवार व राजा पटेल यांच्या हस्ते देण्यात आले. प्रत्येक सामनावीरचे पुरस्कार सुदेश व सुनील मालप यांच्याकडून देण्यात येत आहेत. पंच म्हणून सचिन गायकवाड व नवीन माने आणि अतिक शेख व शोएब शेख तर गुणलेखक म्हणून गेनबा सुरवसे यांनी काम पाहिले.

**संक्षिप्त धावफलक**

**साऊथ सोलापूर ओल्ड**: २० षटकांत ७ बाद १६९( मोहित राय नाबाद १०२, अमोल अंगडी १२, प्रद्युम्न साटव व अभिजित मुळे २ बळी, सचिन सुरवसे व कोरे नागेश प्रत्येकी १ बळी) वि.वि.

**जय हिंद कुर्डूवाडी** : २० षटकांत ८ बाद ९८ (सचिन गोडसे नाबाद ३८, विल्सन काळे १७, अभिजित मुळे १५, लक्ष्मण कावळे व विश्वनाथ मुंढे २ बळी, अमोल लाहासे, मोहित राय व रोहित देशमुख प्रत्येकी १ बळी).

**वीर सावरकर, पंढरपूर** : १५.१ षटकांत सर्व बाद ७७ (दिनेश शिंगाडे १९, गौरव गायकवाड १८, वैभव बडवे ११, जावेद अहमद ३, शीतल कुमार व यासिर मोमीन २ बळी, सईद जहागीरदार, जकवान अहमद प्रत्येकी १ बळी) पराभूत विरुद्ध

**के.बी.एन.सी.ए.** : ८.४ षटकांत ३ बाद ७९ (सईद जहागीरदार नाबाद ४६, मिर्झा वसीम बैग२७,महितेश वाघेला २ बळी, गणेश चव्हाण,

**आजचे सामने**

१) मारिया क्रिकेट क्लब विरुद्ध एच के सी सी. २) एम आय पी वर्कशॉप विरुद्ध सेंट्रल रेल्वे (ब)



## सोलापुरात उद्या एक दिवसीय कराटे कार्यशाळेचे आयोजन

**सांगोला,दि.१६ एप्रिल-**

शुक्रवारी दि.१८ एप्रिल रोजी सोलापुरातील राजीव गांधी इंडोर स्टेडियम येथे एक दिवसीय कराटे कार्यशाळेचे आयोजन केले असल्याची माहिती कराटे डो असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष जी.के. वाघमारे यांनी दिली. ह्या कार्यशाळेमध्ये महाराष्ट्र कराटे डो असोसिएशनचे सचिव संदीप गाडे यांचे कराटे खेळाविषयक काता, कुमिते, टेकनिक किक्ससह अनेक प्रकारावर मोलाचे मार्गदर्शन लाभणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील व शहरातील सर्व शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा. इच्छुकांनी ९९७०६०६९०९ या नंबर वर संपर्क साधावा.

# सोलापूरचा डायव्हर आदित्य गिरामला शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार जाहीर

## धाराशिवची खो-खोपटू गौरी शिंदे व प्रशिक्षक प्रवीण बागल यांचाही समावेश, उद्या पुण्यात वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल**

येथील डायव्हिंगपटू आदित्य गिराम आणि धाराशिवची खो-खो खेळाडू गौरी शिंदे व तिचे प्रशिक्षक प्रवीण बागल यांना राज्य शासानाचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार जाहीर झाला आहे. याचे वितरण शुक्रवारी (दि.१८) पुण्यात होईल.

२०२३-२४ च्या ८९ शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांची घोषणा क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांनी मंगळवारी केली. १८ खेळाडूंना थेट पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. जीवनगौरवसाठी ५ लाख, शिवछत्रपती पुरस्कारासाठी ३ लाख रुपये व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुण्यात शुक्रवार, १८ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता म्हाळुंगे बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडासंकुलात राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते हा पुरस्कार समारंभ होईल. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित राहणार आहेत.





आदित्य गिराम  गौरी शिंदे  प्रवीण बागल

**अखेर आदित्यला न्याय मिळाला**

अदित्यला हा पुरस्कार २०१९-२० या वर्षासाठी दिला आहे. संबंधित वर्षात त्याने अर्ज केला होता. प्राथमिक यादीत गुणांकनमध्ये त्याचे अव्वल स्थान होते. परंतु अंतिम यादीत त्याला डावलल्यामुळे त्याला कोर्टाचे दरवाजे ठोठावे लागले होते. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्य पुरस्कार निवड समितीने सर्वकष चर्चा करून त्याची या पुरस्कासाठी शिफारस केली होती. त्यानुसार शासनाने हा पुरस्कार त्यास जाहीर केला.

**खेळाडूंची कामगिरी**

**आदित्य अनिल गिराम** : रेल्वेमध्ये टीटीआय. २००० पासून शालेय स्पर्धेमध्ये सहभाग. ११ शालेय राष्ट्रीय स्पर्धेतून १८ सुवर्ण, ६ रौप्य आणि १ कांस्य पदक. जलतरण संघटनेच्या वयोगट ६ राष्ट्रीय स्पर्धेतून ५ सुवर्ण, ९ रौप्य व १ कांस्य. वरिष्ठ ९ राष्ट्रीय स्पर्धेतून १ सुवर्ण, ३ कांस्य. २००९ मध्ये जपान येथे झालेल्या वयोगट एशियन डायव्हिंग स्पर्धेत व २०१९ मध्ये आंतरराष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी. गेल्या आठ वर्षापासून अखिल भारतीय रेल्वे स्पर्धे त ८ सुवर्ण, १२ रौप्य, ३ कांस्य.

**गौरी राजेश शिंदे** : धाराशिवकडून प्रतिनिधित्व करताना ३० राज्य स्पर्धे त सहभाग. १५ राष्ट्रीय स्पर्धेतून १४ सुवर्ण व १ कांस्य पदक. ३ आंतर विद्यापीठ स्पर्धेतून १ सुवर्ण, १ रौप्य व १ कांस्य पदक. एक वेळेस महाराष्ट्र महिला खो-खो संघाचे कर्णधारपद. मार्च २०२३ मध्ये झालेल्या चौथ्या एशियन चँपीयनशीपमध्ये सुवर्ण

## कबड्डी मैदानावरील वाघीण : शकुंतलाताई

माझ्या सहकारी, क्रीडा भारतीच्या पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष शकुंतला ताई खटावकर यांना महाराष्ट्र शासनाचा ‘शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार’ घोषित झाला ही फक्त क्रीडा भारतीसाठीच नव्हे तर महाराष्ट्रातील सर्व खेळाडू, प्रशिक्षक, संघटक आणि क्रीडा प्रेमी यांच्यासाठी अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. शकुंतला ताईंना पुरस्कार म्हणजे आपल्याच कुटुंबात आपल्या मोठ्या बहिणीला, मावशीला, आत्याला, आज्जीला पुरस्कार अशी सहज भावना प्रत्येकाच्या मनात आहे.



मैदानावरील वाघीण अशी कब्बडी खेळतील ओळख. कब्बडी साठीच खेळाडू म्हणून मिळालेला शिवछत्रपती पुरस्कार. अर्जुन पुरस्कार मिळवणाऱ्या पहिल्या महिला खेळाडू. कब्बडी प्रशिक्षक म्हणून असंख्य राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, पुरस्कार प्राप्त खेळाडूंची घडवणूक, पंच म्हणून कडक शिस्त, संघटक म्हणून कब्बडीसाठी वर्षानुवर्ष करत असलेले काम, विशेषतः महिला खेळाडूंच्या गौरवासाठी घेतलेली ठाम भूमिका. आणि क्रीडा भारतीच्या माध्यमातून खेळाच्या मैदानावर फक्त स्पर्धक नव्हे तर स्पोर्ट्समन घडला पाहिजे, चारित्र्यवान व्यक्ती निर्माण झाली पाहिजे आणि त्यातून देश उभा राहिला पाहिजे या ध्यासातून महाराष्ट्रभर प्रवास, संपर्क आणि संघटन यात आजही असलेले प्रचंड योगदान. शकुंतला ताईंचा हा सगळा प्रवास निश्चितच विस्मयकारी आहे. या जीवन गौरव पुरस्काराने या सर्व गोष्टी पुन्हा एकदा समाजापुढे विशेषतः युवा पिढीच्या समोर येऊन युवा खेळाडूंना निश्चितच एक नवी उमेद मिळेल यात तिळमात्र शंका नाही. महाराष्ट्र शासनाने ताईंच्या केलेल्या या गौरवाबद्दल क्रीडा भारतीला सार्थ अभिमान आहे.

**- विजय पुरंदरे, अध्यक्ष पश्चिम महाराष्ट्र सदस्य राष्ट्रीय नियामक मंडळ, क्रीडा भारती**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...

### चाटे क्लासेसमध्ये दहावीतील विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ

**बार्शी, दि.१६ एप्रिल-**

येथील चाटे क्लासेसमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात पार पडला. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी ५ वी ते १०वी साठीची प्रवेश प्रक्रिया व दहावी व्हॅकेशन बॅच १५ एप्रिल रोजी सुरु झाली. इयत्ता ५ वी ते इयत्ता ९ वी व्हॅकेशन बॅच ४ मे पासून सुरू होणार आहे. या स्वागत समारंभात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संस्थेचे संचालक पांडुरंग घाडगे यांनी संस्थेची कार्यपद्धती सांगुन विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास निर्माण केला. प्रवेश न मिळालेल्या दहावीच्या विद्यार्थी व पालकांनी ५व्या तुकडीची प्रवेश प्रक्रिया सुरु करावी अशी विनंती केली होती. बार्शी शाखेचे संचालक पांडुरंग घाडगे यांनी कोल्हापूर विभागाशी संपर्क साधून दहावीच्या ५ व्या तुकडीला प्रवेश मिळावा अशी विनंती केली. कोल्हापूर विभागानेही बार्शी शाखेची विनंती लक्षात घेऊन प्रवेश प्रक्रिया सुरू करून दिली. त्यामुळे उपस्थित पालकांनी चाटे शिक्षण संस्थेचे मनोमन आभार मानले. भविष्यात विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून पालकांनी ७०२००६०८०२ या क्रमांकावर संपर्क साधून इयत्ता ५ वी ते १० वी चा प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन संस्थेचे संचालक प्रा.पांडुरंग घाडगे यांनी केले.



### वादळी वाऱ्यासह अवकाळीमुळे पीकांचे नुकसान; अक्कलकोट तालुक्यातील स्थिती

**अक्कलकोट, दि.१६ एप्रिल-**

तालुक्यात अचानक झालेल्या अवकाळी पावसामुळे कर्जाळ, दहिटणे, दहिटणेवाडी, चपळगाव, चपळगाववाडी, कोन्हाळी, हालचिंचोळी परिसरातील अनेक भागात शेतशिवारातील पिके, भाजीपाला, फुलांच्या झाड आडवी झाली, तर शेतातील कडबाही भिजला. हरभरा व गहू झाकण्यासाठी तारांबळ उडाली. काही भागात वादळी वाऱ्याचा कैऱ्यांनाही तडाखा बसला. अनेक खांबावरील विजेच्या तारा तुटल्याने वीज पुरवठा खंडित झाला. वादळी वाऱ्याने शिवारातील आंब्यालाही फटका बसला, अनेक झाडांखाली कैऱ्यांचाही सडा पडला होता. शेतकऱ्यांचे नुकसान झाले असल्याचे कंटय्या स्वामी (कर्जाळ) व हणमंत जाधव (दहिटणेवाडी) यांनी सांगितले. याबाबत पंचनामे करून भरपाई द्यावी, अशी शेतकऱ्यांतून मागणी होत आहे.




### कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे जीवन गुंतागुंतीचे होवू शकते : तुषार क्षीरसागर

**बार्शी, दि.१६ एप्रिल-**

इंटरनेट ऑफ थिंग्जमुळे कित्येक कामे बटनाद्वारे सहज पद्धतीने होवू लागली आहेत. पण दुसरीकडे कृत्रिम बुद्धिमत्ता गुंतागुंतीची पण होवू शकते, असे प्रतिपादन तुषार क्षीरसागर यांनी केले. येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील कर्मवीर स्पर्धा मार्गदर्शन केंद्राद्वारे आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. ते सध्या ईटन टेक्नॉलॉजी पुणे येथे मॅनेजर या पदावर कार्यरत आहेत. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी. शेख, स्पर्धा परीक्षा केंद्र समन्वयक डॉ. राहुल पालके, डॉ. राहुल शेळके हे उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. राहुल पालके यांनी स्पर्धा परीक्षेत या विषयाची उपयुक्तता सांगितली. कृत्रिम बुद्धिमत्तेचा शैक्षणिक क्षेत्रात सुयोग्य वापर करुन विकासाची कास धरावी असे त्यांनी सांगितले.

### मैंदर्गी येथे मंत्री राणेंच्या उपस्थितीत आज होणार हिंदू धर्मसभा

**अक्कलकोट दि.१६ एप्रिल**

तालुक्यातील मैंदर्गी येथे सकल हिंदू समाज बांधवच्या वतीने दि.१७ एप्रिल गुरुवारी सायंकाळी सहा वाजता हिंदू धर्मसभा होणार असल्याची माहिती श्रीराम प्रतिष्ठानचे अध्यक्ष देवराज जकापुरे यांनी दिली. येथील श्री शिवचलेश्वर मंदिरासमोरील मैदानावर ही धर्मसभा होणार आहे. या हिंदू जनजागृती धर्म सभेसाठी कणकवलीचे आमदार तथा मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे, आमदार गोपीचंद पडवळकर कर्नाटकचे आमदार बसनगौडा पाटील यतनाळ, अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या धर्म जनजागृती सभेसाठी अक्कलकोट तालुक्यातील सर्व हिंदु बांधवांनी तसेच पंचक्रोशीतील हिंदू समाज बांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन देवराज जकापुरे यांनी केले आहे.

## निधन वृत्त...

### उमेश गुड्डी



**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

सांगली विश्रामबाग येथील बेदाणा व्यापारी उमेश सदाशिव गुड्डी (वय ४०) यांचे हृदयविकाराने मंगळवारी (ता. १५) सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. ते सांगली युवक काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष होते. सोलापूर बाजार समितीत बेदाणा सौदे सुरू करण्यात त्यांचे महत्वपूर्ण योगदान होते. ते निंबर्गी (ता. दक्षिण सोलापूर) येथील मल्लिनाथ बिराजदार यांचे जावई होत.

### मनोहर मामड्याल



**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

मनोहर सिद्राम मामडयाल (वय ६९) यांचे दि. १६ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा दि. १७ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता एकता नगर येथील राहत्या घरापासून निघणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, जावई, नातू, नातवंडे असा परिवार आहे.

# संभाव्य बाधितांची स्वाक्षरी मोहीम तर लोकप्रतिनिधींच्या बैठका

### पंढरपूर कॉरिडोरबाबत गैरसमज दूर करण्याचे सुरू आहेत प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १६ एप्रिल -**

पंढरपूर तिर्थक्षेत्र आराखडा अर्थात कॉरिडोर बाबत एकीकडे शासन, जिल्हा प्रशासनाची अजूनही वेट अँण्ड वॉचचीच भूमिका आहे. दुसरीकडे मात्र शहरातील संभाव्य बाधितांकडून कॉरिडोर विरोधाचा सुर हळुहळू वाढण्यास सुरुवात झाली आहे. तर स्थानिक लोकप्रतिनधींनीकडून ज्या भागात कॉरिडोर होणार आहे त्या बाबत बैठकांचे आयोजन करुन त्याबाबतचे गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. गेल्या दोन दिवसांमध्ये दोन भागात खास बैठकादेखील पार पडल्या आहेत.

शहरात चौफाळा ते विठ्ठल मंदिर परिसर आणि महाव्दारघाट आदी भागात कॉरिडोर होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हा प्रशासनाकडून काही दिवसांपूर्वी या बाबतचे प्रेझेंटेशन देखील देण्यात आलेले आहे. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी जिल्हा प्रशासनाला गो अहेड म्हणून कॉंरिडोरला हिरवा कंदिल दाखविला आहे. दरम्यान याबाबतची माहिती जनतेसाठी उपलब्ध व्हावी अशी मागणी पंढरपूरच्या नागरिकांकडून केली जात होती. मागील आठवड्यात सोशल मिडीयाच्या माध्यमातून जनतेसाठी कॉंरिडोरबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. मात्र या माहितीला अजूनही शासन किंवा जिल्हा प्रशासनाकडून दुजोरा नाही. तरी देखील ६०, ८० आणि १०० मीटर पर्यंत कॉंरिडोर होणार असल्याच्या चर्चे ला पंढरपूरात उधाण आले आहे. त्यामुळे नेमका कॉंरिडोर किती मीटरचा होणार या बाबत सर्वसामान्य पंढरपूरकरांना अजूनही नेमकी माहिती उपलब्ध झालेली नाही.

दरम्यान मंदिर परिसरातील अनेक व्यापारी, सर्वसामान्य नागरिक या कॉंरिडोरमुळे भयभीत आहेत. त्यामुळे या भागातील संभाव्य बाधितांकडून कॉंरिडोरला विरोधाची भूमिका घेतली गेली आहे. त्यासाठी हिंदूमहासभेचे नेते अभयसिंह कुलकर्णी (इंचगावकर ), विवेक बेणारे, बाबा महाजन बडवे आदी प्रमुखांच्या म ार्गदर्शनाखाली स्वाक्षरी मोहिम राबविण्यात येत आहे. या मंडळींकडून संभाव्य कॉंरिडोर बाधितांना एकत्रित करुन शासनावर दबाव वाढविण्यासाठी मोठा दबावगट तयार करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. वेळ पडली तर राज्य शासनाविरुध्द न्यायालयीन लढाई देखील लढली जाणार असल्याचे या मंडळींकडून सांगितले जात आहे.

दुसरीकडे मात्र स्थानिक नेते असलेले माजी आमदार प्रशांत परिचारकांनी ज्या ज्या भागात कॉंरिडोर होणार आहे त्या भागात बैठका घेऊन नागरिकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न सुरु केला असल्याचे दिसत आहे. या बैठकांमधुन त्या त्या भागातील रेडिरेकनरचे दर एकत्रित केले जात आहेत. रेडिरेकनरच्या अनेकपट अधिक दर शासनाकडून मिळावा यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे त्यांच्याकडून बैठकांमध्ये सांगितले जात आहे. कॉंरिडोरबाबत ज्या अफवा आहेत त्याचे काही प्रमाणात परिचारकांकडून निराकरण देखील केले जात आहे. मागील दोन दिवसांमध्ये हरिदास वेस परिसरात डांगे वाड्यात तसेच विणे गल्ली भागात पालिम करांच्या घरी बैठका घेऊन परिचारकांनी संभाव्य बाधित होणाऱ्या नागरिकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला गेला आहे. गुरुवारी (दि.१७) सायंकाळी आठ वाजता देगलूरकर मठ परिसरातील रा.पां. कटेकर यांच्या कावेरी हॉंल मध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

त्यामुळे एकीकडे संभाव्य बाधितांकडून विरोधाची भूमिका घेतली जात आहे तर दुसरीकडे कॉंरिडोर होवुन पुढील पिढ्यांसाठी एक चांगली संधी शासनाकडून आलेली आहे. त्या संधीचा फायदा घ्यावा. ज्या बाधितांची घरे, दुकाने जाणार आहेत त्यांचे योग्य प्रकारे पुर्नवसन शासनाकडून करुन घेण्याबाबत चर्चेचा सूर स्थानिक नेते मंडळींकडून आळविला जात आहे. दरम्यान शासनाकडून, जिल्हा प्रशासनाकडून अजूनही कॉंरिडोर बाबत कोणतीही स्पष्टता नसली तरीही संभाव्य बाधित नागरिक तसेच स्थानिक नेते मंडळी यांच्याकडून कॉंरिडोर बाबत आपआपल्या पातळीवर विरोध आणि समर्थनाबाबत प्रयत्न सुरु करण्यात आल्याचे दिसत आहे. त्यामुळे कॉंरिडोर बाबत नेमके काय होणार, विरोधकांच्या भूमिकेमुळे कॉंरिडोर रद्द होणार का किंवा काही मीटरचे अंतर कमी करुन हा प्रकल्प मार्गी लागणार, कॉंरिडोरची सुरुवात कधी होणार, यामध्ये बाधित होणाऱ्यांना कशा प्रकारे मोबदला दिला जाणार, बाधितांचे पुर्नवसन कशा प्रकारे केले जाणार आदी प्रश्नांबाबतची उत्सुकता पंढरपूरकरवासियांना लागून राहिलेली दिसत आहे.

# अकलूजच्या रोजगार मेळाव्यात ५०० युवकांचा सहभाग

### आ. रणजितसिंह मोहिते-पाटील व खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१६ एप्रिल-**

आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील व खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त येथील शिवरत्न शिक्षण संस्था व श्री शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने शिवरत्न नॉलेज सिटीत टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) यांच्या सहकार्याने रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला माढा लोकसभा मतदारसंघातील विविध गावांम धून आलेल्या ५१३ युवक-युवतींनी सहभाग नोंदवला.



या रोजगार मेळाव्याचे उदघाटन शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्टचे विश्वतेजसिंह मोहिते-पाटील व सयाजीराजे मोहिते-पाटील, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसचे राहुल गीरी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे विश्वतेजसिंह मोहिते पाटील व सयाजीराजे मोहिते पाटील यांनी आपल्या मनोगतात अशा प्रकारच्या रोजगार संधी उपलब्ध करून देणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. टीसीएसचे राहुल गीरी यांनी यावेळी उपस्थित उम ेदवारांना टीसीएस मध्ये उपलब्ध रोजगार संधी, आवश्यक कौशल्ये, मुलाखतीची तयारी आणि आयटी क्षेत्रातील करिअरविषयक मार्गदर्शन केले. खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनीही कॅम्पस ड्राईव्हला भेट देवून व उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. उद्घाटन कार्यक्रमास टीसीएसचे प्रतिनिधी आकांशा मोझर व मयुर जाजुरी, शिवदास शिंदे, शिवरत्न शिक्षण संस्थेचे सचिव धर्मराज दगडे, संचालक डॉ विश्वनाथ आवड, दत्तात्रय लिके, श्रीकांत राऊत, प्रा. सुभाष शिंदे, प्रा. भारत साठे, अमित पुंज आणि इतर मान्यवर उपस्थित होते. आ. रणजितसिंह मोहिते-पाटील व खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रोजगार मेळावा आयोजित करून दोन्ही शिक्षण संस्थानी सामाजिक जाणिवेचे उदाहरण दाखवून दिले आहे. तरुण पिढीला योग्य दिशा मिळवून देण्यासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचे उपस्थित

## गोगांव येथे आज श्री कल्लेश्वर रथोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ एप्रिल-**



तालुक्यातील मौजे गोगांव येथील ग्राम दैवत श्री कल्लेश्वर महाराजांच्या यात्रेस काल पासून सुरुवात झाली असून आज दि.१७ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता गावातील मुख्य रस्त्यावरून कळसाची मिरवणूक काढण्यात येणार आहे. संध्याकाळी आठ वाजता रथोत्सव कार्यक्रम होणार आहे. १७ व १८ एप्रिल रोजी रात्री कन्नड नाटकाचा प्रयोग होणार सादर करण्यात येणार आहे.१८ एप्रिल रोजी ठीक चार वाजता जंगी कुस्तीचा मुकाबला होणार असल्याची माहिती कल्लेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अशोक मुलगे, सचिव संजय सुरवसे यांनी दिली.

तीन दिवस चालणाऱ्या या यात्रेस पंचक्रोशीतील म ोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित राहतात १६ ला लहान रथोत्सव ओडला जातो त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात येतो.१८ एप्रिल रोजी कुस्ती कार्यक्रम होणार असून यानंतर यात्रा सांगता करण्यात येते. वरील कालाधीत महाप्रसाद ची सोय करण्यात आली असून सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सरपंच वनिता सुरवसे, उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, कलेश्वर देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त प्रदीप जगताप यांनी केले.

# प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न तत्काळ सोडवा : खासदार मोहीते-पाटील

### उजनी प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित प्रश्नांवर झाली बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. १६ एप्रिल-**



प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न तत्काळ सोडवण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलण्याची गरज असल्याच्या सूचना खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी आज कुर्डूवाडी येथील बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

माढा तालुक्यातील उजनी प्रकल्पग्रस्त व गावठाण पुनर्वसनासंदर्भातील प्रलंबित प्रश्नांवर अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह यांनी आज दि.१६ एप्रिल रोजी कुर्डूवाडी येथे बैठक घेतली. आ.रणजितसिंह मोहिते-पाटील व खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांनी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्याकडे यासंदर्भात मागणी केली होती. त्या अनुषंगाने आज झालेल्या या बैठकीत अप्पर जिल्हाधिकारी सिंह यांनी उजनी धरण प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या गावांच्या पुनर्वसनासंदर्भातील समस्या, पुनर्वसन योजनेतील अडथळे व नवीन पुनर्वसन धोरणांची अंमलबजावणी या विषयांवर सविस्तर चर्चा केली. गावठाणांतील पायाभूत सुविधा, आणि आर्थिक मदतीचे विषय मांडण्यात आले. यावेळी खासदार मोहिते पाटील यांनी पुनर्वसनासंदर्भातील संबंधित सर्व प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत अशा सूचनाही दिल्या. या बैठकीस आ.अभिजीत पाटील, प्रांत विजया पांगरकर, पुनर्वसन प्रकल्प अधिकारी सुशांत बनसोडे, संबंधित खात्याचे अधिकारी, पुनर्वसन गावातील नागरिक उपस्थित होते.

# भजन स्पर्धेत ब्रम्हचैतन्य अन भक्ती भिवारा संघ प्रथम

### १४ महिला भजनी संघांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.१६ एप्रिल-**




येथिल जागृती तरुण मंडळाने शिवजयंती व गुढीपाडवा निमित्त झालेल्या महिला भजन स्पर्धेत श्रीपूर येथील ब्रम्हचैतन्य तर पंढरपूर येथील भक्ति भिवरा मंडळाने (विभागून) प्रथम क्रमांकाचे बक्षिस मिळवले.

स्पर्धेची सुरुवात प्रतिमापुजनाने झाली. यावेळी मंडळाचे अध्यक्ष अभिजीत आहेरसिंग, उपाध्यक्ष श्रीपाद सुमंत, परिक्षक सुभाष पवार, अजिंक्य नवगिरे, सदस्य मिलिंद कुलकर्णी, प्रा. नितीन देशपांडे, सचिन नागणे, प्रवीण शिंदे, प्रवीण कुलकर्णी, संजय मार्डीकर, मोहीत कुलकर्णी, अब्दुल शेख उपस्थित होते. या स्पर्धेत जिल्ह्यातून १४ महिला भजनी संघानी सहभाग घेतला. द्वितीय क्रमांक विभागून अकलूजच्या ओंकार व पंढरपूरच्या माऊली मंडळास मिळाला. तर तृतीय क्रमांक विभागून सांगोल्याच्या यमाई व श्रीराम भजनी मंडळास मिळाला. विजेत्यांना कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी, सहकार महर्षीचे संचालक ॲड. प्रकाशराव पाटील, उपनगराध्यक्ष भिमराव रेडे -पाटील, पै. अशोक चव्हाण यांचे हस्ते स्मृती चिन्ह व पारितोषक देवून सन्मानित करण्यात आले.

> **‘श्री’ ला ऐतिहासिक संदर्भ**
>
> श्रीपूर वसाहतीचा ‘श्री’ हा ब्रॅन्ड आहे. छत्रपतींच्या काळात हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा असे संबोधले गेले. कदाचित तीच प्रेरणा घेत उद्योगपती कै. चंद्रशेखर आगाशे यांनी ‘श्री’ ब्रॅन्ड पुढे आणून हा परिसर समृद्ध केला. सर्व जाती धर्मातील लोक आज या परिसरात गुण्या गोविंदाने राहत आहेत.
>
> **- डॉ. यशवंत कुलकर्णी, कार्यकारी संचालक**

धर्मसंकीर्तन महोत्सव : तृतीय पुष्प

# सार्थक बावीकर यांच्या भक्तीसंगीताने भरला रंग

### वटवृक्ष मंदीरात महेश इंगळे यांनी केला कलाकारांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ एप्रिल-**



श्री स्वामी समर्थ महाराजांच्या १४७ व्या पुण्यतीथी उत्सवातील धर्मसंकीर्तन महोत्सवात तृतीय पुष्पातील द्वितीय सत्रात सोलापूरचे गायक सार्थक बावीकर, राजेश बावीकर व सहकलाकारांच्या भक्तीसंगीताने रंग भरला.

प्रारंभी सार्थक बावीकर व सहकलाकारांनी राग यमन मधील गुरू चरण लागो ही गुरू महिमा सांगणारी बंदिश सादर केली. त्यानंतर तुझ्या कृपेने, गुरू परमात्मा परेशु, अक्कलकोट स्वामींची पालखी, नाम स्वामींचे येता माझ्या ठाई रे, दत्ताची पालखी, पद्मनाभा नारायणा, ध्यान लागते रामाचे, पंढरी निवासा सख्या पांडुरंगा, भाग्यदा लक्ष्मी बारम्मा, माझी आई अक्कलकोटी, सुखाचे जे सुख, श्रीपाद वल्लभ दिगंबरा इत्यादी भावगीत, भक्तीगीते सादर करुन उपस्थित श्रोत्यांकडून भरघोस दाद मिळवली. गायक सार्थक बावीकर, आदिती कुलकर्णी, पुजा परकीपंडला, श्रद्धा मोरे या सहगायकांना हार्मोनियमवर शर्वरी कुलकर्णी, तबल्यावर झंकार कुलकर्णी, रूपक कुलकर्णी, तालवाद्यावर कौस्तुभ चांगभले, व्हायोलिनवर ज्येष्ठ व्हायोलिन वादक रमाकांत परांजपे यांनी साथ संगत केली. कार्यक्रमाच्या सुरवातीस ओंकार पाठक यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. मंदीर समितीतर्फे चेअरमन महेश इंगळे, प्रथमेश इंगळे यांनी सार्थक बाबीकर, राजेश बाबीकर व सहकलाकारांचा श्री स्वामी सम र्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सन्मान केला. निवेदन धनश्री बावीकर यांनी केले. यावेळी सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्वलाताई सरदेशमुख, बाजीराव शिंदे, दत्तात्रय बाबर, शिवशरण अचलेर, बाळासाहेब एकबोटे, अंकूश केत, शिवपुत्र हळगोदे, सुनिल कटारे, मनोज इंगुले, श्रीशैल गवंडी, धनराज स्वामी, दर्शन घाटगे, बंडोपंत घाटगे, आदीत्य गवंडी, मोहन जाधव, स्वामीनाथ लोणारी, प्रकाश कासेगांवकर, अभिषेक गवंडी, सागर गोंडाळ, ज्ञानेश्वर भोसले, अविनाश क्षीरसागर, चंद्रकांत गवंडी, गिरीश पवार, सचिन हन्नूरे, लखन सुरवसे, सिध्दार्थ थंब, विजयकुमार कडगंची, काशिनाथ इंडे, रविराव महिंद्रकर, खाजप्पा झंपले, महेश मस्कले, संतोष पराणे, प्रसाद सोनार, संतोष जमगे, महादेव तेली यांच्यासह राज्यातून आलेले बहुसंख्य स्वामी भक्त उपस्थित होते.

## संसारात राहूनही परमार्थ साधता येतो

### हभप आरती मुनीश्वर : धर्मसंकीर्तन महोत्सवात प्रवचनसेवा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ एप्रिल-**

आदीनारायण हे एकनाथांच्या गुरुपरंपरेचे मूळ आहे. आदीनारायण- ब्रह्मदेव- अत्रि - दत्तात्रेय- जनार्दन - एकनाथ अशी नाथांची गुरुपरंपरा आहे. नाथांनी संसारात राहूनच परमार्थ साधला त्याप्रमाणे माणसाला संसारात राहूनही परमार्थ साधता येतो असे प्रतिपादन डोंबीवली येथील ह.भ.प.आरती मुनिश्वर यांनी केले.

येथील श्रीस्वामी समर्थांच्या १४७ व्या पुण्यतिथी महोत्सवातील धर्मसंकीर्तन महोत्सवात ‘नाथ परंपरा ते गुरु परंपरा’ या विषयावर हभप मुनिश्वर यांचे प्रवचन झाले. आादीनारायण म्हणजे जे निर्गुण निराभास असून शबलब्रह्माची उत्पत्ती ज्यापासून झाली ते होत. आदीनारायण प्रस्तुत परंपरेचे आद्यगुरू होत. नाथ म्हणतात, जो निर्गुण निराभास । जेथुनि उद्भव शबल ब्रह्मास । आदीनारायण म्हणती ज्यांस । तो सर्वांसी आदीगुरु।। नाथ म्हणतात, ब्रह्मा अत्रीते सांगत । ब्रह्मज्ञान हृदयी भरीत । या नाथ सांप्रदायातील संत एकनाथांच्या जीवन चरित्रावर त्यांनी विवेचन केले. प्रारंभी मंदीर समितीतर्फे चेअरमन महेश इंगळे यांनी ह.भ.प.मुनिश्वर, अनुजा भिडे यांचा स्वामींचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सन्मान केला. यावेळी सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रथमेश इंगळे, शिवशरण अचलेर, श्रीशैल गवंडी, डॉ. मल्लिनाथ बोधले, ओंकार पाठक, अंकुश केत, बाळासाहेब एकबोटे, दर्शन घाटगे, आदित्य गवंडी, उज्वलाताई सरदेशमुख, अनुजा भिडे, ज्ञानेश्वर भोसले, मोहन जाधव, सचिन किरनळी, शिवपुत्र हळगोदे, स्वामीनाथ लोणारी, प्रकाश कासेगावकर, सागर गोंडाळ, अविनाश क्षीरसागर, आदींसह भाविक उपस्थित होते.

## महत्वाचे...



### ज्ञानक्रांती राज्यस्तरीय पुरस्कार वितरण थाटात

**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

मंगळवेढा येथील ज्ञानक्रांती सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने ज्ञानक्रांती राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा थाटात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अॅड. साळुंखे होते. तसेच सुरेश पवार, अॅड. ज्ञानेश्वर मुळे तसेच संस्थेचे शफिक शेख, डॉ. निसार शेख, गिरीधर शिवशरण आदी पदाधिकारी उपस्थित होते. ज्ञानक्रांती राज्यस्तरीय पुरस्कार मंगळवेढा येथील जोगेश्वरी मंगल कार्यालयात पार पडला. सोलापूर येथील दैनिक 'तरुण भारत'चे उपसंपादक किरण बनसोडे यांना श्री संत दामाजीपंत ज्ञानक्रांती राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. साहित्य रत्न पुरस्काराने मारुती बेलभंडारे यांना गौरविण्यात आले. लेखक मारुती बेलभंडारे यांच्या घुसमट या कादंबरीस हा दुसरा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला असून घुसमट या कादंबरीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

**दैनिक 'तरुण भारत'चे उपसंपादक किरण बनसोडे यांचा सन्मान**

### वीरशैव लिंगायत प्रतिष्ठानच्या बसव जन्मोत्सव अध्यक्षपदी सुनील रामशेट्टी

**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

वीरशैव लिंगायत प्रतिष्ठानच्या वतीने बसव जन्मोत्सव निमित्त बसव सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त झालेल्या I बैठकीत बसव जन्मोत्सव अध्यक्षपदी सुनील रामशेट्टी तर कार्याध्यक्षपदी तम्मा कडगंची यांची निवड करण्यात आली. नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार निवृत्त पोलीस उपायुक्त दीपक आर्वे साहेब, प्रा. गजानन धरणे, उदय चाकोते, इरप्पा सालक्की मामा, सुदीप चाकोते, डॉ. प्रकाश घटोळे, पोलीस उपनिरीक्षक राजशेखर





नागशेट्टी आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन मंगेश स्वामी यांनी केले तर आभार शशिकांत बिराजदार यांनी मानले. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजशेखर विजापूरे, बाबासाहेब देशमुख, नरोणे बंधू, शिवानंद सावळगी, विजयकुमार तंबाके, शशिकांत बिराजदार, गिरीश मंद्रूपकर ,सुनील शरणार्थी, अशोक नागणसुरे, मल्लेश पुरवंत, अप्पासाहेब मनगुळी आदी उपस्थित होते.

### २४ एप्रिलपासून तेलुगू भाषा प्रशिक्षण वाचन व लेखन वर्ग

**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

तेलुगू भाषा अभिवृध्दी मंडळ व सार्वजनिक ग्रंथालयाच्या संयुक्त विद्यमाने तेलुगू भाष लेखन, वाचन मोफत प्रशिक्षणाचे आयोजन दि. २४ एप्रिल ते २१ मे पर्यंत सायंकाळी ६ ते ७ या वेळेत श्रीकृष्ण देवस्थान, पूर्वविभाग जुना वालचंद कॉलेज रोड (महात्मा झोपडपट्टी) या ठिकाणी घेण्यात येणार आहे. भाषाचे प्रशिक्षण राज्यलक्ष्मी गाडपल्ली देणार आहेत. २३ एप्रिलपर्यंत नावे नोंदवावी. प्रशिक्षणास येताना नोटबुक व पेन सोबत आणावे. ग्रंथपाल विजयलक्ष्मी गुडूर (९७३०५३२१४३) यांच्याकडे नावे नोंदवावीत, असे आवाहन सचिव तिप्पण्णा गणेरी यांनी केले.

# हब्बू वस्तीत भिम गीतांच्या कार्यक्रमात राडा

## आठ जण जखमी; १५ जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल -**

देगाव रस्त्यावरील हब्बू वस्ती येथे भिम गीतांच्या कार्यक्रमात नाव घेण्याच्या कारणावरून दोन गटात झालेल्या हाणामारीप्रकरणी १५ जणांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना मंगळवारी रात्री १०.३० च्या सुमारास घडली असून यामध्ये आठजण जखमी झाले आहेत.

या हाणामारीत दिलीप रोहिदास फडतरे (वय ५०), ऋषीकेश अशोक फडतरे (वय २२), बलभिम रोहित फडतरे (वय ६७) अशी एका गटातील तर रौनक दत्तात्रय गायकवाड (वय २८), मयुर दत्तात्रय गायकवाड (वय २३), नंदित दत्तात्रय गायकवाड (वय २७), अनित राहुल रणशूर (वय ३५) व ताई चंद्रगुप्त वंदाडे (वय ५०, सर्व रा. हब्बू वस्ती, देगाव रोड, सोलापूर) अशी दुस-या गटातील जखमींची नावे असल्याची नोंद सिव्हील पोलिस चौकीत करण्यात आली आहे.

याबाबत नंदित दत्तात्रय गायकवाड (वय २७) याच्या फिर्यादीवरुन दिलीप फडतरे, एन के क्षिरसागर, कुणाल क्षिरसागर, चंदन क्षिरसागर, ऋषिकेश फडतरे, सचिन फडतरे, बलभिम फडतरे, अशोक फडतरे, रतिकांत क्षिरसागर व त्यांच्यासोबतचे चार ते पाच साथीदार यांच्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे देगाव रोडवरील हब्बू वस्ती येथे बी आर क्रिडा व युवक सेवा मंडळाच्यावतीने भिम गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमादरम्यान गायकाकडून नेहमी दिलीप फडतरे व नवनाा क्षिरसागर यांचे नावाचे गाणे म्हणण्यात येत होते. त्यावेळी नंदित गायकवाड याने आम्ही सुध्दा वर्गणी दतो, आमचेपणे नाव गाण्यादरम्यान का घेत नाही असे विचारले असता दिलीप फडतरे यांनी तुमचा काही संबंध नाही असे म्हणून गायकवाड याचे भाऊ रोनक व मयुर, भावजी अनिकेत रणसुरे यांना फडतरे व इतरांनी मिळून





लाथाबुक्क्याने, लाकडाने, दगडाने, लोखंडी रॉडने मारहाण करून जखमी केले. यावेळी गायकवाड याच्या हातातील सोन्याच्या अंगठ्या पडून गहाळ झाल्या आहेत तर एन के क्षिरसागर याने मयुर याच्या पाठीत तोंडातील दाताने चावा घेऊन जखमी केले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक पाटोळे पुढील तपास करीत आहेत.

# दारुचे सेवन करुन मोटारसायकल चालविल्याप्रकरणी गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.१६ एप्रिल**

मंगळवेढा शहरातील खोमनाळ नाका परिसरात दारुचे सेवन करुन वेडीवाकडी मोटर सायकल चालविल्या प्रकरणी गणेश बाळू उमाटे (वय ४०, रा.अकोले) याच्या विरुध्द





जिल्हा वाहतूक शाखेच्या पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

पोलीसांनी दिलेली माहिती अशी, जिल्हा वाहतूक शाखेचे पथक कारवाईसाठी मंगळवेढ्यात दाखल झाले होते. दि.१६ रोजी २.३१ वाजता हे पथक खोमनाळ नाका परिसरात आल्यानंतर गणेश उमाटे हा त्याच्या ताब्यातील होंडा कंपनीची शाईन मोटर सायकल क्रमांक एम.एच.१३ डी. एच.९३१० ही दारुची सेवन करुन वेडीवाकडी चालवित असताना त्याच्या विरुध्द पोलीस अंमलदार दिपक गाडवे यांनी मोटार वाहन अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे.

# वसीम उर्फ मुकरी सालार दुसऱ्यांदा तडीपार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल -**

सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान, गैर कायद्याची मंडळी जमवून खंडणी वसूल करणे, सर्वसामान्य नागरिकांना मारहाण करून दुखापत करणे असे गंभीर गुन्हे दाखल असलेला सराईत गुन्हेगार व वसिम उर्फ मुकरी अ. रहिम सालार ( वय ३८, रा. सिद्धेश्वर पेठ चमन शहावली टेकडी सोलापूर) यास सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता तडीपार करण्यात आले. पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी आदेश दिले. त्यानुसार पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांनी तडीपारीची कारवाई केली. वसीम उर्फ मुकरी विरोधात वर्ष २००८, २०१० २०१४, २०१५, २०१६, २०१९, २०२०, २०२३ व २०२४ या वर्षात शहरातील विविध पोलीस ठाण्यात अनेक गंभीर होण्याची नोंद झाली आहे.



दरम्यान त्याच्या कडून होत असलेल्या गंभीर गुन्ह्याची नोंद घेत शहर पोलिसांनी त्याच्यावर यापूर्वी स्थानबद्ध तसेच तडीपार या कारवाया केलेल्या आहेत. त्याच्यावर प्रतिबंधक कारवाईही करण्यात आलेली आहे. परंतु परंतु त्याच्या वर्तनात कोणताच बदल झालेला दिसून आला नाही. उलट त्याने गंभीर स्वरूपाचे गुन्हे केल्याची नोंद पोलिसात झाली. यामुळे जेल रोड पोलीस ठाण्याच्या वतीने त्याच्या तडीपरीचा प्रस्ताव पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांच्याकडे सादर करण्यात आला. या प्रस्तावाला उपयुक्त कबाडे यांनी मंजुरी दिली. त्यानंतर त्याला सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता तडीपार करुन त्याला लातूर येथे सोडण्यात आले. ही कारवाई पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक एन. एस. कानडे यांनी केली.

# सराईत गुन्हेगार जमीर शेख दोन वर्षासाठी तडीपार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल -**

शहरातील मुस्लीम पाच्छा पेठ परिसरातील सराईत गुन्हेगार जमीर शेख याच्यावर पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्या आदेशान्वये पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी तडीपारीची कारवाई केली आहे. शेख सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षाकरीता तडीपार करण्यात आले आहे.



जमीर रशीद शेख (वय २९, रा. कालिका मंदीरजवळ, मुस्लीम पाच्छा पेठ, सोलापूर) असे तडीपार करण्यात आलेल्याचे नाव आहे.

जमीर शेख याच्यावर २०२१, २०२२, २०२५ या कालावधीत नागरीकांना दमदाटी व मारहाण करून दुखापत करणे, चोरी करणे, घरफोडी करणे, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणे, यासारखे गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे जेलरोड पोलिसांकडून शेख याच्यावर तडीपारीची कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव पोलिस उपायुक्त कबाडे यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्यास पोलिस उपायुक्त कबाडे यांनी मंजुरी देत जमीर शेख यास सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले. तडीपारीच्या आदेशानंतर सर्वांना ताब्यात घेऊन पुणे येथे सोडण्यात आले आहे.

# आंब्याचे दर आवाक्यात; उच्च प्रतीच्या आंब्याचे दर मात्र स्थिर

### अक्षय्य तृतीयानंतर आंब्याला मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ एप्रिल**

फळांचा राजा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देवगड हापूस आंब्याचे दर सध्या स्थिर झाले आहेत. तर सर्व साधारण रत्नागिरी हापूस, कर्नाटक हापूस व ईतर आंब्याचे दर आवाक्यात आलेले आहेत. सध्या बाजार समितीत आंब्याच्या दरात चढ उतार पहावयास मिळत आहे. आवक वाढल्याने दर आवाक्यात आले आहेत. मात्र उच्च प्रतीच्या आंब्याचे दर सध्या स्थिर आहेत.

दरम्यान, बाजार समितीत सर्व साधारणपणे आंब्याची आवक दुप्पटीने वाढली आहे. सणाच्या पार्श्वभूमीवर आपल्या आंब्याला चांगला भाव मिळेल ही अपेक्षा करत शेतकरी बाजारपेठेत आपला आंबा विक्रीसाठी आणला आहे. प्रति डझन आंब्याचे भाव कमी जास्त प्रमाणात होत आहेत. देवगड व रत्नागिरी हापूस आंब्याला सर्वाधिक मागणी आहे. त्याला पर्याय म्हणून सध्या बाजारात कर्नाटक हापूस दाखल झाला आहे. त्यामुळे दरात चढ उतार पहावयास मिळत आहे. असे असले तरीही उच्च प्रतीच्या देवगड हापूस आंब्याच्या दरात स्थिरता दिसून येत आहे. मागणी कायम असल्याने दर देखील स्थिर राहिले आहेत.



| आंबा प्रकार | दर प्रति किलो |
|---|---|
| देवगड हापूस | ७०० ते ९०० |
| रत्नागिरी हापूस | ५०० ते ७०० |
| कर्नाटक हापूस | ३५० ते ५०० |
| केशर | १५० ते २०० |

**अक्षय तृतीयानंतर आंब्याला मागणी वाढेल**

सध्या बाजारपेठेत तीन ते चार प्रकारचे आंबा विक्रीसाठी दाखल झाले आहेत. त्यामध्ये देवगड हापूस आंब्याला मागणी आहे. अक्षय तृतीया सणात आंब्याला सर्वाधिक महत्त्व आहे. आपल्या पूर्वजांना आंबे व पुरणपोळीचा नैवेद्य दाखवूनच आंबे खातात. त्यामुळे अक्षय तृतीयानंतर आंब्याला मागणी वाढेल. मात्र तरीदेखील उच्च प्रतीच्या देवगड हापूस आंब्याचे दर सध्या स्थिर आहेत.

**- राजेश पाटील, पार्क चौक येथील विक्रेते**

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने

# ९३ वर्षांपासून कार्यरत बी.सी हॉस्टेलमध्ये घडतात विद्यार्थी

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

बहिष्कृत हितकारिणी सभेच्या वतीने १ जानेवारी १९२५ रोजी सोलापुर शहरातील सध्याचे मिलिंद नगर आणि तत्कालीन थोरला राजवाडा याठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील पहिले वसतिगृह सुरू केले होते. देशातील पहिल्या वसतिगृहाचा पहिला मान सोलापूरला मिळाला होता आणि पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु केलेले बी.सी बॉईज हॉस्टेल आणि बी.सी गर्ल्स हॉस्टेल आजही नऊ दशकांतरही त्याच उदात्त हेतूने आजही कार्यरत आहेत..

१ जानेवारी १९२५ हा एक ऐतिहासिक आणि क्रांतिकारी असा दिवस आहे. याच दिवशी सोलापुर शहरातील सध्याचे मिलिंद नगर आणि तत्कालीन थोरला राजवाडा याठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील पहिले वसतिगृह बहिष्कृत हितकारणी सभेच्या वतीने सुरू केले होते. देशातील पहिल्या वसतिगृहाचा पहिला मान सोलापूरला मिळाला होता. या वसतिगृहात तत्कालीन अस्पृश्य,मागासवर्गीय,उपेक्षित घटकातील विद्यार्थी शिक्षण घेत असत.थोरल्या राजवाड्यातील वसतिगृहाच्या माध्यमातून अस्पृश्य, मागासवर्गीय मुलांना प्रगतीचे द्वार खुले झाले होते.

दरम्यानच्या काळात तत्कालीन नगराध्यक्ष रावबहादूर डॉ. विनायकराव मुळे यांची आणि विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर या दोघांमध्ये घनिष्ट मैत्री निर्माण झाली होती. थोरला राजवाडा येथील ते वसतिगृह कमी पडू लागले. आणि पुढे मग येथील अस्पृश्य, मागासवर्गीय मुलांना शिक्षण घेताना राहण्याची सोय व्हावी यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली १९३२ साली सोलापुरात बी.सी बॉईज हॉस्टेल




नावाने मुलांचे हॉस्टेल तत्कालीन नगराध्यक्ष डॉ.विनायकराव मुळे यांनी सुरू केले. तर मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी यासाठी १९३६ साली बॅकवर्ड क्लास गर्ल्स हॉस्टेल सुरू केले होते. ही दोन्ही हॉस्टेल्स ''सोलापूर जिल्हा डिप्रेस्ड क्लासेस एज्युकेशनल सोसायटी'' या संस्थेच्या माध्यमातून चालवली जात होती. आजही ९३ वर्षाच्या कालावधीनंतरही दोन्ही हॉस्टेल्स अविरतपणे चालू आहेत. डॉ. विनायकराव मुळे यांनी हरिभाई देवकरण प्रशालेच्या पाठीमागील बाजूस दीड एकर जागा घेतली होती. याच जागेत १९३२ साली बॅकवर्ड क्लास हॉस्टेल नावाने मुलांचे हॉस्टेल सुरू करण्यात आले. हॉस्टेल सोलापूर जिल्हा डिप्रेस्ड क्लासेस एज्युकेशनल सोसायटी या संस्थेच्या माध्यमातून चालवले जात होते. या ठिकाणी मुलांना राहण्यासाठी प्रशस्त इमारती उभारल्या गेल्या होत्या. स्वयंपाक गृह व इतर सोयीसुविधा चांगल्या प्रकारे विकसित करण्यात आल्या होत्या. संस्थेचे अध्यक्ष डॉ. विनायक मुळे होते. उपाध्यक्ष तत्कालीन नगरसेवक पापय्या बेलपवार होते. या संस्थेवर जिवाप्पा ऐदाळे तज्ञ संचालक म्हणून कार्यरत होते. यासाठी तत्कालीन नगराध्यक्ष डॉ. विनायकराव मुळे आणि त्यांचे बंधू भालचंद्र उर्फ काकासाहेब मुळे यांनी मोठे सहकार्य केले होते. या बॅकवर्ड क्लास हॉस्टेलमध्ये शहर आणि जिल्ह्यातील अस्पृश्य,मागासवर्गीय, उपेक्षित,वंचित घटकातील मुले रहायला होती. या हॉस्टेलमध्ये राहून मुले सोलापूर शहरात असणाऱ्या शाळांमध्ये शिक्षण घेत होते. या मुलांना कोणत्याही अडचणी येऊ नये यासाठी नगराध्यक्ष डॉ. विनायकराव मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सोयीसुविधा पुरवल्या जात होत्या. आजही ९३ वर्षाच्या कालावधीनंतर त्याठिकाणी बॅकवर्ड क्लास बॉईज हॉस्टेल अविरतपणे सुरु आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार प्रेरणेतून सुरू झालेले हे हॉस्टेल आज वटवृक्षाची भूमिका पार पाडत आहे. ही गौरवाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. सध्याच्या विश्वस्त मंडळाच्या मार्गदर्शनाखाली काम सुरू आहे. या कालावधीत हजारो विद्यार्थी शिकून या वसतिगृहातून बाहेर पडले आहेत. त्यांनी उच्च पदस्थ नोकऱ्या प्राप्त केल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे शिक्षण घेता आले. चांगले जीवन जगता आले म्हणून कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आजही माजी विद्यार्थी या हॉस्टेलला भेट देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सहवास लाभलेल्या हॉस्टेलच्या भूमीला नतमस्तक होतात. तसेच वाडिया हॉस्पिटलच्या बाजूस असलेल्या जागेत १९३६ साली मागासवर्गीय मुलींचे हॉस्टेल सुरू करण्यात आले होते. आजही गेल्या ८९ वर्षांपासून हे हॉस्टेल अविरतपणे सुरू आहे. याठिकाणी मुली राहून शिक्षण घेत आहेत. येथे विविध प्रकारचे कोर्सेस शिकवले जात आहेत. काही मोफत आहेत. येथे नर्सिंग कोर्स मोफत शिकवला जातो. त्याचबरोबर योगा,शिवणकाम हे कोर्स शिकवले जात आहेत. बालगृह आहे.येथे अनाथ मुलींना वयाच्या १८ वर्षापर्यंत राहण्याची आणि त्यांच्या शिक्षणाची मोफत सोय केली जाते. येथे मुली शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभारत आहेत... या संस्थेचे विश्वस्त, कार्यकारी मंडळ, व्यवस्थापिका याचं कार्य प्रेरणादायी आहे...

सध्याच्या स्थितीत विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार प्रेरणेतून सोलापूर या क्रांतिकारी भूमीत अशा पद्धतीने मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी नवे वस्तीगृह सुरू करून आगळ्यावेगळ्या पद्धतीने भिमजयंती साजरी करावी असे अपेक्षा आहे.

**अनेक विद्यार्थी उच्च पदस्थ अधिकारी**

या बी.सी बॉईज हॉस्टेलमध्ये राहून शिक्षण घेतलेले विद्यार्थी उच्च पदस्थ अधिकारी झाले आहेत. त्यामध्ये काही वैमानिक झाले तर काहीजण उच्च पदस्थ पोलीस अधिकारी झाले. काहीजण तहसीलदार,मंडल अधिकारी,इंजिनिअर झाले आहेत. या हॉस्टेल मधील विद्यार्थ्यांनी अनेक मोक्याच्या जागा पटकवल्या आहेत. कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आजही माजी विद्यार्थी या हॉस्टेलला भेट देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सहवास लाभलेल्या हॉस्टेलच्या भूमीला नतमस्तक होतात.





डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त देखावा

**सोलापूर : एस.के. फाउंडेशनच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त गुरुनानक चौकात रविकांत कोळेकर यांनी भारताचा कोहिनूर हिरा हा देखावा सादर केला आहे.**

उद्या शुक्र.दि.१८ एप्रिल (सुट्टी) रात्रौ ८ वा. स्मृति मंदिर
ति. वि. bookmyshow आणि सकाळ संध्या. नाट्यगृहावर सुरु
फोन बुकिंग संपर्क : शिवाजी उपरे 9623004299
गाणी मनातली गाणी हृदयातली अर्थात
संदीप सलील लाईव्ह कार्यक्रम....
आर्ट सर्कल पुणे
आयोजित





सादरकर्ते : संदीप खरे
आणि सलील कुलकर्णी

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


चौथे पुण्यस्मरण

तुमचं असणं सर्व काही होतं, आयुष्यातील ते सुंदर पर्व होतं;
आज सर्व काही असल्याची जाणीव आहे
पण..तुमचं नसणं हीच मोठी उणीव आहे.

सुबराव बेलू कटकधोंड
मृत्यू दि. २२ एप्रिल २०२१

• शोकाकुल •
- दशरथ नारायणकर (जावई)
- विजया नारायणकर (मुलगी)
- अविनाश सुबराव कटकधोंड (मुलगा)
- सुनील सुबराव कटकधोंड (मुलगा)
- सचिन विश्वनाथ कटकधोंड
- धनंजय काशीनाथ कटकधोंड व

समस्त कटकधोंड परिवार



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

## ▶▶ महत्वाचे...

### नई जिंदगीत घराच्या अंगणात खेळणा-या मुलाला सर्पदंश

**सोलापूर, दि.१६ एप्रिल**

घराच्या अंगणात खेळत असताना १३ वर्षाच्या मुलाला सर्पदंश झाला. हा प्रकार नई जिंदगी येथील सुमैय्या नगरात घडला. सलीम रेहेमान पठाण (वय ११) असे मुलाचे नाव आहे. सलीम हा मंगळवारी सायंकाळच्या सुमारास घरासमोरील अंगणात खेळंत होता. त्यावेळी त्याच्या उजव्या पायाला सापाने दंश केला. रात्री ९.३० वाजता वडील रेहेमान यांनी त्यास शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



### दुचाकी घसरून १६ वर्षाचा मुलगा जखमी

**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

दुचाकीवरून बाहेर जाताना घरापुढे दुचाकी घसरल्याने १६ वर्षाचा मुलगा जखमी झाला. हा प्रकार बुधवारी सकाळी ११ वाजता घडला. हेमंत मोहन चिटमील (वय १६, रा.जुना विडी घरकुल, सोलापूर) असे जखमी मुलाचे नाव आहे. बुधवारी सकाळी अकराच्या सुमारास हेमंत हा दुचाकीवरून बाहेर जात अंसताना दुचाकी घसरल्याने तो खाली पडला. यात त्यांच्या डोक्यासह चेह-याला जखम झाली असून हाताला व पायाला खरचटल्याने काका गणेश चिटमील याने उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



### रिक्षा पलटी होऊन प्रवाशी महिला जखमी

**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

गिता नगर ते कन्ना चौक् असे रिक्षातून जात असताना रिक्षाचे टायर फुटून रिक्षा पलटी झाल्याने आतील प्रवाशी महिला जखमी झाली. हा अपघात बुधवारी सकाळी अकरा वाजता घडला. अश्विनी लक्ष्मण कोटा (वय ५४, रा. अक्कलकोट रोड, सोलापूर) असे जखमी महिलेचे नाव आहे. बुधवारी सकाळी अश्विनी या रिक्षातून गिता नगरहून कन्ना चौकाच्या दिशेने जात होत्या. रिक्षा गव्हेंमेंट कॉलेजजवळील रस्त्यावरून जाताना रिक्षाचे टायर फुटून रिक्षा पलटी झाली. यात अश्विनी या रिक्षातून खाली पडल्याने त्यांच्या डोक्याला आणि पायाला जखम झाली. नातेवाईक हिरालाल यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.




### ढकलून दिल्यामुळे तरुण जखमी

**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

चेष्टा करतो असे म्हणून ढकलून दिल्याने तरुण जखमी झाला. हा प्रकार बुधवारी दुपारी एक वाजता घडला. विशाल अंबादास कदम (वय २६, रा. कोनापुर चाळ, सोलापूर) असे जखमी तरुणाचे नाव आहे. राहते घराजवळ गणेश शंकर घंटे याने चेष्टा करत असताना ढकलून दिले. यात खाली प्ङल्याने विशाल जखमी झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



















**बाजार समिती घडामोडी छायाचित्रातून : बैठका, चर्चा, फोना-फोनी...**

सोलापूर : सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीसाठी बुधवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता. सकाळपासून दुपारी तीन वाजेपर्यंत शासकीय विश्रामगृहात, बंगल्यावर, हॉटेल, निवडणूक कार्यालयात व बाजार समितीमध्ये बैठका, चर्चा, फोना-फोनी अशा घडामोडी घडल्या. पॅनेलमध्ये आपले नाव आहे हे कळताच कार्यकर्तेमध्ये आनंदाचे वातावरण दिसून झाले. आपले नाव नाही हे कळताच काहीजण नाराज होऊन निघून आले. शेवटी नेते मंडळीनी सुटकेचा श्वास सोडला. (छायाचित्र : केवल तिवारी)

# बाजार समिती निवडणुकीच्या रिंगणात ७० उमेदवार

- मार्केट कमिटीचे सत्ताधारी विरुद्ध राज्याचे सत्ताधारी अशी होणार थेट लढत
- ३९१ पैकी ३२१ उमेदवारांनी घेतले अर्ज मागे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी एकूण ३९१ उमेदवारांनी नामनिर्देशन अर्ज जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडे सादर केले होते. नामनिर्देशन अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी एकूण ३९१ उमेदवारांपैकी ३२१ उमेदवारांनी आपले नामनिर्देशन अर्ज मागे घेतले आहेत. त्यामुळे आता बाजार समितीच्या एकूण १८ जागेसाठी सुमारे ७० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असणार आहेत.

दरम्यान, राज्यात विक्रमी आर्थिक उलाढालीसाठी राज्यात दुसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीवर आपलाच झेंडा राहावा यासाठी सत्ताधारी भाजप काँग्रेस नेते मंडळींनी युती करत श्री सिद्धेश्वर शेतकरी विकास पॅनल स्थापित केले आहे. तर या पॅनल विरोधात माजी सहकार मंत्री तथा आमदार सुभाष देशमुख यांनी श्री सिद्धेश्वर बाजार समिती परिवर्तन पॅनल तयार करून सत्ताधाऱ्यांसमोर कडवे आव्हान उभे केले आहे.

या निवडणुकीत दोन पॅनल व अपक्ष असे एकूण ७० उमेदवार रिंगणात असणार आहेत. अशातच माजी सभापती तथा आमदार विजयकुमार देशमुख यांनी सत्ताधाऱ्यांची साथ सोडलेली आहे. भाजपच्या कार्यकर्त्यासाठी त्यांनी पूर्वाश्रमीचे विरोधक आमदार सुभाष देशमुख यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतल्यामुळे सदरची निवडणूक अधिक रंगतदार आणि चुरशीची ठरणार आहे. दरम्यान बाजार समितीची ही निवडणूक मार्केट कमिटीचे सत्ताधारी विरुद्ध राज्याचे सत्ताधारी अशी ठरणार असून ही निवडणूक कोण जिंकणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. मुळे यांनी माजी आमदार दिलीप माने, श्रीशैल नरोळे, इंदुमती अलगोंडा, सुरेश हसापुरे यांच्या विरोधात तक्रारी अर्ज देवून हे संस्थेचे थकबाकीदार असल्याने त्यांचा उमेदवार अर्ज नामंजूर करावा, अशी मागणी केली होती. मात्र यावर पणन संचालकांनी सुनावणी घेताना तक्रारदार स्वतः हजर राहिले नाहीत, त्यांचे म्हणने उशिराने आले, तक्रारीत पुरावे सादर केलेले नाहीत. सहकारी संस्था अधिनियम आणि पणन अधिनियम वेगवेगळे आहेत. त्यामधील तरतुदी ही वेगवेगळ्या आहेत असे कारण देत मुळेंची तक्रार फेटाळून लावली आहे.

### श्री सिद्धेश्वर शेतकरी विकास पॅनलचे १५ उमेदवार

सोसायटी सर्वसाधारण : दिलीप माने (तिऱ्हे), सुरेश हसापुरे ( निम्बर्गी), राजशेखर शिवदारे (इंगळगी), श्रीशैल नरोळे (लिबीचिंचोळी), प्रथमेश पाटील(भंडारकवठे), उदयकुमार पाटील (संजवाड) नागण्णा बनसोडे (नांदणी). सर्वसाधारण महिला : इंदुमती अलगोंड-पाटील(वडकबाळ,) अनिता केदार विभूते (बोरामणी). सोसायटी ओबीसी प्रवर्ग : अविनाश मार्डेडे (मार्डी). भटक्या जाती-जमाती : सुभाष पाटोळे(होटगी स्टेशन). ग्रामपंचायत मतदार संघ सर्वसाधारण : गणेश वानकर, संगमेश बगले (लवंगी). आर्थिक दुर्बल घटक : सुनील कळके (मुस्ती). अनुसूचित जाती : जमाती रवींद्र रोकडे (बोरामणी)

### श्री सिध्देश्वर बाजार समिती परिवर्तन पॅनल

ग्रामपंचायत : सर्वसाधारण : देशमुख मनिष सुभाष (सोलापूर), चिवडशेटटी रामप्पा चंद्रशेखर (होटगी). अनुसूचित जाती/जमाती : गायकवाड अतुल हरी ( होटगी ) आर्थिक दुर्बल घटक : शहा यतीन विजयकुमार ( भंडारकवठे ) सहकारी संस्था : सर्वसाधारण : हविनाळे चन्नगोंडा गुरुसिध्दप्पा (बरुर), आसबे रमेश नामदेव (अकोले मंद्रुप), बबलेश्वर भिमाशंकर कलप्पा (भंडारकवठे), पाटील आप्पासाहेब मल्लीनाथ (वडकबाळ), पाटील बाळासाहेब दादाराव (विंचूर), पाटील संग्राम प्रतापराव (कौठाळी). अचलारे धनेश सुभाष (बोरामणी). महिला राखीव : पुजारी निलाबाई गुरप्पा (वडकबाळ), गुरव पुष्पा मल्लिकार्जुन (हणमगाव). इतर मागासवर्ग : तेली सुभाष गुरण्णा (होनमुर्गी). विमुक्त जाती, भटक्या जमाती, टेळे संदीप अमृत (औराद).

### नागेश चांगले, राहुल बनसोडे यांची उमेदवारी रद्द

नागेश चांगले यांनी ग्रामपंचायत आर्थिक दुर्बल घटकातून उमेदवारी अर्ज दाखल केली होती. मात्र त्यांचे वय पूर्ण होत नसल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांचा उमेदवारी अर्ज नामंजूर केला होता, राहुल बनसोडे यांचा उमेदवारी अर्जही नामंजूर करण्यात आला होता. पणन संचालकांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा हा आदेश कायम ठेवत त्या दोघांचे अर्ज नामंजूर केले आहेत. त्यामुळे या दोघांची उमेदवारी बाद झाली आहे.

### सत्ताधारी भाजप काँग्रेसच्या नेत्यांचे श्री सिद्धेश्वर शेतकरी विकास पॅनल

सत्ताधारी भाजप काँग्रेस युतीने श्री सिद्धेश्वर शेतकरी विकास पॅनल स्थापन केले आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखालील माजी आमदार दिलीप माने, सुरेश हसापुरे यांच्या गटाच्या श्री सिद्धेश्वर शेतकरी विकास पॅनल विरुद्ध आमदार सुभाष देशमुख प्रणित पॅनल अशी आता ही निवडणूक रंगणार आहे. दरम्यान, उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी बऱ्याच राजकीय घडामोडी घडल्या. आमदार सचिन कल्याणशेट्टी, दिलीप माने, सुरेश हसापुरे हे प्रमुख नेते दिवसभर शासकीय विश्रामगृहावर ठाण मांडून होते. पॅनलमध्ये जाण्यासाठी अनेक नेत्यांनी दिवसभर प्रयत्न केले. दुपारी बाराच्या सुमारास आपल्याला उमेदवारी मिळणार नाही याची चाहूल लागताच माजी संचालक बाळासाहेब शेळके यांनी शासकीय विश्रामगृहातून काढता पाय घेतला.

| निवडणूक रिंगणात असलेले ७० उमेदवार याप्रमाणे | |
|---|---|
| सर्वसाधारण | १९ |
| महिला | ४ |
| ओबीसी | ४ |
| व्हीजेएनटी | ६ |
| ग्रामपंचायत सर्वसाधारण | १० |
| एसीएसटी | १० |
| आर्थिक दुर्बल | ४ |
| व्यापारी | ५ |
| हमाल तोलार | ८ |

### अखेर शिवदारे गटाचे विभूते, ईसापुरे आणि पाटील यांचे अर्ज मंजूर; पणन संचालकांचा सुनावणीत निर्णय

या निवडणूकीत उमेदवारी अर्ज भरलेल्या केदार विभुते, सतीश इसापूरे, सिकंदरताज पाटील यांचे उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी नामंजूर केले होते. त्यामुळे त्यांनी पणन संचालकांकडे अपील दाखल केले होते. पणन संचालक विकास रसाळ यांनी या प्रकरणांची रितसर सुनावणी घेवून यामध्ये उमेदवार ज्या संस्थेचे थकबाकीदार आहे. त्यांनी वसुलीसाठी कोणतेच प्रयत्न केल्याचे अथवा नोटीस बजावल्याचे दिसून येत नाही तसेच उमेदवारांनी येणेबाकीचा दाखला संबधित संस्थेकडे मागविल्याचे दिसून येत. त्यामध्ये रितसर वेळेत संबधित संस्थेने उमेदवारांना कळविले नसल्याचे दिसून येते, असे कारण देत या उमेदवाराचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. मिलिंद मुळे यांनी आर्थिक दुर्बल घटकात अर्ज भरलेल्या उमेश मळेवाडी, सिध्दण्णा थ्वंटे, युवराज कापसे, सिध्दाराम हेले, सुनिल कळके, यतीन शहा, चांद पठाण, बसवराज बगले, दिपक राजमाने यांच्या विरोधातील तक्रारी अर्ज पणन संचालकांनी फेटाळून लावला आहे.

### माजी संचालक शेळकेंचा पत्ता कट; नव्याने गणेश वानकरांना लॉटरी

त्याचप्रमाणे माजी संचालक सिद्धाराम चाकोते, राष्ट्रवादीचे नेते किसन जाधव, उपसभापती श्रीशैल नरोळे, कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष हरीश पाटील, माजी सभापती अशोक देवकते, बक्षी हिप्परगा माजी सरपंच विश्रांत गायकवाड यांच्यासह उमेदवारी अर्ज दाखल केलेले बडे नेते उपस्थित होते. परंतु दिवसभराच्या वेटिंग नंतर शेवटच्या क्षणी माजी उपसभापती श्रीशैल नरोळे यांचा पॅनल मध्ये समावेश झाल्याचे पाहायला मिळाले. सिद्धाराम चाकोते, अशोक देवकते, हरीश पाटील यांच्या पदरी निराशा आली. तर राजशेखर शिवदारे हे सुद्धा पॅनल मध्ये सहभागी झाले आहेत. तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वानकर, मार्डीचे सरपंच अविनाश मार्तंडे, बोरामणीचे रवी रोकडे, माजी सभापती इंदुमती अलगोंडा, केदार विभुते त्यांच्या पत्नी अनिता विभुते, सुनील कळके, सुभाष पाटोळे, उदय पाटील, संगमेश बगले, प्रथमेश वसंत पाटील, नागन्ना बनसोडे यांना मात्र लॉटरी लागली आहे त्यांचा पॅनल मध्ये समावेश झाला आहे.

# वारे बदलले; अखेर भाजपाच्या कार्यकर्त्यासाठी दोन देशमुख येणार एकत्र

- बाजार समिती निवडणूक : आ. सुभाष देशमुख भाजपा कार्यकर्त्यांच्या मागे; मी पण त्यांच्या सोबत राहणार आ. विजय देशमुखांची भूमिका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

शेतमालाच्या विक्रमी उलाढालीसाठी सुप्रसिद्ध असलेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या राजकारणात वेगळ ट्विस्ट आले आहे. सोलापूर बाजार समितीच्या निवडणूक प्रक्रियेतील उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी अनेक राजकीय घडामोडी पाहायला मिळत आहेत. भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांसाठी जेष्ठ आमदार सुभाष देशमुख हे पॅनल उभे करणार असल्याचे निश्चित झाले आहे.

त्यानंतर भाजप आमदार तथा माजी सभापती तत्कालीन सहकार मंत्री सुभाष देशमुख यांचे त्यावेळचे विरोधक आमदार विजयकुमार देशमुख यांनी बाजार समितीच्या निवडणुकीत सुभाष देशमुख यांच्या सोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे. बाजार समितीच्या गत निवडणुकीत आमने सामने निवडणूक लढून जिंकणारे माजी सभापती व आमदार विजयकुमार देशमुख यांनी यंदाच्या निवडणुकीत हातात हात घालून निवडणुकीला सामोरे जाण्याचे ठरवलेले दिसत आहे. भाजप कार्यकर्त्यांच्या कल्याणासाठी दोघेजण एकत्रित येऊन भाजपचे पॅनल उभे करणार असल्याचे दिसून येत आहे. भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांवर जर अन्याय होत असेल, तर आम्ही भाजप पॅनल तयार करून निवडणूक लढवू असा इशारा दिला आहे. दरम्यान, माजी सभापती तथा आमदार विजयकुमार देशमुख म्हणाले, यानिवडणुकीत मी भाग घेणार नाही. हे यापूर्वी सांगितले आहे. परंतु सुभाष देशमुख हे भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांचे पॅनल उभे करणार असतील, तर त्यांना माझा पाठिंबा असेल, मी भाजप कार्यकर्त्यांसाठी त्यांच्या सोबत राहणार असे सांगताना जिल्हाध्यक्षांना मुख्यमंत्र्यांनी सर्व अधिकार दिले आहेत. हे आम्हाला माहीत नाही. तसे कोणी सांगितले ही नाही. असे म्हणत आमदार तथा भाजप जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी यांच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली.



### दोन देशमुख आमदारांची चाय पे चर्चा

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीसाठी आमदार सुभाष देशमुख यांनी भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांचा स्वतंत्र पॅनल उभा केल्यानंतर त्यांनी सायंकाळी पाच वाजता दुसरे ज्येष्ठ आमदार विजयकुमार देशमुख यांच्या काळजापूर मारुती जवळील श्री सिद्धरामेश्वर लीला या निवासस्थानी आमदार देशमुख भेट घेतली. विजयकुमार देशमुख यांनी त्यांचे बुके देऊन स्वागत केले. यादोन्ही आमदार देशमुखांमध्ये बराच वेळ बाजार समिती निवडणुकीच्या अनुषंगाने बराच वेळ चाय पे चर्चा झाली. डॉ. चंद्रगोंडा हवीनाळे, हनुमंत कुलकर्णी, यतीन शहा, भीमाशंकर बबलेश्वर, राम जाधव, सर्जेराव पाटील, अमोल बिराजदार, संग्राम पाटील, राजू काकडे, विशाल जाधव हे उपस्थित होते.

आता ही निवडणूक भाजपाच्या कार्यकर्ते आणि पक्ष संघटन वाढीसाठी महत्त्वाची असल्याने त्यांना ताकद देण्यासाठी मी सुभाष देशमुख यांच्यासोबत आहे.

**- आ. विजयकुमार देशमुख**

बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीचे फायनल उभे असून आता आमच्या सोबत विजय देशमुख यांचीही ताकद आहे. सचिन कल्याणशेट्टी हे जिल्हाध्यक्ष आहेत त्यांना मुख्यमंत्र्यांनी सांगितले असे समजते परंतु आम्हाला तसा काही निरोप नाही, आणि कल्याणशेट्टी यांना निरोप देण्याची वेळ संपली अन् प्रसार माध्यमामार्फत निरोप देण्याची इच्छा नाही.

**- आ. सुभाष देशमुख**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०८९

**नाना कथारुपें भारती । प्रकटली असे त्रिजगती ।**
**आविष्करोनि महामती । व्यासाचिये ।।**

महर्षी व्यासांनी सांगीतल्याप्रमाणे महाभारत ही कथा सर्वगुण संपन्न आहे. या कथेमध्ये जगातीलच काय पण त्रैलाक्यातील सर्वस्व भरुन उरले आहे. मानवी जीवनात निर्माण होणा-या सर्व प्रश्नांची उकल या ग्रंथात झालेली आहे. हा ग्रंथ सखोल विचारांनी परिपूर्ण असा ग्रंथ आहे. सर्व कलाकौतुकाचे, वैभवाचे उगमस्थान त्याचबरोबर विवेक वृक्षाचे अपूर्व उदयान असणारा हा ग्रंथ आहे. दैनंदिन जीवन जगत असतांना आपण लोभ, मोह मत्सर, काम क्रोध अशा शत्रूंबरोबर कळत न कळत लढा देत असतो. त्याचबरोबर कधी-कधी या शत्रूंचे शिकारही होत असतो. या शत्रुंशी कसे लढावे अर्थात, हा महासंग्राम आपण कसा लढावा व नि:स्वार्थाची, शांतीची, आपुलकी व प्रेमाची विजयमाला कशी प्राप्त करावी याचेही मार्गदर्शन या ग्रंथात आहे. प्रत्येकाला सुख प्राप्ती व्हावी असे वाटते म्हणून माणूस- सुख



प्राप्तीसाठी धडपड करीत असतो. सर्व सुखाचे जन्मस्थान, सर्व सिध्दांताचा साठा असणारी ही कथा आहे. नवरसांनी ओतप्रेत भरलेल्या सागराप्रमाणे ही कथा असल्याने आपल्या अडीअडचणीवर सहज योग्य असे मार्गदर्शन या कथेतून प्राप्त होणार असते. ही कथा सर्व विदयाचे मूळपीठ आहे तसेच सर्व शास्त्रसमुहाचे आश्रयस्थान असून ही कथा प्रत्यक्षात परब्रम्हवस्तुच आहे. वर्णाश्रम विरहीत समग्र धर्माचे माहेर, सज्जनांचा जिव्हाळा, सरस्वती देवीच्या सौंर्दयाचे भांडार असलेली ही कथा आहे. विदयेची देवता सरस्वती देवी या कथेच्या रुपाने व्यासाच्या विशाल बुध्दीमध्ये प्रवेश करुन प्रकट झाली असल्याचे ज्ञानदेवांनी म्हटले आहे. श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या मते ही कथा जगातील सर्व महाकाव्याची सम्राज्ञी व ग्रंथांच्या थोरपणाची खाण आहे. या खाणीपासूनच नवरसादी काव्यरसांना डौलदारपणाचा आकार आल्याचे माऊलींचे मत आहे. या कथेमुळे शब्द शोभा उत्तम शास्त्रयुक्त झाली असुन ब्रम्हज्ञानाला कोमलता प्राप्त होऊन ती अधिक वृध्दिंगत झाली आहे. माऊली असेही म्हणतात की या कथेमुळे चतुरतेला शहाणपण प्राप्त झाले असून सिध्दांताला माधुर्य लाभले आहे व सुखाचे सौभाग्य परिपुष्ट झाले आहे. माऊलींच्या या सांगण्याचा अर्थ असा आहे की, मानवाला नितिनियमाने जीवन जगण्यासाठी आवश्यक त्या सर्व बाबींचे मार्गदर्शन तसेच निर्माण येणाऱ्या सर्व अडीअडचणीवर योग्य तो उपाय या ग्रंथात, या कथेत आहे. आपल्या जीवनातील अडीअडचणी सुटुन आपणालाही सुख लाभावे म्हणून आपण या ज्ञानेश्वरी ग्रंथाकडे वळलो तर निश्चितच या ग्रंथरुपाने सुख आपल्या घरी येईल यात शंका वाटत नाही. आम्ही आमच्या बुध्दीला पटेल तसा किंवा आम्हाला सुचेल तसा संत वचनांचा अर्थ काढीत आहोत. त्यामुळे आपणास आमच्या लिखाणात कोठे उणीव जाणवली तर ती उणीव आपण मोठ्या मनाने माफ करावी. आपणास कांही सूचना कराव्या वाटल्या तर त्या आवश्य कराव्यात. आपल्या मार्गदर्शनाचे, सूचनांचे सदैव स्वागत आहे.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : गुरुवार** | **दिनविशेष - चांगला दिवस, मळगंगामाता यात्रा जामगाव ता. पारनेर, जि. नगर** |
| **दि. १७ एप्रिल २०२५** | **....राहू काल....** |
| **विक्रम संवत् २०८१** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **शके - १९४७** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **संवत्सर - क्रोधी नाम** | **मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०** |
| **मास - चैत्र** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **कृ. चतुर्थी (१५.२३)** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **ऋतु - वसंत** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **नक्षत्र - ज्येष्ठा (अहोरात्र)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |
| **योग - वरियन (२४.४९)** | |
| **करण - कौलव (२८.१८)** | |

### राशीभविष्य

**मेष :** कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा. आई वडिलांचे आरोग्य चांगले राहील. नौकरीमध्ये अपक्षेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याचे योग आहे.

**वृषभ :** आपल्या कामात दुसऱ्याची मदत घ्या. समाजात कुटुंबात आपले महत्व वाढेल. व्यावसायिक वाद संपुष्टात येतील. दुसऱ्याचा द्वेष करू नका. व्यापारात प्रगती राहील.

**मिथुन :** सामाजिक स्थिती चांगली राहून कार्यक्षेत्रात वाढ होईल. मनोरंजनाच्या संधी उपलब्ध होतील. व्यापारात अपेक्षीत लाभ होईल. घराच्या संबंधी समस्या वाढतील.

**कर्क :** व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. यश, मान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण समाधानकार राहील. दुसऱ्याची नक्कल करू नका. आनंदी रहा.

**सिंह :** प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील. कौटुंबिक समस्यांची चिंता राहील. नौकरीत आपल्याला बढोत्तरी मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या :** उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन राहील. प्रयत्न केला असता व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील. कौटुंबिक परिस्थती चांगली राहील्यामुळे आनंदी रहाल.

**तुळ :** आजचा दिवस चांगला जाणार आहे. बुद्धी चातुर्याने येणारे संकट दूर होणार आहे. धार्मिक प्रवास होऊ शकतो. व्यापारात प्रगती राहील.

**वृश्चिक :** कुटुंबातील वातावरण तणावपूर्ण राहील. आज आपणास उत्साह वाटणार नाही. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे. कर्ज वाढणार आहे. मित्रांचे सहकार्य मिळेल.

**धनु :** सर्वच ठिकाणी आपणास यश मिळणार आहे. नवीन संधी मिळतील. कोणचाही राग करू नका. आरोग्याच्या तक्रारी संपणार आहेत.

**मकर :** दुसऱ्यावर विसंबून राहिल्याने नुकसान होण्याची शक्यता आहे. अचानक आलेल्या अडचणीमुळे निराश रहाल. घरातील सदस्यांची चिंता राहील.

**कुंभ :** व्यापारात अचानक फायदा होईल. अपूण राहीलेले कामे पूर्ण होतील. मित्रांना आपण मदत कराल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका.

**मीन :** श्रम व धावपळ झाल्यामुळे आपल्या कामाची गती वाढणार आहे. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. विद्यार्थ्यांना शिक्षणात यश मिळेल.मुलांच्या कामामुळे दु:खी रहाल.

# पाणी, घरपट्टीतून ७० कोटींची करवसुली

### ग्रामपंचायत विभागाकडून उल्लेखनीय कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

जिल्ह्यात एक हजार २४ ग्रामपंचायती आहेत. त्या ग्रामपंचायतींकडून मागील ११ महिन्यांत पाणी, घरपट्टीतून ७० कोटी ९३ लाख ४१ हजार रुपयांची कर वसुली करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाने उल्लेखनीय कामगिरी केल्याचे यावरुन दिसत आहे.

ग्रामपंचायत विभागाने २०२४-२५ मध्ये ५३ कोटी ५६ लाख रुपये घरपट्टी वसुलीचे उद्दिष्ट ठेवले होते. फेब्रुवारी अखेरपर्यंत ४६ कोटी ६६ लाख १५ हजार कर वसुली केली आहे. तर पाणीपट्टी करातून २८ कोटी ७५ लाख रुपयांची वसुली करण्याचे उद्दिष्ट होते. त्यातील २४ कोटी २७लाख २६ हजार रुपयांची वसुली ग्रामपंचायत विभागाने केली आहे.

पाणीपट्टी आणि घरपट्टी ही प्रत्यक्षात ग्रामपंचायतमध्ये जाऊन जमा करणे, तसेच ऑनलाईन कर जमा करण्याची सुविधा जिल्हा परिषदेकडून दिली आहे. त्यामुळे हजारो करदात्यांनी प्रत्यक्ष आणि ऑनलाईनद्वारे पाणीपट्टी, घरपट्टी जमा केली आहे. जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाकडून कर वसुलीसाठी सातत्याने पाठपुरावा केल्याने मोठ्या प्रमाणात पाणी आणि घरपट्टी वसुली झाली आहे.

लोकअदालत वसुली पथकांमुळे मोठ्या प्रमाणात कर वुसली झाली आहे. फेब्रुवारी अखेरपर्यंत ७० कोटी रुपयांची वसुली झाली आहे. येत्या आठ दिवसात मार्च अखेरची वसुलीची आकडेवारी कळेल.

**- इशाधीन शेळकंदे,**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत विभाग**

**घरपट्टी व पाणीपट्टी वसुलीची तालुकानिहाय टक्केवारी**

| तालुका | घरपट्टी | पाणीपट्टी |
|---|---|---|
| अक्कलकोट | ८३.११ | ८४.८३ |
| बार्शी | ७४.८८ | ७४.०५ |
| करमाळा | ८५.६५ | ८६.६५ |
| माढा | ७९.७६ | ८७.६१ |
| माळशिरस | ८३.६ | ७९.६१ |
| मंगळवेढा | ८९.८२ | ९०.२१ |
| मोहोळ | ८३.०० | ८५.०० |
| पंढरपूर | ८५.४३ | ८५,२७ |
| सांगोला | ८४.३५ | ८५.४९ |
| उत्तर सोलापूर | ८१.९८ | ८१.३८ |
| दक्षिण सोलापूर | ७५.७५ | ७७.०० |
| **एकूण** | **८७.११** | **८४.४२** |

## विश्वकर्मा पांचाळ सुतार समाजाचा रविवारी वधू-वर पालक परिचय मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

विश्वकर्मा पांचाळ सुतार सामाजिक संस्था पंढरपूरच्या वतीने पंढरपुरात विश्वकर्मा पांचाळ सुतार समाजाचा राज्यस्तरीय वधू-वर पालक परिचय मेळावा रविवार दि. २० एप्रिल रोजी सकाळी ९ ते ५ पर्यंत आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सुतार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पंढरपूर येथील रिलायन्स पेट्रोल पंपा समोरील न्यू सातारा संकुल येथे हा मेळावा होणार आहे. या मेळाव्याचे उद्घाटन माजी आ. प्रशांतराव परिचारक, माजी आ. डॉ. संजय रायमुलकर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी विश्वकर्मा विराट म हासंघाचे अध्यक्ष चंद्रकांत गवळी, अखिल महाराष्ट्र विश्वकर्मा सुतार समाज महासंघाचे अध्यक्ष हनुमंतराव पांचाळ, गणपतराव गायकवाड, क्रांतीनाना मळेगावकर, डॉ. बसवराज सुतार, हभप विष्णू कबीर महाराज , धर्मदाय आयुक्त कार्यालय अधीक्षक सत्यजित कुम ठेकर, उद्योजक हेमंत धावड, सुभाष मस्के, पोलीस पाटील संघटनेचे राज्य अध्यक्ष दिलीप पाटील आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. याप्रसंगी सकाळी ९ वाजता व्यवसाय मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे तसेच आरोग्य शिबिर होणार आहे. या पत्रकार परिषदेस मधुकर सुतार, चंद्रकांत सुतार, सचिन सुतार, नरसिंग सुतार, चंद्रकांत सुतार आदी उपस्थित होते.



# शाश्वत विकासासाठी दुर्मिळ खनिजांचा वापर करा : डॉ. दामा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

शाश्वत विकासासाठी आवश्यक असलेल्या दुर्मीळ आणि महत्त्वपूर्ण खनिजांचा योग्य वापर व संवर्धन करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील भूशास्त्र संकुलाच्यावतीने 'एक पृथ्वी, एक भविष्य: शाश्वततेसाठी विज्ञानांचे एकत्रीकरण' या संकल्पनेवर पी एम उषा अनुदान अंतर्गत आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेस युनिव्हर्सिटी ऑफ केलनिया (श्रीलंका) यांचे सहकार्य लाभले. उद्घाटनप्रसंगी प्रा. डॉ. दामा यांनी शाश्वत विकासाच्या मूलभूत संकल्पना, भूशास्त्रातील बदलते आयाम आणि पर्यावरणविषयक जागरूकतेचा आलेख उलगडून दाखवला. याप्रसंगी व्यासपीठावर प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, भूशास्त्र संकुल संचालक डॉ. विनायक धुळप, डॉ. थारा प्रभाकरन उपस्थित होते. श्रीलंकेम धून प्रा. गुणथीलीका (अधिष्ठाता, सामाजिकशास्त्र) आणि प्रा. लाल मिरविन धर्मश्री यांनी ऑनलाईन माध्यमातून शुभेच्छा दिल्या. परिषदेस श्रीलंका, स्वीडन, अमेरिका, थायलंड, इंडोनेशिया यासह भारतातील विविध राज्यांतून महाराष्ट्र, गुजरात, उत्तर प्रदेश, तामिळनाडू, गोवा, आंध्रप्रदेश, कर्नाटक, बडोदा, पश्चिम बंगाल, केरळ मधील २४० हून अधिक संशोधकांनी सहभाग नोंदवला. परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी सोविनार पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. प्रास्ताविक आणि स्वागत संकुलाचे संचालक व आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजक प्रा. डॉ. विनायक धुळप यांनी केले. सूत्रसंचालन सुलभा बनसोडे, आभार डॉ. अनिल येडगे यांनी मानले



## भूसंपादनानंतर दोन महिन्यात निविदा प्रक्रिया राबवा

### आ. विजयकुमार देशमुख यांच्या सूचना

### महापालिका आयुक्तांसह संबंधित अधिकाऱ्यांची घेतली बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

शहरातील दोन्ही उड्डाण पुलाचे पूर्ण बाधित जागेचे हस्तांतरण म नपा कडून २५ मे पर्यंत करण्यात येणार आहे. त्यानंतर नॅशनल हायवेकडून दोन महिन्यात निविदा प्रक्रिया राबवून प्रत्यक्षात काम सुरू करण्याबाबत आ. विजयकुमार देशमुख यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

आ. विजयकुमार देशमुख यांनी आज महानगरपालिका येथील महापालिका आयुक्त यांच्या दालनात नॅशनल हायवे अधिकारी, भूमी संपादन विशेष अधिकारी व नगर रचना विभाग यांच्या समवेत सोलापूर शहरातील दोन्ही उड्डाणपूलाचे काम प्रलंबित असल्याने यावर बैठकीत चर्चा करण्यात आली. यावेळी म हापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सभागृहनेते शिवानंद पाटील उपस्थित होते. या बैठकीत छत्रपती संभाजी महाराज चौक ते पत्रकार भवन व जुना बोरामणी नाका ते पत्रकार भवन पर्यंतच्या उड्डाण पुलाचे पूर्ण बाधित जागेचे हस्तांतरण मनपा कडून २५ मे पर्यंत करण्यात येणार आहे. त्यानंतर नॅशनल हायवे कडून दोन महिन्यात निविदा प्रक्रिया राबवून प्रत्यक्षात काम सुरू करण्याबाबत आ. विजय देशमुख यांनी इतर संबंधित अधिकाऱ्यांन समवेत चर्चा केली. सोलापूर शहरातील त्या दोन्ही उड्डाणपुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, अशा संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

# जिल्ह्यातील २८ टक्के शेतकरी अजूनही 'फार्मर आयडी'पासून दूरच


### आठ दिवसांत कार्ड काढा अन्यथा योजनांना मुकाल

### जिल्हा कृषी अधीक्षक शुक्राचार्य भोसले

**तभा वत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

कृषी विभागाच्या योजनांचा फायदा घेण्यासाठी येत्या १५ एप्रिलपासून शेतकरी ओळख क्रमांक अनिवार्य करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना या ओळख क्रमांकाशिवाय कोणत्याही योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी तातडीने ॲग्रीस्टॅक पोर्टलवर आपल्या नावाची नोंदणी करावी, असं आवाहन जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे. दरम्यान, जिल्ह्यातील पीएम किसान योजनेचे लाभार्थी असलेल्या २८ टक्के म्हणजे १ लाख ९३ हजार ९४ शेतकऱ्यांनी अजून फार्मर आयडीसाठी नोंद केली नसल्याचीही माहिती त्यांनी आज (दि. १५) दिली. दरम्यान, आजभागायत ४ लाख ९७ हजार ६४२ शेतकऱ्यांनी किसान कार्डच्या पोर्टलवर नोंदणी केल्याचेही त्यांनी नमूद केले.

केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध शेतीविषयक योजनांचा लाभ घ्यायचा असल्यास शेतकऱ्यांकडे



शेतकरी ओळखपत्र असणं आवश्यक आहे. केंद्र सरकारच्या कृषी आणि शेतकरी विकास मंत्रालयाकडून ॲग्रीस्टॅक या डिजीटल उपक्रमाद्वारे शेतकऱ्यांना ओळखपत्र देण्यासंदर्भात निर्णय घेतला गेला आहे. महाराष्ट्रात देखील शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅक अंतर्गत डिजीटल शेतकरी ओळखपत्रासाठी नोंदणी करावी लागणार आहे. फार्मर आयडीसाठी नोंदणी कुठं करायची? कोणती कागदपत्रं असणं आवश्यक आहेत याची शेतकऱ्यांना माहिती असणं आवश्यक आहे.

### १५ एप्रिलपर्यंत नोंद न केलेल्या तालुक्यांची आकडेवारी

जिल्ह्यात एकूण पीएम किसान लाभार्थी ६ लाख ९० हजार ७३६ शेतकरी आहेत. यामधील ४ लाख ९७ हजार ६४२ जणांनी फार्मर आयडीसाठी पोर्टलवर नोंद केली आहे. तर १ लाख ९३ हजार ९४ शेतकऱ्यांनी अजून फार्मर आयडीसाठी नोंद केली नाही. पीएम किसान लाभार्थ्यांपैकी नोंद न केलेल्यांमध्ये माढा २२ हजार ५५०, करमाळा २३२६०, दक्षिण सोलापूर १३५८४, पंढरपूर ३०२७५, मंगळवेढा १६३८३, मोहोळ १५७८४, अक्कलकोट १४७२३, बार्शी ८९६५, सांगोला २४९६६, उत्तर सोलापूर १५५६, माळशिरस २१०४८ अशी आहे.

### किसान सन्मान निधीसाठीही 'आयडी'ची गरज

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेसाठी देखील फार्मर आयडी आवश्यक शेतकऱ्यांना जर पीएम किसान सन्मान निधीच्या १९ व्या हप्त्याची रक्कम मिळवायची असल्यास फार्मर आयडी मिळवावा लागेल. पीएम किसान योजनेंतर्गत शेतकऱ्यांना एका वर्षामध्ये ६००० रुपयांची रक्कम तीन समान हप्त्यांमध्ये दिली जाते. त्यामुळं आगामी १९ व्या हप्त्याची रक्कम मिळवायची असल्यास शेतकऱ्यांना फार्मर आयडी मिळवणं आवश्यक आहे.

## बालरंगभूमी परिषदेतर्फे निवासी कला-संस्कार शिबिर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १६ एप्रिल-**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेशी बालरंगभूमी परिषदेतर्फे कोल्हापूर येथील कणेरी मठात निवासी कला-संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती मुंबईच्या वतीने सोलापूर शाखेच्या अध्यक्ष हे कला-संस्कार शिबिर दोन टप्प्यात होणार असून, पहिले संस्कार शिबिर दि. २ ते ४ मे या कालावधीत तर दुसरे संस्कार शिबिर दि. ६ ते ८ मे या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. शिबिरामध्ये महाराष्ट्रातील बालरंगभूमीच्या २८ शाखांम धील ९ ते १५ या वयोगटातील बालकांना सहभाग घेता येणार आहे. मुलामुलींसोबतच पालकांनाही या शिबिरात सशुल्क भरून सहभागी होता येणार आहे. शिबिरासाठी प्रवेश मर्यादित असून, मुला मुलींनी आणि पालकांनी सहभागी होण्यासाठी बालरंगभूमी परिषदेच्या सोलापूर शाखेशी उपाध्यक्ष प्रा.अर्चना अडसूळ (७३८५१९८३७४) आणि कार्यकारणी सदस्य अन्नपूर्णा साखरे (८६९८५४००७०) या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहनही बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती मुंबईच्या वतीने सोलापूर शाखेच्या अध्यक्ष सीमा श्रीगोंदेकर-यलगुलवार यांनी केले आहे.



## भीम जयंतीनिमित्त मिठाई वाटप

**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पालिका नागरी हिवताप योजना (मलेरिया) विभागाच्या वतीने मिठाईचे वाटप करण्यात आले.

मलेरिया विभागाच्या प्रमुख स्वाती अनपट, संदिप कुर्डे, गणेश माने, जहुर यादगिर यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी एस एफ डब्ल्यू श्रीनिवास कोंडा, दिगंबर यरझल, समीर शेख, वालचंद पाटील, अरविंद गजधाने, प्रभाकर कदम, मेहबूब सोडेवाले, सदाशिव बामने, अध्यक्ष सिद्धेश्वर सावंत, परमेश्वर कसबे, महेश कदम उपस्थित होते. कार्यक्रमास विष्णू भालेराव, दत्तात्रय शिंगे, नितीन तळभंडारे, सुशिल सुरवसे, युवराज बनसोडे, मल्हारी गायकवाड, अनिल शिवशरण, बाबू टोनपे, संजय सरवदे, शरद लोंढे,कैलास गायकवाड, अख्तर शेख,भिमराव रोकडे, अब्दुल इनामदार, प्रताप उघडे, योगेश माने, बालाजी आलुरे, अंजन गोन्याल, रामदास शिंदे, विजय पवार, देविदास फुले, वैभव शिवशरण उपस्थित होते.

## 'ज्ञान प्रबोधिनी'त झाले अभिव्यक्ती कलांचे सादरीकरण

### मोबाईलचे फायदे - तोटे दिले पटवून

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा विकास व्हावा, या उद्देशाने येथील ज्ञानप्रबोधिनी प्रशालेतील इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी शास्त्रीय नृत्य, गायन, वादन, अभिनय आदी अभिव्यक्ती वर्गाचे आयोजन करण्यात येते. वर्षभर अभिव्यक्ती वर्गात शिकलेली कला विद्यार्थ्यांनी अभिव्यक्ती कला सादरीकरणाच्या वर्षाअखेर उपक्रमांमध्ये सादर केली.

विद्यार्थी त्यांच्या आवडीच्या कलेची निवड करून साप्ताहिक तासिकांमध्ये त्या कलेचे प्रारंभिक शिक्षण घेतात. यासाठी सोलापुरातील तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन त्यांना लाभते. या कलांमध्ये तबला, बासरी, संवादिनी, अभिनय, चित्रकला, शिल्पकला, कथक, भरतनाट्यम, गायन या कला मुले शिकत आहेत. कथ्थक नृत्यामधील छोटी



अहमद, विविध तोडे सादर केले. तबला वादन वर्गातील विद्यार्थ्यांनी पारंपारिक तालवादनासह, तोडी, भजनी ठेकाचे सादरीकरण केले.

अभिनय वर्गातील विद्यार्थ्यांनी 'मोबाईलचे फायदे-ताटे' ही लघुटनाटिका सादर केली. मोबाईलचे फायद्यांसह, त्यामुळे होणाऱ्या शारीरीक, मानसिक आरोग्यावर त्याचे होणारे वाईट परिणाम, त्यापासून घ्यावयाची काळजी, यावर सादर केलेल्या प्रबोधनात्मक नाटिकेने उपस्थितांना आत्म-चिंतनास प्रवृत्त केले. या नाटकातील विद्यर्थी कलाकारांचे संवाद, अभिनय कौशल्य पाहून पालकप्रेक्षकांसह, प्रमुख अतिथी अवाक झाले. ज्येष्ठ नाट्यकलावंत राजू मोहोळकर यांनी विद्यार्थ्यांना त्या अभिनय प्रशिक्षण दिले होते. भरतनाट्यमच्या विद्यार्थीनींनी विविध तोडे नृत्याद्वारे सादर केले. बासरी वादनाच्या विद्यार्थ्यांनी भूप राग वाजविला. कार्यक्रमास बाल रंगभूमीच्या अध्यक्षा सीमा यलगुलवार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संस्थेचे विश्वस्त श्रीरंग कुलकर्णी, पालक शिक्षक संघाच्या अध्यक्षा रुपाली कुलकर्णी उपस्थित होते.

## महामानवास अभिवादन



### दलित महासंघ, बार्शी

दलित महासंघाच्यावतीने जुना गांधी पुतळा चौक येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. तहसीलदार एफ. आर. शेख, मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, पोलीस उपाधीक्षक जालिंदर नालकुल, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, शिवाजी शिक्षण संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी माजी बांधकाम सभापती ज्योतिर्लिंग कसबे, जिल्हाध्यक्ष सुनील अवघडे, शहराध्यक्ष संदीप अलाट, तालुकाध्यक्ष संगीतराव शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष निलेश खुडे, ॲड. अमोल आलाट, ऍड. राहुल झालटे, ॲड. विशाल गोणेकर, अमृत आल्हाट, सतीश झोंबाडे, संतोष कांबळे, संतोष कसबे उपस्थित होते. याप्रसंगी पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण यांनीही विचार व्यक्त केले. वक्तृत्व स्पर्धेत विविध ठिकाणी उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या सुरभी कसबे हिचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.




### लोकमंगल कृषी महाविद्यालय, वडाळा

लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अमोल शिंदे होते. यावेळी मान्यवर आणि विद्यार्थी प्रतिनिधींच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. प्रास्ताविक विद्यार्थी सचिन मारकड याने केले. यावेळी अंकिता रेड्डी, कुमुदा आणि प्रथम वर्षातील ऐश्वर्या बिरादार या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. अजित कुरे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार सद्यस्थितीला विद्यार्थी दिशेत विद्यार्थ्यांनी स्वतःमध्ये रुजविणे अत्यंत आवश्यक असल्याचे विशेष नमूद केले. अध्यक्षीय मनोगत डॉ. अमोल शिंदे यांनी व्यक्त केले. विद्यार्थी प्रतिनिधी केशव जगदाळे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन विद्यार्थी प्रतिनिधी उत्कर्ष लाड याने केले. कार्यक्रमास प्रा. सुजाता चौगुले, प्रा. प्रज्ञा कुदळे, प्रा. सुकन्या जाधव, प्रा. अजिंक्य ढोरे, प्रा. अंश आडे, डॉ. पुरशुराम कांबळे उपस्थित होते.



### मुंडेवाडीमध्ये व्याख्यानमालेचे आयोजन

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक राजकीय आणि शैक्षणिक क्रांती जगातील अत्यंत महत्त्वाची असून राष्ट्र जडणघडणीमध्ये त्यांचे कार्य क्रांतिकारक ठरले असल्याचे प्रतिपादन प्रबोधनकार पत्रकार गौतम बाळशंकर यांनी केले.अक्कलकोट येथील मौजे मुंडेवाडी येथील भीम जयंतीच्या व्याख्यानमालेच्या प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. मुंडेवाडीकर हे होते .प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख, विश्वनाथ शिंदे यांनी केले. यावेळी उत्सव समितीचे अध्यक्ष, प्रकाश राजेंद्र शिंदे, उपाध्यक्ष चोखामेळा शिंदे, मारुती आप्पा मुंडेवाडी कर, अनिल शिंदे आदी मान्यवर गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### सांगोला महाविद्यालय, सांगोला

सांगोला महाविद्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी इंग्रजी विभागप्रमुख डॉ. अर्जुन मासाळ यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रतिमा पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन अधिक्षक प्रकाश शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली डॉ.एम.ए. जगताप, महादेव काशिद यांनी केले.



### संभाजी ब्रिगेड संपर्क कार्यालय, जेऊर

जेऊर (ता.करमाळा) येथील संभाजी ब्रिगेड संपर्क कार्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी आदिनाथ माने यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सागर बनकर, संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष नितीन खटके, निलेश पाटील,अतुल निर्मळ, किशोर कदम, आदिनाथ माने, पिंटू जाधव, सागर बनकर, सागर कोठावळे, सागर साखरे, उमेश मोहिते, अजित उपाध्ये, अविनाश घाडगे इत्यादी उपस्थित होते.

# अखेर धाकटी वेस येथील पुलाच्या कामास झाली सुरुवात

## विद्यार्थी, ग्रामस्थ, शेतकरी, व्यापारी यांचा प्रवास होणार सुखकर

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १६ एप्रिल-**

करकंब (ता. पंढरपूर) येथील करकंब गाव ते जळोली चौक दरम्यानच्या धाकटी वेस येथील ओढयावरील पुलाच्या कामाला अखेर सुरूवात झाली आहे. त्यामुळे यावरून होणारी वाहतून आता निर्धोक होईल अशी आशा आहे. याबाबत दै. सोलापूर तरूण भारतने वारंवार केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

या ओढ्याच्या दोन्ही बाजूला असणाऱ्या बंधाऱ्याची उंची ही पुलापेक्षा जास्त असल्यामुळे सदर बंधारा भरल्यानंतर संबंधित पुलावरून ३ ते ४ फूट उंचीवरून पाणी वाहते. ओढ्याच्या एका बाजूस जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा तर दुसऱ्या बाजूस ओढ्यापासून ३०० मीटर अंतरावर माध्यमिक शाळा आहे. या दोन्ही शाळांतील विद्यार्थी, शेतकरी, ग्रामस्थ व व्यापारी यांना या पुलावरून पाणी वाहत असताना जीव मुठीत धरूनच प्रवास करावा लागत होता. पुलावर पाणी आल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना पलीकडे जाता येत नसल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होत होते. याबाबत दैनिक तरुण भारतने दि.१ जानेवारी २०२५ रोजी वृत्त प्रसिद्ध केले होते. या वृत्ताची दखल घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने सर्व प्रक्रिया पूर्ण करत सदर पुलाच्या कामास आता सुरूवात केली आहे. पावसाळ्यात जळोली चौक व त्या परिसरातील विद्यार्थी, ग्रामस्थ, शेतकरी, व्यापारी यांना करकंब गावात येण्यासाठी नेमतवाडी चौकातून २ किलोमीटरचे अंतर पार करून यावे लागत होते. हा पूल झाल्यानंतर संबंधितांचा वेळ व त्रास वाचणार आहे. करकंब येथील अजितसिंह देशमुख मित्र मंडळाने तात्कालीन आमदार बबनदादा शिंदे व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे या पुलाची उंची वाढविण्यासंदर्भात गेल्या तीन वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा केला आहे. मा.आमदार बबनदादा शिंदे यांनी यासाठी निधी उपलब्ध करून दिला होता. तर विद्यमान आमदार अभिजीत पाटील यांनीही विधिमंडळात मतदारसंघाचा हा प्रश्न मांडला आहे. तसेच 'दै. तरूण भारत' ने याबाबत वारंवार पाठपुरावा केल्याने अखेर कामास सुरूवात झाली आहे.






तरुण भारत इम्पॅक्ट

सदर पुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर नागरिक, शेतकरी, ग्रामस्थ, विद्यार्थी यांची होणारी गैरसोय दूर होऊन त्यांचा प्रवास सुखकारक होणार आहे. या पुलाचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यात यावे अशा प्रकारची मागणी विद्यार्थी, शेतकरी, ग्रामस्थ, व्यापारी यांच्याकडून करण्यात येत आहे.

या कामासाठी बजेटमधून २ कोटी ७० लाख रुपयांचा निधी मंजुर झाला आहे. हे काम एक वर्षाच्या कालावधीत पूर्ण करण्याचे निश्चित झाले आहे. तरीसुध्दा नागरिक, ग्रामस्थ, विद्यार्थी, शेतकरी यांची गैरसोय टाळण्यासाठी हे काम मुदतीपूर्वी शक्यतो पावसाळा सुरू होण्याअगोदरच पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न करणार आहोत.
**- अजितसिंह देशमुख, अशोकसिंह देशमुख. संबंधित कॉन्ट्रॅक्टर.**

### संबंधित कामाचे एकाच दिवशी दोन वेळा उद्घाटन

संबंधित पुलाच्या बांधकामाचे उद्घाटन एकाच दिवशी दोन वेळा करण्यात आले. माढा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार अभिजीत पाटील यांनी या बांधकामाच्या कामाचे उद्घाटन केले. याप्रसंगी अमोल शेळके, पैलवान सुभाष गुळमे, अजित देशमुख, राजु शेट्टी आदि उपस्थित होते. त्यानंतर काही वेळातच जि.प.मा.सभापती रणजीतसिंह शिंदे यांच्या हस्तेही उद्घाटन करण्यात आले. यावेळी सरपंच आदिनाथ देशमुख, शरदचंद्र पांढरे, सचिन शिंदे आदी उपस्थित होते. त्यामुळे या पुलाच्या बांधकामाच्या उद्घाटनाची सर्वत्र चर्चा होताना दिसून येत आहे.

# अणदूर येथे मिरवणुकीने रामनवमी उत्सवाची सांगता

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. १६ एप्रिल-**

येथील श्रीराम प्रतिष्ठानच्या वतीने घेण्यात आलेल्या पाच दिवसीय रामनवमी उत्सवाची सांगता मिरवणुकीने झाली.

अणदूर ते नळदुर्ग रामतीर्थ या ठिकाणी पायी दिंडी, महाप्रसाद करण्यात आला. राममूर्तीची प्रतिष्ठापना आण्णा चौकात करण्यात आली. यावेळी विविध स्पर्धा पार पडल्या. यामध्ये चित्रकला, रांगोळी, सामान्य ज्ञान, वक्तृत्व या स्पर्धांचा समावेश होता.

स्पर्धेचे प्रथम पारितोषिक कै. प्रभाकर धुमाळ गुरुजी व द्वितीय कै. प्रकाश घोडके गुरुजी यांच्या स्मरणार्थ देण्यात आले. यावेळी रक्तदान शिबिरामध्ये ५५ जणांनी रक्तदान केले. रक्तदान शिबिर सिद्धेश्वर ब्लड बँक सोलापूर व श्रीराम प्रतिष्ठान अणदूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. हनुमान जन्मोत्सवच्या दिवशी श्रीराम नवमीचा समारोप गावातून मिरवणूक काढून झाला. मिरवणुकीत युवक सहभागी झाले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी, राजकुमार गाढवे, आकाश आळंगे, गणेश मुळे, चेतन कस्तुरे, केतन हागलगुंडे,शरण मुळे, सिद्धेश्वर मातोळकर, प्रज्योत पाटील, अंकुश मोकाशे, आदित्य चव्हाण, लक्ष्मण वाघे, शुभम चव्हाण, मिथुन राठोड, बंटी राठोड, सोमनाथ लंगडे, सागर लोंढे, शुभम गाढवे, सोमनाथ पोतदार, अभिलाष करपे यांनी परिश्रम घेतले.



### विविध स्पर्धेतील विजेते अनुक्रमे (प्रथम, द्वितीय, तृतीय)

चित्रकला लहान गट : रुद्र बनसोडे, निहारिका पोतदार, श्रेया अंभोर. चित्रकला मोठा गट: जानकी माताटे, प्रतीक्षा गळाकाटे, श्रुती नाईकवाडे. रांगोळी पहिली ते चौथी : ईश्वरी हीरतोट, निहारिका पोतदार, दिव्यश्री पोतदार. रांगोळी पाचवी ते सातवी : श्रुती नाईकवाडे, प्रणाली घुगे, ईश्वरी भांगे. रांगोळी आठवी ते दहावी : प्रतीक्षा गळाकाटे, जानकी माताटे, अनन्या आंबुरे. सामान्य ज्ञान लहान गट : संध्या पवार, आरुषी घोडके, ईश्वरी दुधभाते, आरव आरदवाड. सामान्य ज्ञान मोठा गट : अनुष्का घोडके, प्रतीक्षा गळाकाटे, आदित्य घोडके, रुद्राली सारणे. वक्तृत्व लहान गट : ईश्वरी भांगे, प्राजक्ता घुगरे, सार्थक कणसे, उत्तेजनार्थ मयुरेश्वर नाईकवाडे. वक्तृत्व मोठा गट : प्रतीक्षा गळाकाटे, श्रुती नाईकवाडे, सृष्टी कणसे, उत्तेजनार्थ अनन्या राहुल अंबूरे.

# ध्येय निश्चित करुन प्रयत्न करा : डॉ. सावन पालवे

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १६ एप्रिल-**

परीस्थितीचा बाऊ करत बसण्यापेक्षा विद्यार्थ्यांनी सातवी-आठवी पासूनच आपले ध्येय निश्चित करुन अभ्यास केला तर यश तुमच्या मागे धावेल असे मत अकलूज येथील दंतरोग तज्ञ डॉ. सावन पालवे यांनी व्यक्त केले.



शंकरनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळ सुनयनानगर यांचेवतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त प्रतिकुल परीस्थिती वर मात करुन डॉक्टर झालेले डॉ.सावन पालवे व डॉ. विक्रांत माने यांचा सन्मान करण्यात आला. त्यावेळी डॉ. सावन पालवे यांनी उपस्थित मुलांना आपल्या यशाचे गमक सांगितले. यावेळी डॉ. विक्रांत माने यांनी बोलताना म्हटले की युट्युब च्या सहाय्याने च आपण परदेशात वैद्यकीय प्रवेश मिळविण्यात यशस्वी झालो.त्यामुळे सध्याच.या यरुणाईने समाज माध्यमांचा चांगला उपयोग करुन घ्यावा असे सुचविले. याप्रसंगी विनायक माने, पवन दोरकर, अथर्व कांबळे, सम्राट बनसोडे, सिध्दीक कांबळे, मधुरा जाधव, पृथ्वीराज दोरकर या बालकांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी जेष्ठ नागरिक दादा जाधव, नाना कडाळे, विलास भोसले, बाळासाहेब मोरे, मकबुल पठाण, ग्रामपंचायत सदस्य वसंतराव माने-पाटील, विष्णू नाईकनवरे, देविदास कांबळे उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी देविदास जाधव, पुष्पा जाधव, विष्णू नाईकनवरे यांनी परीश्रम घेतले.

# गरिबांच्या 'फ्रीज'ला वाढली मागणी

## अक्कलकोट आठवडा बाजारात होतेय डेऱ्यांची मोठी विक्री

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १६ एप्रिल-**

शहर व तालुक्यात उन्हाची तीव्रता वाढू लागली असून, तापमानाचा पारा ४१ अंश पार झाला आहे. दुपारच्या वेळी उन्हाची तीव्रता जास्त असल्याने उन्हाळ्याच्या दिवसात पिण्यासाठी थंड पाणी आवश्यक वाटत असून, त्यासाठी डेऱ्याची गरज निर्माण झाली आहे. डेऱ्यातील पाणी आरोग्यासाठी फायदेशीर ठरत असल्याने कुंभार कारागिरांच्या डेऱ्याची मागणी वाढली असल्याचे चित्र शहर ग्रामीण भागात पाहवयास मिळत आहे.

सकाळी दहा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत तीव्र उन्ह पडत असल्याने उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये थंड पाण्याची गरज प्रत्येक माणसाला जाणवते. थंड पाणी मिळवण्यासाठी नागरिक डेऱ्याची तसेच फ्रिजचा वापर करत असतात. फ्रिजच्या माध्यमातून हे थंड पाणी उपलब्ध होत असले तरी डेऱ्यातील पाण्याची चव आणि आरोग्यासाठी डेऱ्यातील पाणी लाभदायक असल्याने अनेक लोक डेऱ्यातील पाणी पिण्याला पसंती देत आहेत. सध्या दर सोमवारी अक्कलकोटच्या आठवडा बाजारात नागरिक डेरा खरेदी करताना पाहवयास मिळत आहेत. एका डे-यास १५० व ते ३०० रुपये बाजारभाव मिळत आहे. सध्या तरी नागरिक डेरा खरेदी करून या डेऱ्यात पाणी साठवून पिण्यासाठी वापर करत आहेत. विजेच्या लपंडावामुळे अनेक वेळा फ्रिज असूनही त्याचा उपयोग होत नाही. त्या तुलनेत डेरा कायमच थंड पाणी देत असल्याने कोणत्याही खर्चाविना डेऱ्यातील पाणी उपलब्ध होत असल्याने नागरिक डेरा खरेदी करत असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत आहे.



### परगावातील डेरा विक्रेते दाखल

सध्या पारंपरिक पद्धतीने काळ्या रंगाच्या डेरा बनविलेल्या स्थानिक डेरांबरोबरच परगावांतून येणाऱ्या काळ्या रंगाच्या डेराची मागणी आहे. तसेच परराज्यातील लाल माठांना नळ बसवलेला असल्याने अनेक दुकानदार लाल माठांना पसंती देत आहेत. घरगुती वापरासाठी स्थानिक कारागिरांनी बनवलेल्या काळ्या डे-यांची मागणी जास्त आहे.

जिल्ह्यातील अनेक गावांत काळ्या मातीपासून डेरा बनविला जातो. यातील पाणी थंडच आणि आरोग्यासाठी चांगले असते. मोठ्या डेऱ्याचा दर २०० ते ३५० रुपये तर लहान डेऱ्याचा दर १५० ते २५० रुपयांपर्यंत आहेत, अशी माहिती बासलेगावचे कारागीर शशिकांत कुंभार व दिलीप कुंभार यांनी दै. तरुण भारतशी बोलताना दिली.



# चव्हाण महाविद्यालयात अग्निवीरांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि. १६ एप्रिल-**

यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या विजयश्री सभागृहामध्ये एन.सी.सी विभागातील कॅडेट यांची अग्नीवीर व पोलीस भरतीमध्ये निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार महाविद्यालयातवतीने करण्यात आला.

महाविद्यालयातील एन.सी.सी कॅडेटची अग्निवीर भरतीमध्ये समर्थ वीर, सिद्धेश्वर साळुंखे, सत्यवान राऊत, सुरज गिरवले, सोमनाथ ठोंबरे,विनोद निमगिरे तर पोलीस भरतीमध्ये निकिता बनकर, ज्योती मुसळे भरती झाल्याबद्दल त्यांचा महाविद्यालयाच्यावतीने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. बी. पाटील उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव विलासराव घुमरे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलींद फंड, संस्थेचे सहसचिव विक्रमसिंह सूर्यवंशी उपस्थित होते. यावेळी समर्थ वीर, ज्योती मुसळेने मनोगत व्यक्त केले. संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रस्ताविक एनसीसी विभागाच्या कॅप्टन डॉ.विजया गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. मुक्ता काटवटे यांनी केले तर आभार सीटीओ प्रा. राम काळे यांनी मानले.

# पंढरीतील ५५० मावळ्यांचे रायगडावर छत्रपतींना अभिवादन

## शिवभक्त प्रतिष्ठानचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १६ एप्रिल-**

शिवपुण्यस्मृती रायगड भूषण पुरस्कार प्राप्त शिवभक्त प्रतिष्ठान पंढरपूर यांचे वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथी अभिवादन कार्यक्रम श्री क्षेत्र किल्ले रायगड येथे संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी पंढरपुरातून यावर्षी साडेपाचशे वारकरी तथा धारकरी यांची श्री शिव समाधी नतमस्तक दुर्ग मोहीम आयोजित करण्यात आली होती.

विशेष म्हणजे पंढरपूर येथील शिवभक्त प्रतिष्ठानचे रायगड मोहिमेचे यंदाचे हे २५ वे वर्ष होते. यावर्षी शिवसमाधी नतमस्तक अभिवादन कार्यक्रमास धारकरी व वारकऱ्यांची दिंडी टाळ, पताका आणि मृदुंग यांच्या समवेत काढण्यात आलेली होती. शूरवीरांच्या पराक्रमाची यथोगाथा सांगणारा मर्दानी आखाड्याची चित्त थरारक प्रात्यक्षिके करून छत्रपती शिवाजी महाराजांना यावेळी उपस्थित मावळ्यांकडून मानवंदना देण्यात आली. त्याचबरोबर सेक्सोफोन या आधुनिक वाद्यांनी वीरश्री नटलेली व पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी महाराजांची महाराष्ट्र गीते ही वाजवून मानवंदना देण्यात आली. कार्यक्रमास पंढरपुरातील आबालवृद्ध, बाल तसेच महिला सर्वजण एकत्र शिस्तबद्ध पद्धतीने रायगडावर मोहिमेवर होते. या सर्वांनी ११ एप्रिल रोजी गडदर्शन तसेच गड स्वच्छता मोहीम राबविली. त्या नंतर १२ एप्रिल रोजी श्री शिव पुण्यस्मृती शिवसमाधी नतमस्तक दुर्ग मोहिमेचे औचित्य साधून गडावरील शिरकाई देवी होळीच्या माळावरील सिंहासनाधीश्वर पुतळा, जगदीश्वरातील जगदीश्वराची पूजा महाआरती तसेच शिव समाधीला नतमस्तक होऊन व्यसनमुक्तीची देखील शपथ घेण्यात आली.

त्याचबरोबर होळीच्या माळावर चित्त थरारक मैदानी आखाडा प्रात्यक्षिकेही करून शिवाजी महाराजांना अनोखी मानवंदना देखील देण्यात आली. पंढरपूरची वारी रायगडच्याद्वारी अशी काढण्यात आलेली दिंडी या कार्यक्रमानंतर श्री क्षेत्र पाचाड येथे जिजाऊ माँ साहेबांच्या समाधीला मानवंदना देऊन रायगड मोहिमे अंर्गत तीन दिवसांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमात सहभागी होवून पुन्हा पंढरपूरकडे रवाना झाली.



### केंद्रीय गृहमंत्र्यांची उपस्थिती

या कार्यक्रमासाठी गृहमंत्री अमित शहा त्याचबरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्याबरोबर मंत्रिमंडळातील अनेक सहकारी या कार्यक्रमास उपस्थित राहून शिवसमाधी समोर नतमस्तक झाले.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड,
परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## अकलूजमध्ये मराठा सेवा संघाचे राज्यस्तरीय आधिवेशन

**१० ते १२ मे पर्यंत चालणार वैचारिक पर्वणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

मराठा सेवा संघ केंद्रीय कार्यकारणीमध्ये ठरल्याप्रमाणे २०२५ चे राज्यस्तरीय अधिवेशन सोलापूर जिल्ह्यात अकलूज येथे आयोजित केले आहे. १० ते १२ मे तीन दिवस अधिवेशन चालणार आहे. अधिवेशन समाजासाठी वैचारीक पर्वणी ठरणार आहे. यापूर्वी १९९८ मधे पंढरपूर येथे आधिवेशन यशस्वीरित्या पार पडले होते.

आधिवेशनाच्या माध्यमातून जन जागृती, प्रबोधन व संघटन बळकटी व्हावी ह्या उद्देशाने विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले आहे. अधिवेशनाच्या नियोजना संदर्भात नुकतीच म राठा सेवा संघाचे प्रदेश महासचिव चंद्रशेखर शिखरे, माजी प्रदेशाध्यक्ष नेताजी गोरे यांच्या उपस्थितीत नियोजन बैठक संपन्न झाली. राज्यभरातून येणारे सेवा संघाचे सर्व पदाधिकारी सभासद समाज बांधव भगिनी तसेच देशभरातून येणारे प्रतिनिधी यांची निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था, प्रचार व प्रसार व्यवस्था यासोबत विविध विषयावरील व्याख्यान, परिसंवाद, सांस्कृतिक कार्यक्रम याची अंतिम आखणी करण्यात आली. संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर व प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे साहेब यांचे मार्गदर्शनाखाली आधिवेशनाची जय्यत तयारी सुरू आहे. सोलापूर जिल्हा व आसपासच्या जिल्ह्यातील समाज बांधवांसाठी हे वैचारिक आधिवेशान म्हणजे खर्या अर्थाने मोठी पर्वणी आहे. या आधिवेशनास जास्तीजास्त समाज बांधव आणि भगिनी उपस्थित राहतील यासाठी प्रयत्न करावा अशी अपेक्षा मान्यवरांनी बैठकीत व्यक्त केली.




www.tarunbharat.org
सोलापूर तरुण भारत


## महत्वाचे...



### चिखलठाण न्यू इरा पब्लिक स्कूलमध्ये पदवीदान समारंभ

**करमाळा, दि. १६ एप्रिल-**

चिखलठाण येथील न्यू इरा पब्लिक स्कूलने त्यांच्या (पूर्व प्राथमिक) सिनिअर केजी वर्गातील २०२४-२५ च्या बॅचमधील विद्यार्थ्यांसाठी पदवीदान समारंभाचे आयोजन केले होते. या समारंभाला संस्थेचे अध्यक्ष डॉ. बारकुंड, मुख्याध्यापक आनंद कसबे, विभागप्रमुख कोमल रोकडे, वर्ग शिक्षिका समीना फकीर, अन्नपूर्णा शिंदे यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना गौरवण्यात आले. न्यू इराच्या पदवीधरांनी सुंदर दीक्षांत गाऊन परिधान करून प्रमाणपत्रे स्वीकारली. सूत्रसंचालन सुजाता जाधव यांनी केले.



### शिवाजीनगर मित्र मंडळातर्फे महाप्रसादाचे वाटप

**बार्शी, दि. १६ एप्रिल-**

येथील शिवाजीनगर मित्रमंडळ व संतोष बापू गुंड मित्रमंडळाच्यावतीने हनुमान जयंतीनिमित्त महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सुरुवातीला बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या हस्ते श्री हनुमानाची आरती करण्यात आली. यानंतर श्रींना नैवेद्य दाखवून, महाप्रसादाला सुरुवात करण्यात आली. येथे प्रत्येक वर्षी हनुमान जयंतीचे औचित्य साधून विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात. यामध्ये रक्तदान शिबीर, आरोग्य शिबिर, गोरगरिबांना अन्नधान्य वाटप, शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप आदी प्रकारचे उपक्रम राबवले जातात. यावेळी शेकडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

### माळशिरस तालुक्यातील १०३ सरपंचांची आरक्षण सोडत २२ एप्रिलला

**सदाशिवनगर, दि. १६ एप्रिल-**

तालुक्यातील १०३ ग्रामपंचायतीची २०२५-२०३० साठीची सरपंच आरक्षण सोडत २२ एप्रिल २०२५ रोजी ११ वाजता पंचायत समिती सभागृहात होणार काढण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार सुरेश शेजुळ यांनी दिली.यावेळी नायब तहसीलदार अमोल कदम, निवडणूक विभागाचे दशरथ माळी उपस्थित होते. आरक्षण २०११ च्या जन गणानेनुसार होणार असून अनुसूचित जातीसाठी २४, यामध्ये १२ महिला,१२ पुरुष,अनुसूचित जमाती पुरुष १,नागरिकांचा मागास प्रवर्ग २८ यामध्ये महिला १४, पुरुष १४. सर्व साधारण ५० यामध्ये महिला २५, पुरुष २५ असे आरक्षण काढण्यात येणार असून सर्व गावातील नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन तहसीलदार सुरेश शेजुळ यांनी केले आहे.

### संजय क्षिरसागर यांना आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार जाहीर

**माढा, दि. १६ एप्रिल-**

वाकाव व धानोरे (ता. माढा) येथील वृक्षमित्र ग्रामपंचायत अधिकारी संजय तुकाराम क्षिरसागर यांना महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास खात्याचा राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांनी वडाचीवाडी (अंजनगाव ऊमाटे) शासकीय गायरान १० एकरामध्ये वृक्षलागवड करून संरक्षण व संगोपन करत ऑक्सिजन पार्क ची निर्मिती केली. वाकाव, बुद्रुकवाडी, धानोरे येथे ऑक्सिजन पार्कची निर्मिती केली. स्मशानभूमीमध्ये वृक्षारोपण करून स्मशानभूमीचा कायापालट केला. जन्म-मृत्यू, विवाह नोंदणीसाठी कमीतकमी दोन वृक्षांची लागवड बंधनकारक कण्याचा ठराव करून अंमलबजावणी केली. त्यांच्या या पुरस्काराबद्दल आ. अभिजीत पाटील, माजी आमदार बबनराव शिंदे, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत, रणजितसिंह शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशादीन शेळकंदे, गटविकास अधिकारी महेश सुळे, भैरवनाथ शुगरचे कार्यकारी संचालक पृथ्वीराज सावंत, सरपंच ऋतुराज सावंत, सरपंच छाया दावणे, अनिल देशमुख, वडाचीवाडीचे सरपंच रमेश भोईटे, सरपंच पूजा माने, संदीप पाटील, शरद भुजबळ, नारायण ढवळे, तालुकाध्यक्ष आनंद शेंडे, सिध्देश्वर माळी, गोरख नरसाळे यांनी अभिनंदन केले.



### पंढरपुर तालुक्यातील ९५ ग्रामपंचायत सरपंचपदाची आरक्षण सोडत २२ एप्रिलला

**पंढरपूर, दि. १६ एप्रिल-**

पंढरपूर तालुक्यातील सन २०२५-२०३० या पंचवार्षिक कालावधीसाठी ९५ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी दि.२२ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता शेतकी भवन, पंचायत समिती पंढरपूर येथे आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या सोडत कार्यक्रमासाठी तालुक्यातील इच्छुक सर्व नागरिकांनी हजर राहवे असे आवाहन तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

# उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या माढ्यातील सभेसाठी जाणार हजारो शिवसैनिक : जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. सावंत

**२१ एप्रिल रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सोलापूर जिल्ह्यात**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल -**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची २१ एप्रिल रोजी माढा येथे जाहीर सभा होणार असून या सभेसाठी सोलापुरातून हजारो शिवसैनिक जाणार आहेत, अशी माहिती शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत यांनी बुधवारी शिवसेनेच्या बैठकीत दिली. शासकीय विश्रामगृहात शिवसेनेची बैठक पार पडली.

२१ रोजी सकाळी १०.३० वाजता पृथ्वीराज सावंत यांच्या राजवीर ॲग्रो ऑईल प्रा. लि. या कंपनीचा भूमिपूजन कार्यक्रम माढा येथे होणार असून यानंतर त्या ठिकाणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जाहीर सभा होणार आहे. या सभेच्या तयारीचा आढावा शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत यांनी बुधवारी बैठकीत घेतला.



जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत म्हणाले, शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी आणि शिवसैनिकांनी ही सभा यशस्वी करण्यासाठी जोरदार तयारी करावी. आगामी काळात होणाऱ्या महानगरपालिका, जिल्हा परिषद तसेच नगरपालिका निवडणुकांच्यादृष्टीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा हा सोलापूर दौरा अत्यंत महत्त्वाचा आहे. या दौऱ्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसैनिकांना भेटून त्यांची मते जाणून घेणार आहेत. शिवसेना पक्षाच्या सोलापूर जिल्ह्यातील विस्तारासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या या दौऱ्याचा मोठा उपयोग होणार असल्याने शिवसैनिकांनी हजारोंच्या संख्येने या जाहीर सभेस उपस्थिती लावावी, असेही शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत यांनी याप्रसंगी सांगितले. शिवसेना सोलापूर जिल्हाप्रमुख अमोल शिंदे म्हणाले, लोकसभा आणि विधानसभा या नेत्यांच्या निवडणुका होत्या. आता महानगरपालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका या कार्यकर्त्यांच्या निवडणुका समोर आहेत. त्यामुळे शिवसैनिकांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जाहीर सभेसाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करावेत.

या जाहीर सभेतून शिवसेनेचे शक्तिप्रदर्शन होणार आहे. जाहीर सभेची तयारी म्हणजे पक्षकार्याची संधी म्हणून शिवसैनिकांनी याकडे पहावे असे आवाहनही शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी याप्रसंगी केले. मनोज शेजवाल म्हणाले, शिवसेना पदाधिकारी आणि शिवसैनिकांनी शाखानिहाय बैठका घेऊन शिवसैनिकांसोबत मोठ्या संख्येने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जाहीर सभेस उपस्थित रहावे.

**भगव्या साड्या अन् भगव्या फेट्यांनी रंगणार सभा**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सभेसाठी सोलापुरातून हजारो महिला भगव्या रंगाची साडी परिधान करून सभेस उपस्थिती लावणार आहेत. तर हजारो शिवसैनिक भगवे फेटे बांधून सभेला जाणार आहेत. त्यामुळे भगव्या साड्या आणि भगव्या फेट्यांनी ही जाहीर सभा रंगणार आहे, असे प्रा. शिवाजीराव सावंत यांनी सांगितले.

या बैठकीस शिवसेनेचे माजी शहर प्रमुख मनोज शेजवाल, सोलापूर शहर प्रमुख सचिन चव्हाण, अमर पाटील, युवासेना शहर प्रमुख समर्थ मोटे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख नवनाथ चव्हाण, राजू शिंदे, शशी शिंदे, अक्षय बिद्री, संजय सरवदे, समर्थ बिराजदार, युवा सेनेचे राज्य कार्यकारिणी सदस्य सुजित खुर्द, महिला आघाडी संपर्कप्रमुख अनिता माळगे, जिल्हाप्रमुख रवीना राठोड, शहर प्रमुख जयश्री पवार, अनिता गवळी, संगीता खांबसकर , मनीषा नलावडे, सुनंदा साळुंखे, युवा सेनेचे रणजीत भंडारे, नामदेव पाटील, रोहन चौगुले, राज मिसाळ आदी उपस्थित होते.

## निमगावचा विराज सावंत कुमार महाराष्ट्र केसरीचा मानकरी

**● ग्रामस्थांच्यावतीने सत्कार**

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि.१६ एप्रिल-**

निमगाव (ता.माळशिरस) येथील व सध्या पुणेच्या गोकुळ वस्ताद तालमीत सरावाला असलेला मल्ल विराज आबासो सावंत हा कुम ार महाराष्ट्र केसरी-२०२५ चा मानकरी ठरला आहे. या यशाबद्दल निमगाव ग्रामस्थांच्या वतीने त्याचा सन्मान नुकताच करण्यात आला.

पुणे येथील मामासाहेब मोहोळ कुस्ती संकुलात महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या मान्यतेने महाराष्ट्र राज्यस्तरीय १७ वर्षाखालील ४५ व्या कुमार महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यामध्ये मल्ल विराजने हे यश संपादन केले. गोकुळ वस्ताद तालमीचे प्रमुख वस्ताद राष्ट्रीय खेळाडू सागर हरिश्चंद्र बिराजदार यांच्या मार्गदर्सनाखाली मल्ल विराज



सराव करीत आहे. रुस्तुम-ए-हिंद-केसरी हरिश्चंद्र बिराजदार यांच्या विचारांचा वारसा सागर बिराजदार हे चालवित आहेत. यापूर्वी २००९ साली विजय बनकर यांनी महाराष्ट्र केसरीचा किताब जिंकला होता तब्बल सोळा वर्षानंतर सागर बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली गोकुळ वस्ताद तालमीला विराज सावंत यांच्या रूपाने कुमार महाराष्ट्र केसरीची गदा मिळाली आहे.

विराज सावंत याने२०२५ चा कुमार म हाराष्ट्र केसरीचा किताब मिळविल्याबद्दल निम गाव ग्रामस्थांच्या वतीने सावंत यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते विश्वनाथ मगर, माजी सरपंच हनुमंत पवार, उपसरपंच नंदकुमार पाटील , युवराज मगर, चंद्रकांत मगर, निनाद पाटील, बाळासाहेब मगर, भारत मगर, जगन्नाथ पांढरे, लक्ष्मणराव पवार, माऊली मगर, ॲड.शेखर मगर, आबासो सावंत, नंदकुमार पाटील, दत्तात्रय मगर, जयसिंग मोरे ,नितीन मगर, शंकर सावंत, रणजीत मगर, रवींद्र पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

## सोजर इंग्लिश स्कूलच्या सर्वज्ञने टाकाऊ वस्तूपासून बनवला कुलर

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. १६ एप्रिल**

येथील सोजर इंग्लिश स्कूलमधील पाचवीतील सर्वज्ञ सचिन शिंदे या विद्यार्थ्याने घरातील टाकाऊ वस्तुपासून कुलर तयार केला आहे. हा कुलर वीज आणि बॅटरी या दोहोंवर चालत असून सुमारे ३ तासापर्यंत त्याचा बॅकअप मिळत आहे. कुसळंब सारख्या खेडेगावात जिथे तासन् तास वीज जाते अशा ठिकाणी हा कुलर निश्चितच एक वरदान ठरत आहे.



हा कुलर तयार करण्यासाठी सर्वज्ञने घरातील बंद स्थितीतील पंखा, प्लॅस्टिकचे कॅन चार्जर, १४० रुपये किंमतीच्या २ मोटार, वायर, बटन, लाकडी पट्टी आणि ग्लु स्टीक याचा वापर केला. शाळेच्या अभ्यासासह वेळ वाया न घालवता तसेच कोणाचीही मदत न घेता बुद्धी कौशल्य वापरून सर्वज्ञने कडक उन्हाळ्याच्या दिवसात थंडावा निर्माण करणारा अत्यंत कमी खर्चाचा परंतु टिकाऊ असा कुलर बनविल्याबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## अंकोलीच्या श्री भैरवनाथ यात्रेस २० एप्रिलपासून सुरूवात

**अक्षता सोहळा, कावडींसह पालखी, शोभेचे दारूकाम...**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल -**

हजारो भक्तगणांचे कुलदैवत असलेल्या श्री क्षेत्र अंकोली भैरवनाथ यात्रा (ता. मोहोळ) उत्सवास २० एप्रिलपासून सुरुवात होणार आहे. २० ते २३ एप्रिल या कालावधीत होणाऱ्या यात्रास उत्सवा देवाचा विवाह सोहळा, कावडींसह पालखी, छबिना व शोभेचे दारूकाम असे कार्यक्रम होणार असल्याचे मंदीर समितीच्यावतीने सांगण्यात आले.

श्री क्षेत्र अंकोली भैरवनाथ हे सोलापूरसह पश्चिम महाराष्ट्रातील हजारों भक्तगणांचे कुलदैवत आहे. दरवर्षी एप्रिल महिन्यात श्री भैरवनाथ यात्रा उत्सव साजरा करण्यात येतो. यंदाच्यावर्षी हा



यात्रा उत्सव २० ते २३ एप्रिल या कालावधीत साजरा होणार आहे. श्री क्षेत्र अंकोली भैरवनाथ यात्रा उत्सवाचा शेवटचा उपवास हा रविवार दि. २० एप्रिल रोजी असणार असून याच दिवशी रात्री १० पासून पहाटे ५ वाजेपर्यंत श्री जागर होणार आहे.

पहाटे ५ वाजता श्री भैरवनाथ व माता जोगेश्वरी यांचा विवाह सोहळ्यातील अक्षदा होणार आहे. त्यानंतर महाआरती होणार आहे. २१ एप्रिल रोजी सोमवारी गावकऱ्यांची अष्टमी दिवशी नाल बसवणे तसेच दुपारी ४ वाजता मानाच्या कावडींसह आरत्या निघणार आहेते. रात्री १० वाजता सवाद्य पालखी छबिना निघणार आहे. २१, २२ आणि २३ एप्रिल या तिन्ही दिवशी पालखी छबिना निघणार आहे. तसेच २३ एप्रिल रोजी पालखी छबिना सोहळ्यात शोभेचे दारूकाम होऊन यात्रेचा समारोप होणार असल्याचे मंदीर समितीच्यावतीने सांगण्यात आले. या यात्रा उत्सवासाठी मंदीर समितीकडून तसेच गावकऱ्यांकडून येणाऱ्या भक्तगणांच्या सोयी-सुविधांसाठी परिश्रम घेण्यात येत आहे.

## नीरा-देवधर योजनेतून सांगोला अन पंढरपूरसाठी एक टीएमसी वाढीव पाणी मंजूर

**जलसंपदा मंत्री विखे-पाटलांचा निर्णय**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१६ एप्रिल-**

निरा देवधर योजनेतून सांगोला, पंढरपूरसाठी एक टीएमसी वाढीव पाणी मंजूर करण्याचा निर्णय बुधवार दि.१६ एप्रिल रोजी मंत्रालयामध्ये झालेल्या बैठकीत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी घेतल्याची माहिती माजी आ. शहाजी पाटील यांनी दिली.

सदर बैठकीमध्ये सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी खा.रणजितसिंह निंबाळकर, आ.बाबासाहेब देशमुख, माजी आ.शहाजी पाटील, जलसंपदा सचिव दीपक कपूर, कृष्णा खोरे महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले यांच्यासह सर्व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. माजी आ.शहाजी पाटील व आ.बाबासाहेब देशमुख यांच्या मागणीवरून धरण क्षेत्रातून बंदिस्त पाईपलाईन करून मैल क्र.९५ येथे १ टीएमसी पाणी थेट कॅनॉल मध्ये सोडण्याचा निर्णय होऊन तातडीने याचे अंदाजपत्रक तयार करण्याच्या सूचना राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या आसल्याची माहिती माजी आ.शहाजी पाटील यांनी दिली. लवकरच या



कामास सुरुवात केली जाणार असून त्यामुळे सांगोला व पंढरपूर येथे निरा उजवा कालवा हा बारमाही होणार असल्याने लाभक्षेत्रातील सर्व गावांना याचा खूप मोठा फायदा होणार असल्याची माहिती माजी आ.शहाजी पाटील यांनी दिली.

## सहकार महर्षि कारखान्यात एआय तंत्रज्ञानावर कार्यशाळा

**बारामतीचे मृदा शास्त्रज्ञ डॉ. विवेक भोईट यांचे मार्गदर्शन**

**तभा वृत्तसेवा**
**अकलूज, दि.१६ एप्रिल-**

येथील सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्यातील उदय सभागृहात कृत्रिम बुद्धीमत्ता (ए.आय.) तंत्रज्ञानावरील ऊस शेती कार्यशाळेचे आयोजन केले होते. कारखान्याचे मार्गदर्शक संचालक व महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील व चेअरमन मा. जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांच्या संकल्पनेतून तसेच कारखान्याच्या संचालिका स्वरुपाराणी जयसिंह मोहिते-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सदर कार्यशाळा संपन्न झाली.

सुरवातीस कारखान्याचे संस्थापक सहकार महर्षि कै. शंकरराव मोहिते-पाटील व आक्कासाहेब





यांच्या प्रतिमेचे पूजन बारामतीच्या कृषी विज्ञान केंद्रातील मृदा शास्त्रज्ञ डॉ. विवेक भोईटे यांच्या हस्ते झाले. कार्यशाळेमध्ये डॉ. भोईटे यांनी ऊस उत्पादन वाढीसाठी आर्टिफिशीयल इंटेलिजेन्स (ए.आय.) तंत्रज्ञानाचा वापर देशात सर्वप्रथम कृषी विज्ञान केंद्र, बारामती येथे करण्यात आला असून सदर तंत्रज्ञानाच्या वापरामुळे सिझन २०२४-२५ मध्ये प्रती एकरी ३० ते ३५% इतके उत्पादन वाढून मिळाले असून ४० टक्के पर्यंत पाण्याची बचत झाल्याचे सांगितले. तसेच सदर तंत्रज्ञान वापरल्याने जमिनीचा ओलावा, सुर्यप्रकाश, वा-याचा वेग व दिशा, तापमान, पर्जन्यमान, कीड, रोग याची पुर्वकल्पना त्याच्या नियंत्रणाची माहिती, जमिनीतील नत्र, स्फुरद व पालाश यांचा समतोल राखण्यासाठी मार्गदर्शन व माहीती पुरविली जाते. त्यामुळे ऊस पिकास या गोष्टी समतोल प्रमाणात मिळून ऊस उत्पादन वाढीसाठी मदत होते असे सांगितले. तसेच सदर तंत्रज्ञान घेण्यासाठी प्रति हेक्टर एका पिकासाठी २५ हजार रूपयांचा खर्च येत असून त्यासाठी किमान २५ शेतकऱ्यांचा ग्रुप असणे आवश्यक आहे. यामध्ये २ किलोमिटर अंतरासाठी एक वेदर स्टेशन बसविणे आवश्यक आहे, त्यासाठी १ लाख इतका खर्च असून २५ शेतकरी यांचा ग्रुप झाल्यास सदरचा खर्च कृषी विज्ञान केंद्र, बारामती यांचे मार्फत केला जाणार आहे. सदर तंत्रज्ञानापासून होणारे फायदे याविषयी सखोल मार्गदर्शन केले व ऊस उत्पादक शेतकरी सभासद यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचे निरसन केले.

कार्यशाळेसाठी कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख, कारखान्याचे कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले, अधिकारी व कर्मचारी गोठ्या संख्येने उपस्थित होते.